बुधवार
२५
फेब्रुवारी २०२६
अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : ३५०
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com
बातम्यांचा गतिमान पाठलाग
# अजिंक्य भारत


लग्नानंतर लगेचच धवन का झाला नाराज?
(पान ७ वर)

## थोडक्यात

### लाडक्या बहिणींचा जानेवारीचा हप्ता खात्यात जमा होणे सुरु



**मुंबई:** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांची प्रतीक्षा अखेर संपली आहे. जानेवारी महिन्याचा निधी वितरणाची प्रक्रिया मंगळवारपासून अधिकृतपणे सुरू झाली असून, लवकरच पात्र महिलांच्या बँक खात्यात पैसे जमा होणार आहेत. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सोशल मीडियाद्वारे ही महत्त्वाची माहिती दिली. २३ फेब्रुवारीपासून निधी वितरणाची तांत्रिक प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पुढील २ ते ३ दिवसांत सर्व पात्र लाभार्थ्यांच्या आधार कार्डशी लिंक असलेल्या बँक खात्यात सन्मान निधी जमा होईल. असा विश्वास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केला आहे.

### राहुल गांधींचे मोदींवर जोरदार टीकास्त्र

**भोपाळ:** काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आज भोपाळमधील पक्षाच्या 'किसान महा चौपाल' मध्ये सहभागी झाले. भारत आणि अमेरिका यांच्यातील अंतरिम व्यापार कराराच्या निषेधार्थ हे चौपाल आयोजित करण्यात आले. राहुल गांधींनी जनरल नरवणे यांच्या पुस्तकाचा संदर्भ देत थेट पंतप्रधान मोदींवर निशाणा साधला होता. याचा संदर्भ ते म्हणाले की, लोकसभेत पहिल्यांदाच विरोधी पक्षनेत्याला बोलू देण्यात आले नाही. मला बोलू देण्यात आले नाही. पुस्तकात नरवणे यांनी स्पष्टपणे लिहिले आहे की जेव्हा चिनी रणगाडे भारताच्या सीमेत घुसत होते, तेव्हा त्यांनी राजनाथ सिंह यांना फोन करून विचारले, 'माझे काय आदेश आहेत?' राहुल म्हणाले की जेव्हा चीनला प्रत्युत्तर देण्याची वेळ आली तेव्हा पंतप्रधान मोदी गायब झाले.

### मयंक पवारचे निधन



**मुंबई:** रिॲलिटी टीव्ही आणि फिटनेस इंडस्ट्रीमधून एक दुःखद बातमी समोर आली आहे. ''एमटीव्ही स्प्लिट्सव्हिला'' सीझन ७ मधील सर्वात लोकप्रिय आणि दयाळू स्पर्धकांपैकी एक म्हणजे मयंक पवार याचे निधन झाले आहे. त्याने वयाच्या ३७ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला आहे. त्याच्या अकाली निधनाचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्याच्या अधिकृत इंस्टाग्राम हँडलवरून ही दुःखद बातमी कळवण्यात आली, ज्यामुळे त्याचे चाहते, कुटुंब आणि फिटनेस प्रेमी यांना मोठा धक्का बसला आहे.

# अजित पवारांच्या अपघातग्रस्त विमानाचा ३००० तासांचा रेकॉर्डच उपलब्ध नाही!

## रोहित पवारांच्या दाव्याने खळबळ



**मुंबई: दि. २४** वृत्तसंस्था

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अपघाती निधन झाले असून, त्यांचा घातपात झाला असल्याचा दावा अजित पवारांचे पुतणे आणि आमदार रोहित पवार यांनी केला आहे. त्यामुळे या प्रकरणी त्यांनी सखोल चौकशीची मागणी केली आहे. या चौकशीअंतर्गत येणाऱ्या प्रत्येक गोष्टीकडे रोहित पवारांचं जातीने लक्ष आहे. त्यातच, त्यांनी आता या चौकशीबाबत आज एक एक्स पोस्ट केली आहे.

रोहित पवार पोस्टमध्ये म्हणाले, अजित दादांच्या अपघातातील विमानाच्या चौकशीच्या निमित्ताने रोहित सिंगला काल पायलट म्हणून चौकशीसाठी बोलवण्यात आल्याची माहिती मिळत असून, काल रोहित सिंग देशात आला होता. तसेच व्हीएसआरकडे विमानाच्या ५००० तासांपैकी केवळ १८०० ते २००० तासांचा रेकॉर्ड उपलब्ध असून, उर्वरित ३००० तासांचे रेकॉर्डस उपलब्धच नसल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. या मिसिंग रेकॉर्डची हेराफ ेरी, बनवाबनवी व्हीएसआरला करता यावी यासाठी चौकशी जाणूनबुजून लांबवली जात आहे का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, अजित पवारांचा २८ जानेवारी रोजी विमान अपघातात मृत्यू झाला. या अपघातामागे घातपाताची शक्यता रोहित पवारांनी वर्तवली आहे. त्यामुळे त्यांनी सातत्याने यावर मुंबई आणि दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन त्यांनी त्यांच्या पातळीवर केलेल्या तपासातील काही मुद्दे माध्यमांसमोर मांडले. यातून ब्लॅक बॉक्सची माहिती, अपघातग्रस्त विमानाच्या कंपनीच्या मालकाची माहिती, त्यांना असलेले कथित राजकीय वरदहस्त (पान २ वर)



महाराष्ट्राचा लोकनेता गेला असताना अपघाताला जबाबदार कंपनीच्या मालकाला केवळ पायलट म्हणून चौकशीसाठी बोलावले जात असेल तर याचा अर्थ काय घ्यायचा? दादांच्या अपघाताच्या गुन्हेगारी अँगलची चौकशी सीआयडी करत असताना व्हीएसआरचा मालक भारतात आला असेल तर डीजीसीएने सीआयडीला कळविणे आवश्यक का समजले नाही? असा प्रश्न रोहित पवारांनी विचारला आहे. डीजीसीए आणि व्हीएसआरची मिलीभगत, यंत्रणांचा एकमेकांशी असलेला विसंवाद बघता, अजित दादांची यांच्या लेखी किती किंमत आहे हे कळून चुकले. केंद्र आणि राज्य सरकार थोडे गांभीर्य दाखवेल ही, अपेक्षा आहे, असंही ते म्हणाले.

# केरळचे नाव आता 'केरळम' होणार!

## 'सेवा तीर्थ'मध्ये मंत्रिमंडळाची पहिली बैठक

**नवी दिल्ली, दि. २४** वृत्तसंस्था



पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या 'सेवा तीर्थ' या नवीन कार्यालयात मंगळवारी केंद्रीय मंत्रिमंडळाची पहिली बैठक पार पडली. या बैठकीत केरळ सरकारचा राज्याचे नाव बदलून 'केरळम' करण्याच्या प्रस्तावाला केंद्र सरकारने अधिकृत मंजुरी दिली आहे. आगामी केरळ विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाने दक्षिणेकडील केरळ राज्याच्या 'केरळम' नामकरण करण्यास मान्यता दिली आहे. यापूर्वी केरळच्या विधानसभेत दोनदा मान्यता दिलेली ही मागणी अखेर पूर्ण होणार आहे. गेल्या काही वर्षांपासून केरळ सरकारने ही नामकरणाची मागणी लावून धरली होती. आज अखेर केंद्रीय मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर ही मागणी पूर्ण झाली आहे. यापूर्वी २०२३ आणि २०२४ मध्ये केरळ विधानसभेत केंद्र सरकारला संविधानात सुधारणा करून राज्याचे नाव केरळ वरून 'केरळम' असे बदलण्याची विनंती करणारे ठराव मंजूर केले. दोन्ही ठराव मुख्यमंत्री पिनारायी विजयन यांनी मांडले होते. गेल्या महिन्यात केरळ भाजपचे प्रदेशाध्यक्ष राजीव चंद्रशेखर यांनीही मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून या निर्णयाला पक्षाचा पाठिंबा दर्शविला होता. त्यामुळे (पान २ वर)

### 'युगे-युगेन भारत'

१९४७ पासून सत्तेचे केंद्र राहिलेल्या साउथ ब्लॉकमधून पंतप्रधान कार्यालय आता दारा शिकोह रोडवरील अत्याधुनिक 'सेवा तीर्थ' संकुलात स्थलांतरित झाले. सुमारे ११८९ कोटी रुपये खर्चून उभारलेल्या या ५ एकरच्या संकुलात कॅबिनेट सचिवालय आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांचे कार्यालयही असेल. दरम्यान, जुन्या नॉर्थ-साउथ ब्लॉक इमारतींचे रूपांतर आता 'युगे-युगेन भारत' या जागतिक दर्जाच्या राष्ट्रीय संग्रहालयात केले जाणार आहे.

# राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुकीवरील स्थगिती उठली

**मुंबई: दि. २४** वृत्तसंस्था

राज्यातील बारा जिल्ह्यात नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकां दरम्यान स्थगित केलेल्या राज्यातील अ व ब वर्ग सहकारी संस्थांच्या निवडणुकीवरील स्थगिती शासनाने मंगळवारी (दि. २४) उठविली आहे.

महाराष्ट्र राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाचे सचिव अशोकराव गाडे यांनी आज एका आदेशान्वये राज्यात स्थगित झालेल्या सहकारी संस्थांच्या निवडणुका आहे त्या टप्प्यावर सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. केवळ न्यायालयीन आदेशामुळे स्थगित झालेल्या निवडणुका यामध्ये अपवाद करण्यात आलेल्या आहेत. दरम्यान, या शासन निर्णयामुळे गोकुळच्या निवडणुकीची रणधुमाळी लवकरच सुरू होणार आहे. आठवड्याभरात गोकुळच्या निवडणुकीचा महत्त्वाचा टप्पा असलेला मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर होण्याचे संकेत आहेत. चार मे २०२६ रोजी गोकुळच्या विद्यमान संचालक मंडळाची मुदत संपत असून येत्या मे महिन्यात गोकुळ च्या २५ जागांसाठी मतदान होण्याची शक्यता आहे. पश्चिम महाराष्ट्राचेच नव्हे तर राज्यातील सहकारी क्षेत्राचे लक्ष लागलेल्या गोकुळची निवडणूक मुदतीत होणार का? याकडे जिल्ह्यातील सहकार क्षेत्राचे लक्ष होते. येत्या दोन दिवसात सहकार निवडणूक प्राधिकरण गोकुळकडून सभासद संस्थांची यादी मागून घेईल. ४ मे २०२३ ही गोकुळच्या मतदार यादीची कट ऑफ डेट असल्याने या तारखेपर्यंत सभासद (पान २ वर)

# राज्यातील २५५ मराठी शाळा बंद!

## विधानसभेत सरकारची माहिती

**मुंबई: दि. २४** वृत्तसंस्था

राज्यातील मराठी शिक्षण व्यवस्थेसाठी गंभीर चित्र समोर आले आहे. कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्र या पाचही विभागांतील तब्बल २५५ मराठी शाळा बंद झाल्याची माहिती सरकारने विधानसभेतील लेखी प्रश्नोत्तरातून दिली आहे. घटती विद्यार्थीसंख्या आणि पालकांचा वाढता इंग्रजी माध्यमाकडे कल ही यामागील प्रमुख कारणे असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

गेल्या काही वर्षांत शिक्षण क्षेत्रात मोठे बदल झाले आहेत. रोजगाराच्या वाढत्या संधी, स्पर्धात्मक परीक्षांची तयारी आणि जागतिक स्तरावर संवाद कौशल्य विकसित करण्यासाठी अनेक पालक इंग्रजी माध्यमाला प्राधान्य देत आहेत. परिणामी ग्रामीण व निमशहरी भागातील मराठी शाळांमध्ये पटसंख्या सातत्याने घटत आहे. कमी विद्यार्थी संख्येमुळे काही शाळा एकत्रित करण्यात आल्या, (पान २ वर)



### शासनाच्या उपाययोजना

मराठी शाळा टिकाव्यात यासाठी शासनाने काही उपक्रम राबवले असल्याचे लेखी उत्तरात नमूद करण्यात आले आहे. इयत्ता १ ते ८ पर्यंत मोफत पाठ्यपुस्तके; मोफत गणवेश व शैक्षणिक साहित्य; कमी पटाच्या शाळांसाठी विशेष योजना; शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी विविध उपक्रम; डिजिटल शिक्षण साधनांची उपलब्धता; मात्र या उपाययोजनांचा प्रत्यक्ष परिणाम कितपत होतो, याकडे लक्ष लागले आहे.

# कच्च्या तागाच्या किमान आधारभूत किमतीत वाढ

## मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय

**नवी दिल्ली, दि. २४** वृत्तसंस्था

केंद्र सरकारने कच्च्या तागाच्या किमान आधारभूत किमतीत मोठी वाढ जाहीर केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी झालेल्या आर्थिक व्यवहार मंत्रिमंडळ समितीच्या बैठकीत २०२६-२७ मार्केटिंग सीझनसाठी कच्च्या तागाच्या किमान आधारभूत किमतीला मंजुरी देण्यात आली.नव्या निर्णयानुसार, २०२६-२७ सीझनसाठी कच्च्या तागाचा किमान आधारभूत भाव ५,९२५ रुपये प्रति क्विंटल निश्चित करण्यात (पान २ वर)

### खरेदीचे नियोजन

कॅबिनेटच्या या मंजुरीनंतर जूट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया सक्रिय होणार आहे. केंद्र सरकारची नोडल एजन्सी म्हणून जूट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया राज्य सरकारांच्या यंत्रणांसोबत समन्वय साधून ब्लॉक स्तरावर खरेदीची रूपरेषा तयार करणार आहे. नवीन पीक बाजारात आल्यानंतर लगेचच शेतकऱ्यांकडून थेट नव्या किमान आधारभूत किमतीवर खरेदी सुरू होईल. शेतकरी संघटना आणि कृषी तज्ज्ञांनी सरकारच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे; मात्र काही शेतकरी संघटनांनी सरकारी खरेदी केंद्रांची संख्या वाढवण्याची मागणीही केली आहे.

# मराठा आरक्षणात दिरंगाई!

## ६ महिन्यानंतरही हैदराबाद गॅझेटियरची कार्यपद्धती निश्चित नाही

**मुंबई: दि. २४** वृत्तसंस्था

मराठा आरक्षणाच्या मागणीसंदर्भात मनोज जरांगे यांच्या मुंबईतील आंदोलनानंतर राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियर लागू करून मराठा समाजाला ओबीसी प्रमाणपत्र देण्याचे आश्वासन दिले होते; मात्र तब्बल सहा महिन्यांनंतरही या संदर्भातील स्पष्ट कार्यपद्धती निश्चित करण्यात आलेली नाही. २० फेब्रुवारी रोजी काढलेल्या शासन आदेशातूनच ही बाब मान्य करण्यात आली आहे. सरकारने कबूल केले आहे की, कार्यपद्धती निश्चित नसल्यामुळे कुणबी प्रमाणपत्रांसाठी अर्ज कमी प्रमाणात दाखल होत आहेत आणि प्रमाणपत्रांचे वितरणही अत्यल्प आहे. आंदोलनानंतर तातडीने निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते; मात्र सहा महिन्यांनंतरही कार्यपद्धती निश्चित न झाल्याने प्रशासनाच्या दिरंगाईवर प्रश्न उपस्थित होत आहेत. मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी याबाबत स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी सामाजिक व राजकीय वर्तुळातून होत आहे. डिसेंबर २०२५ मधील आकडेवारीनुसार, मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांतून तीन महिन्यांत केवळ ५९४ अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी फक्त ९८ जणांना ओबीसी प्रमाणपत्र देण्यात आले.

### विभागीय आयुक्तांच्या देखरेखीखाली नवी समिती




छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या देखरेखीखाली नवी समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती हैदराबाद गॅझेटियरच्या आधारे पात्र व्यक्तींना कुणबी अथवा मराठा-कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी सविस्तर कार्यपद्धती ठरवणार आहे. विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी कार्यपद्धती लवकर निश्चित करण्याचे संकेत दिले आहेत. समितीने तयार केलेली राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठवली जाईल. मंजुरीनंतरच प्रमाणपत्र वितरण प्रक्रियेला गती मिळणार आहे.

## गोंदिया-जबलपूर मार्ग दुहेरीकरणाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

# महाराष्ट्रासह चार राज्यात मल्टी-ट्रॅकिंग प्रकल्प

**नवी दिल्ली, दि. २४** वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहार समितीने आज रेल्वे मंत्रालयाच्या सुमारे नऊ हजार ७२ कोटी रुपयांच्या तीन महत्त्वाच्या रेल्वे मार्गवाढीच्या प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. या प्रकल्पांमध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रातील गोंदिया जबलपूर मार्ग दुहेरीकरणाचा समावेश आहे.

महाराष्ट्र, मध्य प्रदेश, बिहार आणि झारखंड या चार राज्यांतील आठ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पांमुळे भारतीय रेल्वेच्या विद्यमान जाळ्यात सुमारे ३०७ कि.मी.ची भर पडणार आहे. यामध्ये गोंदिया-जबलपूर दुहेरीकरणासोबतच पुनारख-किऊल आणि गम्हरिया-चांडिल या मार्गांच्या तिसऱ्या आणि चौथ्या लाईनच्या कामांचा समावेश आहे. या प्रस्तावित मल्टी-ट्रॅकिंग प्रकल्पामुळे सुमारे ५ हजार ४०७ गावे आणि जवळपास ९८ लाख लोकांचा रेल्वे संपर्क अधिक सुधारेल. रेल्वे मार्गांची वाढलेली क्षमता वाहतूक व्यवस्थेत लक्षणीय सुधारणा घडवून आणेल, ज्यामुळे भारतीय रेल्वेची कार्यक्षमता आणि सेवा विश्वसनीयता वाढेल. या निर्णयामुळे रेल्वे संचालन अधिक सुलभ होईल आणि प्रवासी तसेच मालवाहतुकीतील गर्दी कमी होण्यास मोठी मदत होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'नवीन भारत' दृष्टिकोनानुसार हे प्रकल्प प्रादेशिक सर्वांगीण विकास साधण्यावर भर देतात, ज्यातून स्थानिक स्तरावर रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी वाढून नागरिक आत्मनिर्भर बनतील. हे प्रकल्प (पान २ वर)





### प्रसिद्ध स्थळांचा समावेश

'प्रधानमंत्री गति शक्ती' राष्ट्रीय मास्टर प्लॅन अंतर्गत तयार करण्यात आलेल्या या प्रकल्पांचा मुख्य उद्देश एकात्मिक नियोजन आणि विविध घटकांच्या सल्लामसलतीद्वारे बहुमार्गीय संपर्क आणि वाहतूक कार्यक्षमता वाढवणे हा आहे. यामुळे लोक, वस्तू आणि सेवांची अखंडित वाहतूक सुनिश्चित होईल. या क्षमता वाढीमुळे देशातील अनेक महत्त्वाच्या पर्यटन स्थळांपर्यंत रेल्वे संपर्क सुधारेल, ज्यात जबलपूरचे कचनार शिव मंदिर, बालाघाटमधील कान्हा राष्ट्रीय उद्यान, पेंच राष्ट्रीय उद्यान, धुआंधार धबधबा आणि दलमा वन्यजीव अभयारण्य यांसारख्या प्रसिद्ध स्थळांचा समावेश आहे.



## पान 1 वरून...

### अजित पवारांच्या अपघातग्रस्त...

याबाबत त्यांनी सातत्याने चर्चा केली आहे. त्यावेळी त्यांनी या विमानाची ५ हजार तास उडण्याची क्षमता होती. ज्यावेळी अजित पवारांना हे विमान सेवेसाठी दिलं तेव्हा फक्त १० ते १५ तासच शिल्लक होते. त्यामुळे असे विमान अजित पवारांना दिलेच नव्हते पाहिजे, असं रोहित पवार म्हणाले. तसंच हे विमान ८ हजार तासांहून अधिक काळ उडाले असण्याचीही शक्यता त्यांनी वर्तवली होती. त्यातच, आता त्याचा रेकॉर्डच उपलब्ध नसल्याचा दावा त्यांनी केला आहे.

---

### केरळचे नाव आता 'केरळम'...

या निर्णयाला वेग आला होता. तसेच पुढील काही महिन्यात केरळच्या विधानसभा निवडणुका आहेत. त्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारचा हा मोठा निर्णय ठरू शकतो. २०२४ च्या ठरावात असे म्हटले होते की मल्याळम भाषेत राज्याचे नाव 'केरळम' आहे. १ नोव्हेंबर १९५६ रोजी राज्यांची भाषिक आधारावर पुनर्रचना करण्यात आली. केरळ राज्याचा स्थापना दिवस हा 'केरळ पिरावी' म्हणून साजरा केला जातो. त्यात असे नमूद केले गेले की मल्याळम भाषेत राज्याला 'केरळम' असे संबोधले जात असले तरी, संविधानाच्या पहिल्या अनुसूचीमध्ये त्याचे नाव 'केरळ' आहे. केरळ विधानसभेने एकमताने केंद्र सरकारला हे नाव 'केरळम' करण्यासाठी संविधानाच्या कलम ३ अंतर्गत त्वरित पावले उचलण्याची विनंती केली होती. त्यावर आज (ता. २४) निर्णय झाला आहे. दुसऱ्यांदा ठराव का मांडावा लागला हे स्पष्ट करताना विजयन म्हणाले की, आधीच्या ठरावात केवळ पहिल्या अनुसूचीमध्येच नव्हे तर संविधानाच्या आठव्या अनुसूचीमध्ये सूचीबद्ध असलेल्या सर्व भाषांमध्ये बदल करण्याची मागणी करण्यात आली होती. तथापि, तपासणी केल्यावर असे आढळून आले की आवश्यक सुधारणा केरळपासून 'केरळम'पर्यंत करण्यासाठी फक्त ठरावाच्या पहिल्या अनुसूचीमध्येच करण्यात आली होती. म्हणून, विसंगती दूर करण्यासाठी एक नवीन ठराव मंजूर करण्यात आला.

---

### राज्यातील सहकारी संस्थांच्या...

असलेल्या गोकुळच्या संलग्न प्राथमिक दूध संस्था येत्या निवडणुकीसाठी मतदान करण्यास पात्र ठरतील. ही यादी जाहीर केल्यानंतर त्यावरील हरकती मागवून प्राधिकरण अंतिम संस्थांची यादी जाहीर करेल. त्यानंतर या संस्थांच्या वतीने गोकुळच्या निवडणुकीत मतदान करणे, उमेदवारी करणे, सुचक होणे यासाठी संस्थेच्या वतीने प्रतिनिधी नियुक्त करण्याचे ठराव मागविण्यात येतील. लाख मोलाचे ठराव निश्चित झाल्यानंतर मतदार यादी जाहीर होईल. आणि त्यानंतर प्राधिकरणाकडून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती होऊन एप्रिल महिन्यात गोकुळच्या निवडणुकीचा रीतसर कार्यक्रम जाहीर करण्यात येईल, असे सांगण्यात येते.

---

### राज्यातील २५५ मराठी शाळा बंद!

तर काही पूर्णतः बंद करण्याचा निर्णय घ्यावा लागला. सरकारच्या माहितीनुसार, राज्यातील सर्व विभागांत या शाळा बंद झाल्या आहेत. विशेषतः ग्रामीण भागात लोकसंख्येतील बदल व स्थलांतर, खासगी इंग्रजी शाळांची वाढ, पालकांची बदलती शैक्षणिक अपेक्षा यांचा मोठा परिणाम मराठी माध्यमावर झाला आहे. शिक्षणतज्ज्ञांच्या मते, मराठी भाषा व संस्कृती जपण्यासाठी मराठी माध्यमाच्या शाळा टिकणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र बदलत्या शैक्षणिक प्रवाहात स्पर्धात्मक व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. आधुनिक सुविधा, कौशल्याधारित अभ्यासक्रम आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केल्यास परिस्थिती सुधारू शकते.

---

### कच्च्या तागाच्या किमान ...

आला आहे. गेल्या सीझनच्या (२०२५-२६) तुलनेत हे २७५ रुपयांनी अधिक आहे. कृषी खर्च आणि मूल्य आयोगाच्या शिफारशींच्या आधारे ही वाढ करण्यात आली असून उत्पादन खर्चावर किमान ५० टक्के नफा शेतकऱ्यांना मिळावा, हा यामागील उद्देश आहे. भारतात तागाला 'गोल्डन फायबर' म्हणजेच सुवर्ण तंतू असे संबोधले जाते. पश्चिम बंगाल, आसाम, बिहार, ओडिशा आणि मेघालय या राज्यांमध्ये तागाची मोठ्या प्रमाणावर लागवड होते. या नव्या भाव वाढीचा थेट फायदा याच राज्यांतील शेतकऱ्यांना होणार आहे. प्लास्टिकच्या वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर जगभरात पर्यावरणपूरक पर्यायांना मागणी वाढत आहे. सरकारने आधीच धान्य आणि साखरेच्या पॅकेजिंगसाठी तागाच्या गोण्यांचा वापर अनिवार्य केला आहे. किमान आधारभूत किमत वाढल्याने ताग उत्पादन वाढेल आणि 'प्लास्टिकमुक्त भारत' अभियानाला बळ मिळेल, असे तज्ज्ञांचे मत आहे.

---

### महाराष्ट्रासह चार राज्यात...

कोळसा, पोलाद, लोखंड खनिज, सिमेंट, अन्नधान्य आणि खते यांसारख्या अत्यावश्यक वस्तूंच्या वाहतुकीसाठी महत्त्वाचे मार्ग उपलब्ध करून देतील. या रेल्वेमार्गांच्या विस्तारामुळे दरवर्षी ५२ दशलक्ष टन अतिरिक्त मालवाहतूक शक्य होईल. रेल्वे हा पर्यावरणपूरक आणि ऊर्जा-कार्यक्षम पर्याय असल्याने, हे प्रकल्प देशाच्या हवामान उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी सहायक ठरतील. यामुळे तेल आयातीत सुमारे ६ कोटी लिटरची बचत होईल आणि ३० कोटी किलोग्रॅम कार्बन उत्सर्जन घटणार आहे, जे सुमारे १ कोटी वृक्ष लागवडीइतके परिणामकारक ठरेल.

---

## नर्सच्या अबोल्यामुळे डोंबिवलीच्या डॉक्टरचे टोकाचे पाऊल

**डोंबिवली :** प्रेमासाठी माणूस कोणत्याही थराला जाऊ शकतो असं म्हटलं जातं. प्रेम कोणाला कोणावर होईल याचाही काही नेम नसतो. असाचा काहीसा प्रकार आता मुंबईतील डोंबिवलीत घडला आहे. डोंबिवली शहरात एका नामांकित डॉक्टरने प्रेमप्रकरणातून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. स्वतःचे सुसज्ज हॉस्पिटल आणि सुखी संसार असताना, केवळ एका नर्सच्या प्रेमाखातर आणि तिने धरलेल्या अबोल्यामुळे हताश होऊन डॉक्टरने जीवन संपवण्याचा प्रयत्न केला. या घटनेमुळे वैद्यकीय क्षेत्रासह शहरात मोठी चर्चा रंगली आहे.

या प्रकरणातील डॉक्टर आणि त्यांची पत्नी दोघेही उच्चशिक्षित असून डोंबिवलीत त्यांचे स्वतःचे मोठे हॉस्पिटल आहे. मात्र, काही काळापासून या डॉक्टरांचे त्यांच्याच हॉस्पिटलमध्ये कार्यरत असलेल्या एका नर्ससोबत प्रेमसंबंध जुळले होते. या विवाहबाह्य संबंधांमुळे पती-पत्नीमध्ये वारंवार खटके उडू लागले. वादाचे स्वरूप इतके वाढले की, डॉक्टरांनी आपल्या पत्नीचा आणि घराचा त्याग करण्याचा निर्णय घेतला. ते डोंबिवली पूर्वेकडील एका हायफाय सोसायटीत भाड्याने घर घेऊन स्वतंत्र राहू लागले.घटनेला कलाटणी तेव्हा मिळाली जेव्हा संबंधित नर्सने डॉक्टरांकडे लग्नासाठी तगादा लावला. ''माझे आधीच लग्न झाले आहे, मी तुझ्याशी पुन्हा लग्न कसे करू?'' असे डॉक्टरांनी स्पष्ट केल्यावर संतापलेल्या नर्सने त्यांच्याशी बोलणे पूर्णपणे बंद केले. ज्या नर्ससाठी सुखी संसारावर तुळशीपत्र ठेवले, तिनेच आता पाठ फिरवल्याने डॉक्टर मानसिक तणावात गेले. याच नैराश्यातून त्यांनी राहत्या घरी १० बिअर प्यायल्या आणि तब्बल ४५ झोपेच्या गोळ्यांचे सेवन करून जीवनप्रवास संपवण्याचा प्रयत्न केला.डॉक्टर वेळेवर हॉस्पिटलमध्ये न पोहोचल्याने कर्मचाऱ्यांना शंका आली. त्यांनी तातडीने डॉक्टरांच्या निवासस्थानी धाव घेतली. दरवाजा उघडला असता डॉक्टर बेशुद्धावस्थेत आढळले. त्यांना तातडीने उपचारासाठी दाखल करण्यात आले. सुदैवाने, वेळेवर उपचार मिळाल्याने सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे.

---

# शासकीय कामकाजात 'एआय'च्या प्रभावी वापरावर भर - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई : दि. २४** वृत्तसंस्था

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे बाजारपेठेचे आणि रोजगाराचे स्वरूप झपाट्याने बदलत असून शासनाने सज्ज आणि सक्षम प्रशासन उभारण्यासाठी शासकीय कामकाजात 'एआय'च्या प्रभावी वापरावर भर देण्यास सुरुवात केली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुंबई येथे नॅसकॉम टेक्नॉलॉजी अँड लिडरशिप फोरम २०२६ च्या चर्चासत्रात पत्रकार विष्णु सोम यांनी विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरात मुख्यमंत्री देवेंद फडणवीस यांनी आपले विचार व्यक्त केले. या चर्चासत्रात मायक्रोसॉफ्ट इंडियाच्या अध्यक्ष सिंधू गंगाधरन आणि पीडब्ल्यूसीचे अध्यक्ष संजीव कृष्णन यांचाही सहभाग होता.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शासन यंत्रणेत एआयचा वापर वाढवून सक्षम डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा उभारण्यावर भर दिला जात आहे. राज्यातील शैक्षणिक संस्था आणि उद्योग क्षेत्र यामध्ये समन्वय वाढवून एआय-सक्षम मनुष्यबळ तयार करण्यावर शासन काम करत आहे. यासाठी मुंबईत राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात येईल. बदलत्या तंत्रज्ञानामुळे रोजगाराच्या संधींचे स्वरूप बदलत आहे आणि शिक्षण प्रणालीने त्यानुसार करावयाचे बदल यावर




विचारमंथन होईल. शासन, शिक्षण संस्था आणि नॅसकॉमसारख्या उद्योग संघटनांनी एकत्रितपणे काम केल्यास 'एआय' क्षेत्रात महाराष्ट्र अधिक वेगाने पुढे जाऊ शकतो, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अलीकडेच दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत ब्राझीलच्या मंत्र्यांनी भारताच्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या अनुभवाच्या आधारे स्वतःची प्रणाली विकसित करत असल्याचे सांगितले. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या बाबतीत भारत सध्या जागतिक नेतृत्व करत आहे. राज्यातील धोरणनिर्मिती आता 'पॉलिसी-लेड ग्रोथ' या मंत्रावर आधारित असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

जागतिक क्षमता केंद्र (जीसीसी) धोरण तयार करताना विविध उद्योग संघटनांचा सहभाग घेतला गेला. त्यानुसार पुणे शहर हे जीसीसी या परिसंस्थेत देशात अव्वल ठरल्याचे अहवालात नमूद झाले आहे. तसेच लॉजिस्टिक धोरणही लॉजिस्टिक कौन्सिलच्या सहभागातून तयार करण्यात आले असून ते भविष्योन्मुख असल्याचे त्यांनी सांगितले. पुरवठा साखळी व्यवस्थापनात लॉजिस्टिक्सची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होत असल्याने या क्षेत्रात एआयचा वापर वाढवण्यासाठी स्वतंत्र धोरण तयार करण्याचे काम सुरू आहे.

### कृषी क्षेत्रात 'अॅग्रीस्टॅक' आणि 'महाविस्तार' या 'एआय'चा वापर

» राज्यात नुकत्याच सुरू झालेल्या 'एआय' ४ अॅग्री समिट'चा उल्लेख करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, 'अॅग्रीस्टॅक' या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्याची जमीनधारणा, पिकांची माहिती आणि इतर तपशील एकत्रित केले जात आहेत. त्याचबरोबर 'महाविस्तार' या एआय अॅपद्वारे जनरेटिव्ह एआयचा वापर करून प्रत्येक नोंदणीकृत शेतकऱ्याला वैयक्तिक डिजिटल सहाय्यक उपलब्ध करून देण्यात येत आहे. सध्या ३० लाख शेतकरी या प्लॅटफॉर्मवर जोडले गेले आहेत. 'अँग्रीस्टॅक' आणि 'महाविस्तार' यांचा संगम शेतकऱ्यांसाठी उत्पादन खर्च २५ ते ४० टक्क्यांनी कमी करण्यास आणि शेतीतील अनिश्चितता कमी करण्यास नक्की मदत करेल.

---

## शाळांमध्ये झळकणार सरकारी योजनांचे फलक

### शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांचे निर्देश

**मुंबई : दि. २४** वृत्तसंस्था

मुंबई विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या अनेक योजना असून त्यांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे. यासाठी सर्व शाळांमध्ये प्रमुख पाच ते सहा योजनांची ठळक माहिती देणारे फलक प्रदर्शित केले जावे, असे निर्देश शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी दिले.

शालेय शिक्षण विभागाच्या विविध योजनांबाबत आढावा बैठक मंत्रालयात झाली. यावेळी मंत्री श्री.भुसे बोलत होते. बैठकीला शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजीतसिंग देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळाचे अध्यक्ष नंदकुमार बेडसे, शिक्षण संचालक ( एनसीईआरटी) हेमंत वसेकर, शिक्षण संचालक (माध्यमिक) महेश पालकर, शिक्षण संचालक (प्राथमिक) शरद गोसावी, उपसचिव तुषार महाजन व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री दादाजी भुसे म्हणाले, विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या वतीने अनेक योजना राबविल्या जातात. या योजनांची माहिती बऱ्याच वेळेला विद्यार्थ्यांना व पालकांना नसते. या योजनांपासून विद्यार्थी वंचित राहू नये म्हणून प्रयत्न केले जावे. प्रमुख योजनांची माहिती ठळक स्वरूपात तीन बाय चार आकाराच्या फलकाद्वारे प्रत्येक शाळेमध्ये दर्शनी जागी लावली जावी.

ते म्हणाले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेतून अनाथ विद्यार्थ्यांसह, तसेच ज्याचे दोन्ही पालक अपंग आहेत असे विद्यार्थी, पॉक्सो कायदा अंतर्गत नुसार पिडित विद्यार्थी आदींना शिक्षणासाठी दरमहा २०२५ रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने यासाठी नियुक्त संस्थांनी अशा बालकांचा शोध घेऊन त्यांची परिपूर्ण माहिती द्यावी. जिल्हा न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली समिती कडून यासाठी कार्यवाही केली जाते. एकल पालक असलेल्या विद्यार्थ्यांसाठी कोरोना कालावधी सुरू केलेली योजना आता नियमित स्वरूपात सुरू आहे असे शालेय शिक्षण मंत्री यांनी म्हटले.

---

## प्रज्ञा सातव यांच्यावर राजीनाम्यासाठी कोणाचा दबाव?




### विरोधी पक्षनेतेपद मिळू नये म्हणूनच खेळी, विरोधकांचा आरोप

**मुंबई : दि. २४** वृत्तसंस्था

दिवंगत काँग्रेस नेते राजीव सातव यांच्या पत्नी प्रज्ञा सातव यांनी दोन महिन्यांपूर्वी भाजपमध्ये प्रवेश करीत आपल्या विधान परिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिला.

त्यांचा राजीनामा मंजूर केल्याचे विधान परिषद सभापती राम शिंदे यांनी जाहीर केले. प्रज्ञा सातव या काँग्रेसमधून बिनविरोध निवडून गेल्या असल्याने विरोधकांनी सभागृहात आक्रमक पवित्रा घेतला.

प्रज्ञा सातव यांच्यावर राजीनाम्यासाठी कोणाचा दबाव होता, असा सवाल उपस्थित करताना विधान परिषदेत विरोधी पक्षनेता होऊ नये यासाठीच राजीनामा घेतल्याचा आरोप विरोधकांनी केला.

---

## सत्ताधारी आमदारांमध्येच सभागृहात जुंपली

### सुधीर मुनगंटीवारांच्या प्रश्नांनी योगेश कदमांची दमछाक

**मुंबई : दि. २४** वृत्तसंस्था

राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला काल सोमवारपासून सुरुवात झाली आहे. ६ मार्च शुक्रवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अर्थसंकल्प मांडणार आहेत. दरम्यान, राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस देण्याच्या मुद्द्यावरुन आज मंगळवारी अधिवेशनात लक्षवेधी मांडल्यानंतर सत्ताधारी आमदारांमध्येच चांगलीच जुंपल्याचं दिसून आलं. भाजपचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांनी या मुद्द्यावरुन नागरी अन्नपुरवठा विभागाचे राज्यमंत्री तथा शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) योगेश कदम यांना अक्षरशः फैलावर घेतलं. सुधीर मुनगंटीवार यांनी लक्षवेधीवर बोलताना मंत्र्यांनी अभ्यास करुन यायला हवे, नुसते बघतो, बैठक लावतो, असे बोलून चालत नाही, अशा शब्दांत योगेश कदमांना सुनावलं. योगेश कदम यांनी तांत्रिक मुद्दे उपस्थित करुन त्यांचा प्रतिवाद करण्याचा प्रयत्न केला. मात्र, एकूणच सुधीर मुनगंटीवारांच्या एकापाठोपाठ प्रश्नांच्या सरबत्तीमुळे योगेश कदम यांची चांगलीच भंबेरी उडाली.

राज्यातील तब्बल ७ लाख शेतकरी धानाच्या बोनसच्या घोषणेची वाट पाहत आहेत. १५ डिसेंबर २०२५ रोजी मी धान उत्पादक शेतकऱ्यांना घेऊन मुख्यमंत्र्यांना भेटलो होतो. तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात तात्काळ कार्यवाहीचे



आदेश दिले होते. त्यामुळे जानेवारीत धान उत्पादकांच्या बोनसचा जीआर निघेल, अशी अपेक्षा होती. पण सुरुवातीला जिल्हा परिषद निवडणुकांचे कारण देण्यात आलं. पण ही निवडणूक संपल्यानंतरही अद्यापपर्यंत धान उत्पादकांच्या बोनसचा जीआर निघालेला नाही. मुख्यमंत्र्यांनी १५ डिसेंबरला कार्यवाहीचे आदेश दिले होते. इतके स्पष्ट आदेश असतानाही माननीय राज्यमंत्र्यांचा अन्न नागरी पुरवठा विभाग अजूनही कुंभकर्णाचा बाप बनून झोपेत असेल तर, ही अधिवेशनातील पहिलीच लक्षवेधी होती. अधिवेशनात पहिलाच निर्णय शेतकऱ्यांच्या हिताचा होणे अपेक्षित होते. राज्यमंत्र्यांकडून धान उत्पादकांच्या बोनसबाबत ठोस आणि नेमक्या उत्तराची अपेक्षा होती, असं म्हणत सुधीर मुनगंटीवार यांनी कदमांना चांगलेच धारेवर धरले.

यावर योगेश कदम यांनी धान उत्पादकांना गेल्या तीन वर्षांमध्ये देण्यात आलेल्या बोनसची आकडेवारी मांडली. २०२२-२३ मध्ये बोनस म्हणून आपण ८२३ कोटी रुपयांचा निधी खर्च केला होता. २०२३-२४ मध्ये आपण १३७८ कोटी दिले आणि २०२४-२५ मध्ये १६२८ कोटी रुपयांचा निधी दिला. नोंदणीकृत शेतकऱ्यांना ही रक्कम दिली जाते. मात्र, ही रक्कम आणि धान खरेदीच्या गुणोत्तराचे प्रमाण याची फेरतपासणी होणे गरजेचे आहे, असे योगेश कदम यांनी म्हटलं.

### मुनगंटीवारांचा पारा चढला

» योगेश कदम यांच्या या उत्तरावर सुधीर मुनगंटीवारांचा पारा अधिक चढला. धान उत्पादक हा सगळ्यात गरीब शेतकरी असतो. अनुदानाची रक्कम वाढल्यामुळे निधीचा आकडा वाढला आहे. धान विक्री होवो अथवा न होवो, पोर्टलमध्ये नोंदणी असलेल्या शेतकऱ्यांना बोनस मिळाला पाहिजे. मात्र, धानाचा बोनस देण्याची वेळ येते तेव्हा चर्चा आणि मंथन सुरु होते, हे योग्य नाही. विधानसभेत लक्षवेधी असली की उत्तर देण्यासाठी मंत्री महोदयांनी अभ्यास करायला हवा. लक्षवेधीवर अशाप्रकारे उत्तर देणे हा संविधानाचा अपमान आहे. १५ डिसेंबरला मुख्यमंत्र्यांनी आदेश दिल्यावर अजून त्याबाबत अन्न नागरी पुरवठा विभागाने कोणतीही तयारी केलेली नाही, असे सुधीर मुनगंटीवार यांनी योगेश कदमांना सुनावले.

---

# वेळेत निदान करा, कर्करोगावर मात करा!

## आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांचे राज्यातील जनतेला आवाहन

**मुंबई : दि. २४** वृत्तसंस्था

राज्यात सर्व प्रकारच्या कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे. कर्करोगाच्या तातडीने निदानासाठी सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये तपासणी करण्यात येत आहे. तपासणीसाठी नागरिकांमध्ये जागृती वाढविण्यात येत असून नागरिकांनी या तपासणीसाठी पुढे यावे, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले. कर्करोग तपासणीसाठी राज्यात सध्या आठ वाहने असून यांची संख्या वाढवून सर्व जिल्ह्यांमध्ये वाहने उपलब्ध करुन दिली जातील, असे त्यांनी सांगितले. महिलांमधील स्तनाच्या कर्करोगासंदर्भातील तपासणीवर भर देण्यात येत असून याअंतर्गत ३ कोटी २० लाख महिलांची तपासणी करण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

कर्करोगाचे वेळेत निदान व्हावे : कर्करोगाचे वेळेत निदान व्हावे यासाठी उपाययोजना करण्यासंदर्भात सदस्य सुनील प्रभू यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. सदस्य सर्वश्री अमीन पटेल, रईस शेख, बाबासाहेब देशमुख, भास्कर जाधव, राजकुमार बडोले, शेखर निकम, दिलीप लांडे, तमिल सेल्वन, समीर कुणावार, किशोर पाटील, सुलभा खोडके, देवयानी फरांदे आदींनी या अनुषंगाने



झालेल्या चर्चेत सहभाग घेतला. या लक्षवेधीला उत्तर देताना आरोग्यमंत्री आबिटकर बोलत होते.

मोफत उपचाराची तरतूद : आयुष्मान भारत आणि महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत मोफत उपचाराची तरतूद करण्यात आली आहे. किमो थेरपी आणि रेडिएशनसाठी उपचारांच्या खर्चाचा या योजनेत समावेश असून पेट स्कॅनची सुविधा महात्मा फुले जनआरोग्य योजनेमध्ये सुरू करण्याबाबत शासन सकारात्मक निर्णय घेईल, असे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी यासंदर्भातील चर्चेच्या उत्तरात सांगितले.

---

**छत्रपती संभाजीनगरातील घटना** | अतिरक्तस्रावाने हृदयद्रावक अंत

## गर्भपाताच्या गोळ्या घेतल्या, २८ वर्षीय महिलेला पडले महागात

**अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २४ :** : जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यातील घाट नांद्रे परिसरात एक हृदयद्रावक आणि खळबळजनक घटना समोर आली आहे. गर्भपातासाठी घेतलेल्या गोळ्यांचं सेवन एका २८ वर्षीय महिलेच्या जीवावर बेतले असून, तब्बल १३ दिवसांच्या मृत्यूशी झुंझीनंतर या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या घटनेनं संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली आहे.

आयशा समीर मुल्ला (रा. घाट नांद्रे) असं मृत महिलेचं नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आयशा यांनी १० फेब्रुवारीच्या सुमारास




गर्भपाताच्या गोळ्यांचे सेवन केले होते. त्यानंतर त्यांना अचानक त्रास जाणवू लागला आणि मोठ्या प्रमाणावर अतिरक्तस्राव सुरू झाला.

प्रकृती खालावल्याने नातेवाईकांनी त्यांना तातडीने सिल्लोड येथील एका खासगी रुग्णालयात दाखल केले. तेथे सुमारे १० दिवस त्यांच्यावर उपचार करण्यात आले, मात्र प्रकृतीत कोणतीही सुधारणा न झाल्याने आणि प्रकृती अधिकच चिंताजनक बनल्याने त्यांना पुढील उपचारांसाठी छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय घाटी रुग्णालयात हलवण्यात आले. घाटी रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना वाचवण्याचे शर्थीचे प्रयत्न केले. मात्र, काल सोमवारी रोजी पहाटे साडेचार वाजेच्या सुमारास उपचार सुरू असतानाच आयशा यांचा मृत्यू झाला. गर्भपाताच्या गोळ्यांच्या सेवनानंतर झालेल्या अतिरक्तस्रावामुळेच त्यांचा जीव गेल्याचे प्राथमिक माहितीवरून समोर आले आहे.

**सिल्लोडमध्ये बेकायदेशीर औषध विक्रीचे जाळे?**

या घटनेमुळे सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. मात्र, या प्रकरणाने अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. या गोळ्या आयशा यांनी स्वतःहून मेडिकलवरून विकत घेतल्या होत्या की त्यांना कोणीतरी त्या बेकायदेशीरपणे उपलब्ध करून दिल्या होत्या, याचा तपास आता पोलीस करत आहेत. परिसरात यापूर्वीही अशा प्रकारचे अवैध प्रकार समोर आले असल्याने, पोलिसांनी सखोल तपास केल्यास औषध विक्री करणाऱ्या मोठ्या टोळीचे पितळ उघडे पडण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

**छत्रपती संभाजीनगरमध्ये मध्यरात्री काय घडलं?**

जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील चांगतपुरी गावाजवळ काल रात्री एक भीषण अपघात झाला. चालकाचा ताबा सुटल्याने कार थेट उजव्या कालव्यात कोसळली. या दुर्घटनेत कारमधील पती-पत्नीसह त्यांना वाचवण्यासाठी पाण्यात उतरलेला स्थानिक तरुण असे तिघेजण बेपत्ता झाले आहेत. या घटनेमुळे गावात खळबळ उडाली असून पोलिसांकडून शोधकार्य सुरू आहे.

---

## कुऱ्हाड अन् लोखंडी रॉडने जीवघेणा हल्ला

**बारामती :** राज्यासह देशभरात गुन्हेगारी वाढली आहे. दररोज वेगवेगळ्या भागातून खून, खुनाचा प्रयत्न, लुटमार यासारख्या घटना घडत आहेत. वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे नागरिकांमध्ये भिती पसरत आहे. अशातच आता बारामतीतून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. हॉटेलच्या बिलावरून झालेल्या वादातून बारामती शहरातील मोरगाव रस्ता परिसरात एका ५३ वर्षीय व्यक्तीवर कुऱ्हाड आणि लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला कल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी दोघांना ताब्यात घेतले असून, जखमीवर तातडीने उपचार केल्याने त्यांचे प्राण वाचले आहेत. या घटनेतील मुख्य आरोपीसह दोघे अद्याप फरार आहेत. या प्रकरणी जखमी महेंद्र धोंडिबा गायकवाड (वय ५३, रा. खांडज) यांनी बारामती शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

## महत्त्वाचे

### ...तर आता आई-वडिलांना सांगावेच लागणार

**अहमदाबाद :** लग्न म्हटलं की आयुष्यातील आनंदाचा क्षण असतो. काही जण अरेंज मॅरेज अर्थात ठरवून पारंपारिक पद्धतीने तर काही जण लव्ह मॅरेज करतात. पण, लव्ह मॅरेज करताना अनेकदा संबंधित तरुण अथवा तरूणीच्या आई-वडिलांना कोणतीही माहिती मिळत नसे. मात्र, आता असे होणार नाही. गुजरात सरकारने विवाह नोंदणी नियमांमध्ये महत्त्वपूर्ण बदल प्रस्तावित केले आहेत. त्यानुसार, लव्ह मॅरेज संदर्भात आई-वडिलांना याची माहिती द्यावीच लागणार आहे. गुजरातचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री हर्ष संघवी यांनी राज्य विधानसभेत गुजरात विवाह नोंदणी कायद्यात सुधारणा करण्याचा प्रस्ताव मांडला. आंतरधर्मीय विवाहांमध्ये बनावट विवाह आणि लपवलेली ओळख रोखण्यासाठी हे पाऊल उचलले जात असल्याचे सरकारने म्हटले आहे. या प्रस्तावानुसार, वधू आणि वरांना आता विवाह नोंदणी करताना एक घोषणापत्र सादर करावे लागेल, ज्यामध्ये त्यांनी त्यांच्या पालकांना लग्नाबद्दल माहिती दिली आहे की नाही हे नमूद करावे लागेल. अर्जात दोन्ही पालकांचे नाव, पत्ता, आधार क्रमांक आणि मोबाईल नंबर आवश्यक असेल.

दरम्यान, अर्जाची तपासणी केल्यानंतर, सहाय्यक निबंधक १० कामकाजाच्या दिवसांत पालकांना व्हॉट्सॲप, ई-मेल किंवा इतर माध्यमातून सूचना पाठवतील.

### भाजप नेत्याने मुस्लिम महिलेकडून हिसकावली चादर

**जयपूर:** राजस्थानमधील टोंक येथे एका ब्लँकेट वाटप कार्यक्रमादरम्यान भाजपचे माजी खासदार सुखबीर सिंह जौनपुरिया यांनी एका मुस्लिम महिलेला तिचा धर्म विचारल्यानंतर दिलेले ब्लँकेट परत घेतल्यावरून वाद निर्माण झाला आहे. निवाई तहसीलमधील करेडा गावातील एका मंदिर परिसरात ही घटना घडली. त्यावेळी जौनपुरिया हे २८ फेब्रुवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अजमेर दौऱ्यासाठी लोकांना आमंत्रित करण्यासाठी गेले होते. स्थानिकांच्या मते, सुरुवातीला कार्यक्रमात उपस्थित असलेल्या महिलांना ब्लँकेट वाटण्यात आले. परंतु एका मुस्लिम महिलेकडून ते परत घेण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदींना शिवीगाळ करणाऱ्यांना ब्लँकेट घेण्याचा अधिकार नाही. हा कार्यक्रम त्यांचा वैयक्तिक उपक्रम होता आणि कोणत्याही सरकारी योजनेशी जोडलेला नाही,' असे जौनपुरिया या व्हिडीओ क्लिपमध्ये म्हणताना दिसून येत आहेत. अनेक काँग्रेस नेत्यांनी या घटनेचा व्हिडीओ शेअर केला ज्यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना शिवीगाळ करणाऱ्यांना ब्लँकेट घेण्याचा अधिकार नाही, असे म्हणत असल्याचे दिसून आले आहे.


# 'शेतकरी' या व्याख्येत महिलांचा समावेश करावा

## २०२६ परिषदेत तज्ज्ञांची शिफारस

**मुंबई: दि.२४ वृत्तसंस्था**

शाश्वत शेती आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता प्रभावी ठरत असतानाच, या तंत्रज्ञानात लिंग-संवेदनशीलता जपणे अत्यावश्यक आहे. महिलांना कृषी नवोपक्रमात समान भागीदार म्हणून मान्यता दिली पाहिजे.महिलांची डिजिटल साक्षरता वाढवली पाहिजे. ''शेतकरी'' या व्याख्येत महिलांचा समावेश करण्याची, समान वेतन सुनिश्चित करण्याची आणि महिलांसाठी अनुकूल कर्ज व विस्तार सेवा उपलब्ध करून देण्याची शिफारस करावी, असे मत नामवंत तज्ज्ञांनी व्यक्त केले.

एआय ॲग्री २०२६ परिषदेच्या दुसऱ्या दिवशी, 'समतेसाठी कोडिंग: लिंग-संवेदनशील कृषी-एआय परिसंस्थेसाठी धोरणात्मक उपाय' या विषयावर समांतर सत्र पार पडले. डेटा अंतर्दृष्टीच्या प्रमुख सुरभी भाटिया यांनी या सत्राचे समन्वय केले. सत्राचे सार मांडताना



सुरभी भाटिया यांनी बारामतीच्या निंबुत येथील संगीता जाधव या महिला शेतकऱ्याची गोष्ट सांगितली. संगीता जाधव ऊसाच्या शेतावर ड्रोनच्या सहाय्याने अवघ्या सात मिनिटांत एका एकरावर खत फवारणी करतात. गावात त्यांना प्रेमाने ''ड्रोन दीदी'' म्हणून ओळखले जाते. तंत्रज्ञान जर योग्य पद्धतीने महिलांपर्यंत पोहोचले, तर ते किती मोठे परिवर्तन घडवू शकते, याचे संगीता जाधव या जिवंत उदाहरण आहेत.

आंतरराष्ट्रीय कृषी संशोधनासाठी सल्लागार समूहाच्या (सीजीआयएआर) प्रमुख रंजिता पुस्कुर,आंतरराष्ट्रीय अन्न धोरण संशोधन संस्थेचे (आयएफपीआरआय) वरिष्ठ संशोधन विश्लेषक इलियट गार्सिया, पीक आरोग्य धोरण सहाय्य संशोधन संस्थेचे संयुक्त संचालक डॉ. ए. अमरेंद्र रेड्डी, निकोरे असोसिएट्सच्या संस्थापक मिताली निकोरे यांनी या चर्चासत्रात सहभाग घेतला.

या सत्रात तंत्रज्ञान क्षेत्रात काम करणाऱ्या कोडरपासून ते धोरणकर्त्यांपर्यंत सर्वांनीच 'जेंडर-न्यूट्रल' ऐवजी 'जेंडर-रिस्पॉन्सिव्ह' (लिंग-संवेदनशील) दृष्टीकोन ठेवण्याचे आवाहन केले. संगीता जाधव यांच्यासारख्या असंख्य 'ड्रोन दीदी' निर्माण झाल्या तरच कृषी क्षेत्रातील डिजिटल दरी खऱ्या अर्थाने कमी होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. रंजीथा पुस्कूर यांनी एआय मॉडेल्समध्ये लिंग-आधारित डेटाचे महत्त्व आणि स्थानिक भाषांचा समावेश यावर विशेष भर दिला. अनेक एआय साधने इंग्रजी आणि पाश्चात्य डेटावर आधारित असतात, ज्यामुळे स्थानिक विषय दुर्लक्षित राहतात. लिंग-आधारित डेटा संकलन हे ऐच्छिक न ठेवता अनिवार्य करणे आवश्यक आहे, जेणेकरून कृषी कार्यक्रमांमध्ये महिलांचा सहभाग आणि उत्तरदायित्व सुनिश्चित होईल असे मत त्यांनी व्यक्त केले. एलियट गार्सिया यांनी जबाबदार एआय धोरणांवर लक्ष केंद्रित केले. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की एआय कधीही तटस्थ नसते,'' कारण डेटा-आधारित साधनांना सामाजिक आणि राजकीय परिणाम असतात. त्यांनी ठोस जोखीम मूल्यमापन करण्याचे आणि स्थानिक सामाजिक संरचनांमध्ये विश्वास निर्माण करण्याचे समर्थन केले. उदाहरण म्हणून त्यांनी माओरी डेटा सार्वभौमत्व मॉडेलचा उल्लेख केला, जिथे समुदाय डेटा सह-मालकी हक्काने ठेवतो आणि त्याच्या वापरासाठी संमती देतो असे सांगितले. डॉ. ए. अमरेंद्र रेड्डी यांनी कृषी क्षेत्रातील महिलांच्या दीर्घकालीन, परंतु अनेकदा दुर्लक्षित योगदानावर प्रकाश टाकला. त्यांनी ऐतिहासिक उदाहरण म्हणून मध्ययुगीन महाराष्ट्रातील महिलांनी संकलित केलेल्या ''कृषी विश्वकोशां''चा उल्लेख केला. त्यांनी आजही अस्तित्वात असलेल्या असमानतेकडे लक्ष वेधले महिला शेतकऱ्यांना सामान्यतः कमी वेतन मिळते आणि त्यांच्याकडे पुरुषांच्या तुलनेत कमी जमीनमालकी असते.

## मोदींच्या दौऱ्याआधी इस्रायलमध्ये घमासान; बहिष्काराचा इशारा

**तेल अविव: दि.२४ वृत्तसंस्था**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यापूर्वी इस्रायलमधील राजकारण तापलं आहे. पंतप्रधान मोदी नेसेटमध्ये (इस्रायलची संसद) भाषण करण्याची दाट शक्यता आहे. इस्रायलच्या संसदेतील विरोधी पक्षनेते याइर लॅपिड यांनी मोदींच्या भाषणावर बहिष्काराची धमकी दिली आहे. पंतप्रधान मोदी २५ फेब्रुवारीला इस्रायलला जाणार आहेत. त्यांचा दौरा २ दिवसांचा असेल.

सर्वोच्च न्यायालयाचे अध्यक्ष न्यायमूर्ती आयजॅक अमित यांना विशेष सत्रासाठी आमंत्रित न केल्यास पंतप्रधान मोदींच्या भाषणावर बहिष्कार घालू, असा इशारा विरोधी पक्षनेते लॅपिड यांनी दिला आहे. पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्या सत्ताधारी आघाडीकडून देशातील प्रमुख न्यायाधीशांना सातत्यानं दुर्लक्षित केलं जात आहे. या विरोधात लॅपिड यांनी ठाम भूमिका घेतली आहे. नेतन्याहू शिष्टाचाराचं उल्लंघन करुन न्याय व्यवस्थेचं महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न करत असल्याचा दावा विरोधी पक्ष करत आहेत.

सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांवर सत्ताधारी आघाडी बहिष्कार घालत असेल, त्यांना भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासाठी आयोजित केल्या जाणाऱ्या विशेष सत्रासाठी बोलावणार नसेल तर आम्ही त्या चर्चेत सहभागी होणार नाही, अशी स्पष्ट भूमिका इस्रालयच्या संसदेत बोलताना याइर लॅपिड यांनी मांडली. सरन्यायाधीश अमित यांना सत्ताधारी आघाडीकडून जाहीरपणे बहिष्कृत केलं जात आहे. हा प्रकार अतिशय निंदनीय आहे, असं लॅपिड म्हणाले.

आमच्यामुळे भारताची नाचक्की व्हावी असं वाटत नाही. एक अब्जपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या देशाचे पंतप्रधान इथे येऊन निम्म्या रिकामी असलेल्या नेसेटला (संसद) संबोधित करतील, हे ठीक दिसणार नाही. यामुळे भारतीय दूतावासदेखील चिंतेत आहे, असं लॅपिड म्हणाले. जानेवारी २०२५ मध्ये न्यायमूर्ती अमित यांची सर्वोच्च न्यायालयाच्या अध्यक्षपदी निवड झाली.

## भारतात पंतप्रधान मोदींनंतर सर्वात जास्त सुरक्षित कोण?

**नवी दिल्ली : दि.२४ वृत्तसंस्था**

भारतात अनेकांना सरकारकडून सुरक्षा प्रदान करण्यात येते. क्रेंद्र आणि राज्यातील नेते आणि दिग्गज व्यक्तींना देखील सरकारकडून सुरक्षा प्रदान करण्यात येते. पण भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यानंतर कोणाला अधिक सुरक्षा देण्यात येते आसा प्रश्न देखील तुम्हाला पडला असेल. आपल्या भारतात देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी सर्वात सुरक्षित आहे. तर त्यांच्यानंतर कोणाला तगडी सुरक्षा मिळते? त्या व्यक्तीचं पद आणि नाव ऐकून तुम्ही देखील थक्क व्हाल.. सांगायचं झालं तर, भारतात फक्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे एसीजी सेक्युरिटी आहे. सध्या पंतप्रधान मोदींशिवाय इतर कोणाकडेही ही सुरक्षा व्यवस्था नाही. पण पंतप्रधानांनंतर सर्वात मजबूत सुरक्षा व्यवस्था कोणाकडे आहे? याबद्दल फार कमी लोकांना माहिती आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भारतातील सर्वात कडक सुरक्षा प्रदान करण्यात येते याचा अर्थ असा की सुरक्षेच्या बाबतीत देशात कोणीही पंतप्रधान मोदींपेक्षा वरचढ नाही. पूर्वी अशीच सुरक्षा व्यवस्था पंतप्रधानांच्या कुटुंबियांना देखील प्रदान करण्यात येत होती. पण आती ही सुरक्षा व्यवस्था फक्त आणि फक्त पंतप्रधान मोदी यांच्यासाठी काम करते पण पंतप्रधान मोदींनंतर भारतात सर्वात सुरक्षित कोण आहे? म्हणजेच, पंतप्रधानांनंतर कोणत्या नेत्याला सर्वात कडक सुरक्षा व्यवस्था आहे? असा प्रश्न समोर आल्यानंतर, तुमच्या डोक्यात गांधी कुटुंबियांचं किंवा राहुल गांधी याचं नाव आलं असेल. पण असं नाही या यादीमध्ये राहुल गांधी यांचं नाव नाही.नेत्याचं पद आणि नाव देशात पंतप्रधान यांच्यानंतर सर्वात जास्त सुरक्षा गृहमंत्रांना दिली जाते. म्हणजे, देशात मोदी यांच्यानंतर अमित शहा सर्वात जास्त सुरक्षित व्यक्ती आहेत. गृह मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, अमित शाह यांना झेड प्लस सुरक्षा मिळते, जी पंतप्रधान वगळता सर्वोच्च पातळीची सुरक्षा आहे.

## अविमुक्तेश्वरानंदांवर लैंगिक शोषणाच्या आरोपासाठी मला पैशांची ऑफर

### रामाशंकर दीक्षित यांचा खुलासा

**प्रयागराज: दि.२४ वृत्तसंस्था**



प्रयागराजमध्ये स्वामी अविमुक्तेश्वरानंद यांच्याविरुद्ध दाखल झालेल्या लैंगिक शोषणाच्या खटल्यात एक मोठा ट्विस्ट आला आहे. वाराणसीच्या शाहजहांपूरचे रामशंकर दीक्षित यांनी काही गंभीर खुलासे केले आहेत.'' माझा आणि माझ्या मुलींचा वापर शंकराचार्य यांच्यावर लैंगिक शोषणाचे आरोप करण्यासाठी आणि त्यांना अडकवण्यासाठी केल्या खुलासा केला आहे. रमाशंकर दीक्षित यांच्या आरोपांमुळ एकच खळबळ उडाली आहे.

रमाशंकर दीक्षित यांनी नुकतील पत्नी आणि तीन मुलींसह वाराणसीतील विद्या मठ आश्रमात शंकराचार्यांची भेट घेतली आणि आपबीती सांगितली. ''१८ फेब्रुवारी रोजी तीन अज्ञात लोक आमच्या घरी आले आणि आमच्या वडिलांच्या नावाचा संदर्भ देत त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. त्यानंतर त्यांनी व्हॉट्सॲप कॉलद्वारे आशुतोष महाराज यांच्याशी संपर्क साधला. आशुतोष महाराज यांनी मुलींच्या माध्यमांतून वाराणसी आश्रमातील स्वामी शंकराचार्य यांच्यावर लैंगिक शोषणाचे आरोप करण्यास सांगितले. त्यासाठी आम्हाला कुठेही जाण्याची गरज नाही, पण आरोपांच्या प्रतिज्ञापत्रावर सही करण्याच्या बदल्यात आम्हाला मोठी आर्थिक मदत दिली जाईल, असेही सांगण्यात आले, पण आम्ही नकार दिल्यास त्याचे गंभीर परिणामही भोगावे लागतील, अशी धमकीही आम्हाला देण्यात आली होती. असा खळबळजनक दावा रमाशंकर दीक्षित यांनी केला आहे. या नवीन खुलाशानंतर, शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद यांनी हे त्यांच्याविरुद्ध एक मोठे राजकीय आणि धार्मिक षड्यंत्र असल्याची प्रतिक्रीया दिली आहे. गोहत्येविरुद्ध आपण आक्रमकपणे बोलत असल्याने, लोकांना पैशांची आमिषे देऊन माझी बदनामी केली जात आहे, अशी घणाघाती टिका शंकराचार्य यांनी केली आहे. तसेच माझ्याविरूद्ध कोहणतीही सीडी किंवा पुरावे सापडल्यास त्यांनी ते सार्वजनिक करावेत, असे खुले आव्हानही त्यांनी दिले आहे.

## ब्रिटनमध्ये व्हिसा बंदीची तयारी; लाखो लोकांना हद्दपारही करणार?

**लंडन : दि.२४ वृत्तसंस्था**




एक मोठे खळबळजनक वृत्त मिळाले आहे. येत्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ब्रिटनच्या रिफॉर्म युके पक्षाने मोठी घोषणा केली आहे. पक्षाने सत्तेत आल्यानंतर देशातील बेकायदेशीर स्थलांतर रोखण्यासाठी कठोर उपाययोजनांचे आश्वासन दिले आहे. ब्रिटनची सीमा सुरक्षा मजबूत करणे आणि अवैध स्थलांतरितांना हद्दपार करणे याचा उद्देश असणार आहे.

अमेरिकेच्या प्रणालीवर आधारित नवीन संस्थेचा स्थापना

रिफॉर्म युके पक्षाने ब्रिटनमध्ये अमेरिकन एजन्सी वर आधारित युके डिपोर्टेशन कमांड नावाची संस्था स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. या संस्थेअंतर्गत दरवर्षी सुमारे २,८८,००० बेकायदेशीर स्थलांतरितांना त्यांच्या मायदेशात पत पाठवण्यात येणार आहे.

रिफॉर्म युकेने पक्षाने पाकिस्तानसह काही देशांवर व्हिसा बंदीचाही प्रस्तावर मांडला आहे. यामध्ये पाकिस्तान, समोलिया, इरीट्रिया, अफगाणिस्तान, सीरिया आणि सूडान या देशाचा समावेश आहे. या देशांमधून ब्रिटनमध्ये अनेक बेकायदेशीर स्थलांतरित प्रवेश करतात असे पक्षाने म्हटले आहे.

## दिल्लीहून निघालेल्या विमानाची आपत्कालीन लँडिंग

**नवी दिल्ली: दि.२४ वृत्तसंस्था**

अजित पवार यांच्या विमान अपघाताची घटना ताजी असताना रांचीहून दिल्लीला निघालेल्या विमानाचा भीषण अपघात झाला. आता यानंतर दिल्लीहून धक्कादायक बातमी येत आहे. नुकताच एका विमानाचे आपत्कालीन लँडिंग करण्यात आलंय. अजित पवार यांच्या विमान अपघाताची घटना ताजी असतानाच आता रांचीहून दिल्लीकडे जाणाऱ्या विमानाचा भीषण अपघात झाला. या विमान अपघातात ७ जणांचा मृत्यू झाला. आता या घटनेला काही तास उलटत नाहीत तोवरच अजून एक धक्कादायक घटना पुढे आली. दिल्लीहून लेहला निघालेल्या विमानाची आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. विमानात काहीतरी मोठी घडल्याचे सांगितले जात आहे. पायलटने सावधानता बाळगत विमानाचे आपत्कालीन लँडिंग करण्याचा निर्णय घेतला. उड्डाणानंतर काही वेळातच पुन्हा हे उड्डाण दिल्लीमध्ये परतले. काही मिनिटात विमान परत लँडिंग करत असल्याने खळबळ उडाली. स्पाइसजेट कंपनीच्या विमानाने सकाळीच दिल्ली विमानतळाहून लेह करिता उड्डाण घेतले. मात्र, उड्डाणानंतर लेहला जाण्याऐवजी विमान पुन्हा दिल्ली विमानतळावर परतले.

मिळालेल्या माहितीनुसार, स्पाइसजेटचे विमान सकाळी आपल्या नियोजित वेळेनुसार, दिल्ली विमानतळाहून लेहकडे निघाले. मात्र, उड्डाणाच्या काही वेळातच पायलटच्या लक्षात आले की, विमानात आगीसारखे काही सुरू आहे, आगीच्या ठिगण्या विमानात पडत होत्या. ही गोष्टी पायलटच्या लक्षात येताच त्यांनी आपत्कालीन लँडिंग करण्याचा निर्णय घेतला. ज्यावेळी आगीच्या ठिगण्या विमानातून निघत होत्या, त्यावेळी प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण बघायला मिळाले, प्रवासी घाबरले होते. हेच नाही तर विमानातील एका प्रवाशाने या घटनेचा व्हिडीओ देखील आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात सूट केला. या व्हिडीओमध्ये स्पष्टपणे आगीच्या ठिंगण्या दिसत आहेत. विमानात स्पष्टपणे आगीसारखी गोष्टी दिसली.

या घटनेनंतर सर्व प्रवाशांना विमान कर्मचाऱ्यांकडून शांत करण्यात आले आणि लेहऐवजी परत दिल्ली विमानतळाकडे हे विमान नेण्यात आले.

## कॅनडा सरकार ॲक्शन मोडमध्ये; कार्नी यांच्या भारत भेटीपूर्वी मोठी कारवाई

**ओटावा : दि.२४ वृत्तसंस्था**

भारतासाठी एक मोठे वृत्त आहे. कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी भारताच्या दौऱ्यावर येणार आहेत. यापूर्वी कॅनडा सरकारने दहशतवादाविरोधात मोठी कारवाई केली आहे. मिडिया रिपोर्टनुसार, कॅनडा सरकारने २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातील मुख्य आरोपी तहव्वुर राणाविरोधात मोठे पाऊल उचलले आहे. कॅनडाने तहव्वुर राणाचे कॅनेडियन नागरिकत्व रद्द करण्याचा निर्णय घेतला असून प्रक्रियेला सुरुवात केली आहे. हा भारतासाठी मोठा विजय मानला जात आहे.

२६/११ च्या मुंबईतील दहशतवादी हल्ल्यातील मुख्य संशयित तहव्वुर हुसेन राणा पाकिस्तानी-कॅनेडियन नागरिक आहे. तहव्वुर राणा पूर्वी पाकिस्तानी सैन्यात डॉक्टर म्हणून कार्यरत होता. १९९० च्या दशकात तो कॅनडाला गेला आणि २००१ मध्ये त्याला कॅनेडियन नागरिकत्व मिळाले. यानंतर तो शिकागोत स्थायिक झाला. शिकोगमध्ये राणाने इमिग्रेशन कन्सल्टन्सीसह अनेक व्यवसाय सुरू केले. राणावर लष्कर-ए-तोयबाशी संबंध असल्याचा आणि दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असल्याचा आरोप आहे. मुंबईतील दहशतावादी हल्ल्यात १७४ लोकांचा मृत्यू तर ३०० हून अधिक जखमी झाले होते.

## हरदीपसिंग पुरींच्या मुलीचे नाव अमेरिकेतील 'अनक्लेम्ड प्रॉपर्टी' यादीत

**मुंबई, दि.२४ वृत्तसंस्था**



केंद्रीय मंत्री हरदीपसिंग पुरी आणि त्यांची मुलगी हिमायनी पुरी यांच्याबद्दल राजकीय आणि सोशल मीडिया वर्तुळात अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. हे प्रकरण अमेरिकेत प्रसिद्ध झालेल्या 'अनक्लेम्ड प्रॉपर्टी' (दावा न केलेली मालमत्ता) नोटीसशी संबंधित आहे, ज्यामध्ये ८ एप्रिल २०२२ रोजी प्रसिद्ध झालेल्या एका यादीत हिमायनी पुरी यांचे नाव समोर आले आहे. ही नोटीस 'मॅसॅच्युसेट्स म्युच्युअल लाइफ इन्शुरन्स कंपनी 'कडून देण्यात आली होती. हिमायनी पुरी यांचे नाव 'रिअलम पार्टनर्स एलएलसी या कंपनीशी जोडले गेले आहे.

२०१४ मध्ये या कंपनीला सुमारे २८ कोटी डॉलर्स (साधारण २,४०० कोटी रुपये) गुंतवणूक मिळाली आणि २०१४-१५ दरम्यान एकूण फंडिंग ५,७०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचले, असा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, हरदीप पुरी यांनी एप्स्टीनशी कोणत्याही वैयक्तिक संबंधांचा इन्कार केला असला, तरी एका ईमेलमध्ये हरदीप पुरी आपली मुलगी हिमायनीच्या वतीने एस्टीनचे आभार मानत असल्याचे बोलले जात आहे.

अमेरिकेतील वित्तीय संस्था वेळोवेळी अशा खात्यांची किंवा मालमत्तेची यादी जाहीर करतात, ज्यावर दीर्घकाळ कोणीही दावा केलेला नाही. २०२२ च्या नोटीसमध्ये हिमायनी पुरी यांचे नाव आल्यानंतर ही मालमत्ता नक्की काय आहे नगद, विमा रक्कम, गुंतवणूक किंवा इतर काही, असा प्रश्न उपस्थित झाला. विशेष म्हणजे, २०२३, २०२४ आणि २०२५ च्या नोटीसमध्येही त्यांचे नाव असल्याचे सांगण्यात येत आहे. सोशल मीडियावर या प्रकरणाचा संबंध अमेरिकन गुन्हेगार जोफ्री एप्स्टीनशी जोडण्याचा प्रयत्न होत आहे. ही मालमत्ता अशा नेटवर्कशी संबंधित आहे का, ज्यामुळे त्यावर दावा केला जात नाहीये? असे सवाल विचारले जात आहेत. तथापि, या दाव्यांची अधिकृत पुष्टी झालेली नाही. मंत्री पुरी यांनी यापूर्वीच स्पष्ट केले की, एफटीनच्या कोणत्याही गुन्हेगारी कृत्याशी त्यांचा संबंध नाही आणि ते त्याला केवळ व्यावसायिक कारणांमुळे काही प्रसंगी भेटले होते. अमेरिकन सरकारच्या सार्वजनिक नोंदींनुसार, एका विशिष्ट मालमत्तेच्या संदर्भात हरदीप सिंह पुरी यांचे नाव सातत्याने समोर येत आहे. ''२०२२ पासून सुरू झालेला हा प्रकार २०२३, २०२४ आणि २०२५ च्या सरकारी नोटिसांमध्येही कायम असल्याचे दिसून आले आहे.

**आनंदाचे वातावरण** | १६ व्या शतकातील जुन्या चर्चला मिळाले युनेस्कोच्या टॉप १० मध्ये स्थान

# वसईचा ऐतिहासिक वारसा जागतिक पटलावर!

**मुंबई, दि.२४ वृत्तसंस्था**



वसईतील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाच्या वास्तूने आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली छाप उमटवली. शतकानुशतके उभ्या असलेल्या या वारसा स्थळाच्या संवर्धन कार्याची दखल घेत जागतिक पातळीवर मोठा सन्मान जाहीर करण्यात आला आहे.

वसईतील पापडी वारसा येथील प्रतिष्ठित अवर लेडी ऑफ ग्रेस कॅथेडलला सांस्कृतिक संवर्धनासाठी २०२५ च्या युनेस्को आशिया-पॅसिफिक मेरिट पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. बँकॉक येथे पार पडलेल्या सन्मान सोहळ्यात ही घोषणा करण्यात आली. युनेस्कोने जाहीर केलेल्या या सर्वोत्कृष्ट दहा संवर्धन प्रकल्पात वसईतील पापडी येथील ४७५ वर्ष जुन्या अवर लेडी ऑफ ग्रेस कैथेड्रलचाही समावेश आहे. वसईतील खीस्ती चांधवांमध्ये उत्साह व आनंदाचे वातावरण पसरले आहे.

मुंबईचे प्रसिद्ध वास्तुविशारद संस्था सवानी हेरिटेज कॉन्सव्र्हेशन, वसईतील गिरिज येथील सिक्वेरा फाइन आर्ट आणि स्थानिक कुशल कामगारांच्या मदतीने २०२३-२४ वर्षात चर्चच्या जीणर्णोद्धाराचे काम करण्यात आले. तसेच चर्चच्या गाभाऱ्याचा भाग लाकडाच्या कोरीवकामाने सजवण्यात आला आहे. २००० सालापासून दरवर्षी युनेस्कोकडून सांस्कृतिक वारसा जपणाऱ्या विविध देशातील वास्तु, वसाहती आणि प्रकल्पांना आशिया-पॅसिफिक पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यंदा या पुरस्काराला २५ वर्षे पूर्ण झाले असून रौप्य महोत्सवी वर्षात, आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील १० उत्कृष्ट प्रकल्पांना त्यांच्या संवर्धन कार्यासाठी सन्मानित करण्यात आले आहे.

### वास्तूचे संवर्धन करण्यासाठी सुमारे ४.७५ कोटी

वसईतील सोळाव्या शतकात पौर्तुगीज होते. या कालखंडात पापडी येथे हे चर्च सोळाव्या शतकातील पोर्तुगीज स्थापत्यशैलीचा एक उत्कृष्ट नमुना असून या ऐतिहासिक वास्तूचे संवर्धन करण्यासाठी सुमारे ४.७५ कोटी रुपयाचा निधी गोळा करण्यात आला होता. या चर्चच्या नूतनीकरणाचे वैशिष्ट्य म्हणजे सिमेटचा वापर न करता पारंपारिक पद्धतीने चुन्याचा वापर करून चर्चची डागडुजी करण्यात आली आहे.


इतक्या वर्षात पहिल्यांदाच पुरस्कासाठी सर्वाधिक नामांकने प्राप्त झाली असल्याचे आयोजकानी सांगितले, या वर्षीचा सर्वोच्च बहुमान असलेल्या 'अवॉर्ड ऑफ डिस्टिंक्शन' या पुरस्काराने जपानमधील ओडा येथील इवामी गिन्झान ग्रंथालय' संवर्धन प्रकल्प आणि चीनमधील शांघाय येथील ऐतिहासिक 'सिहाग वेअरहाऊस' संवर्धन प्रकल्प यांना गौरविण्यात आले. एकूण १६ देशांमधून ९० नामांकन पुरस्कारासाठी प्राप्त झाली होती, सात सदस्यांच्या आंतरराष्ट्रीय ज्युरी समितीने प्रकल्पाची समज म्हणजेच वास्तूचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व किती जपले गेले आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

# परीघातल्यांना केंद्रस्थानी आणणारे ‘खांद्यावरचे स्टार्स ’



समीक्षण
अनिल बहाकर
अकोट, मो. ९०११३ १६९०५




महाराष्ट्र पोलीस सेवेतील फोर्स वनचे पोलीस अधीक्षक गजानन शिवलिंग राजमाने हे खाकीतील सवेंदनशील लेखक आहेत.गजानन शिवलिंग राजमाने यांना नक्षलग्रस्त भागातील सेवा या करिता महाराष्ट्र शासनाचा सुरक्षा पदक, विशेष खडतर सेवा पदक, पोलीस महासंचालकाचे पदक, दहशत वाद विरोधी अभियान तयारी पदक तसेच उल्लेखनीय सेवेसाठी अनेक प्रशंसा पत्रे मिळाली आहेत.बनपुरी या माणदेशी खेडे गावातून त्यांचा संघर्षमय प्रवास आजच्या तरुणांना सकारात्मक प्रेरणा देणारा आहे.खांद्यावरचे स्टार्स हे त्यांनी नक्षलग्रस्त भागात केलेल्या धाडसी आणि वंचित आदिवासी लोकांकरिता केलेल्या कार्यावर तसेच मालेगाव, नागपूर, गोंदिया, सातारा, नाशिक येथील अनुभवावरून लिहिलेलं पुस्तकं.पुस्तकात एकवीस लेख आहेत. सर्वच लेख हे त्यांच्या कार्यातून आलेलं लेखन आहे. नागपूरच्या गुंडाला वठणीवर आणून गुंडगिरी आणि गुन्हेगारी या सामाजिक किडीला संपविण्या करिता केलेले कार्य महत्वाचे आहे.आजपर्यंत अधोरेखित न केलेलं नक्षल भागातील वास्तव चित्रण त्यांनी स्व अनुभवातून मांडलेले आहे.

अनेक दिवसा पासून उत्सुकता लावणारे पुस्तकं मित्र बापू बांगर यांनी भेट म्हणून दिले.गजानन शिवलिंग राजमाने संवेदनशील पोलीस अधीक्षक यांचे खांद्यावरचे स्टार्स पुस्तकाची सुरवातच आत्मसमर्पण या लेखात आदिवासी दिलेर या युवकाची कथा आहे.दिलेर हा वाट चुकलेला नक्षलवादी पण त्याला आत्मसम र्पण करून शिक्षणाच्या प्रवाहात गजानन राजमाने सरानी आणले. त्याच्या रोजी रोटीचा गंभीर प्रश्न त्यांनी सोडवला.लेख वाचून नक्षलवाद किती जीवघेणा आहे हे वाचून मेंदूला पीळ येते. हा नक्षलवाद कसा निर्माण झाला, त्या मागे कोणती भूमिका कार्य करीत आहे हे सर्व हा लेख वाचून लक्षात येते.भवानी दादा उर्फ नदीम सारख्या गुन्हेगाराला नेकीच्या मार्गांवर कशाप्रकारे आणतात हे त्यांच्या दुसऱ्या धर्मातील असलेल्या सखोल माहितीने कळते. अजाण आणि आरती ह्यामध्ये लेखकांची सर्वधर्म सहिष्णूता वाचकांना संवेदनशीलतेचा परिचय करून देते. लेखकांनी अनेक चांगले उपक्रम राबवून हिंदू मुस्लिम या मध्ये एकात्मता निर्माण केली. आपल्या वर्दीचा मान कसा वाढावा या करिता दारूबंदी, बालमजुरी यांना आळा घातला.रक्तदान शिबीर आयोजन केले. देवरी सारख्या अतिदुर्गम भागात लोकसेवा केली. तेथील जोखमीच्या भागात लोकांना सुविधा, त्यांना योजना मिळवून देणे त्या करिता सर्वोतोपरी कार्य करणे हे वाचून वाचकांच्या डोळे भरून येतात.व्यसनाच्या आहारी अडकलेल्या मरकाम शिपाही याला निलंबित न करता व्यसन सोडवणूक करून आदर्श पोलीस बनविले.एका कुटुंबाला वाताहातीतून बाहेर आणणे हे पुण्याचे कार्य त्यांनी केले. आदिवासी युवकात वाचन गोडी निर्माण व्हावी या करिता दुर्गम भागात वाचनालय सुरु केले. आदिवासी युवकांनकरिता व्यायामशाळा काढली. रक्तदान शिबीर आयोजन करून ते यशस्वी केले हे पुस्तकं वाचून कळते.नागणडोह या लेखात आदिवासी भागातील सुविधा नक्षलवाद फोफवाला मुळे नामशेष झाल्यात त्यावर मात करून त्या कश्या पूर्ण केल्या हे खरोखर प्रशंसा पात्र आहे.. बालमजुरी किती भयानक बाब आहे ‘अजीम की चाय ‘हा लेख वाचून वाचकाला अंतर्मुख करते.पिपरी खार गावाचे परिवर्तन किती अवघड होते पण ते लेखकांनी कठीण परिश्रम घेऊन पार पाडले हे वर्णन चिंतन करावयास लावते.कर्तव्य पार पडताना स्वतःचा जीव धोक्यात घालून अभयदान देणारा खाकिताला अधिकारी कसा असावा याची जाणीव मनाला सुखावून सोडते.जीवन उत्सव या लेखात अंध नामदास धनवडे सारखे रक्तदाते किती महान आहेत याची जाणीव लेखक करून देतात. शिक्षण हे वाघीनेचे दूध आहे ही जाणीव लेखकांच्या छाती पोलिसांची, हृदय शिक्षकाचे या मध्ये नक्षग्रस्त भागातील आश्रमशाळा यामधून जे कार्य लेखकांनी केले ते अतुलनीय आहे.. एक दिवस शाळेसाठी हा उपक्रम राबवून आपल्या समाज सेवेचा वसा त्यांच्या कार्यातून दिसतो.. आधी केले नंतर लिहिले अशा प्रकारचं कार्य हे पुस्तकं वाचताना जाणवते.खांद्यावरचे स्टार्स या लेखात.. शिस्त, राकटपणा,देशसेवा, साहस, आणि आत्मगौरवाचे प्रतीक असणारी वर्दी शेवटपर्यंत राहणार होती हे लेखकाचे अनमोल विचार आहेत.हे पुस्तकं पॉप्युलर प्रकाशनाने उत्तम रित्या बांधणी केले. पुस्तकाचे मुखपृष्ठ प्रसिद्ध चित्रकार अन्वर हुसेन यांनी समर्पक तयार केलेले आहे. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणारे युवक, शासकीय सेवेत असणारे अधिकारी, आजची तरुण पिढी, शिक्षक यांनी आवर्जून वाचावे असे हे पुस्तकं आहे.गजानन राजमाने यांच्या बोलें तैसा चाले याचे उत्तम उदाहरणं म्हणजे खांद्यावरचे स्टार्स होय.प्रत्येकाने वाचावे, संग्रहित करावे, मित्राना भेट द्यावे असे आहे.. अल्पवाधित विक्रमी पुस्तकं विक्री हे या पुस्तकाचे विशेष आहे.. प्रकाश आमटे सारख्या समाज सुधारक यांनी या पुस्तका बद्दल एक आदर्श पुस्तक ही पोहच पावती देऊन गौरविले आहे.. वाचकांना खांद्यावरचे स्टार्स हे आदर्श पुस्तक निश्चितच आवडेल आणि दिशा दाखवेल ही सदिच्छा

**पुस्तकं -खांद्यावरचे स्टार्स**
**लेखक -गजानन शिवलिंग राजमाने**
**प्रकाशन -पॉप्युलर प्रकाशन**
**मुखपृष्ठ -अन्वर हुसेन**
**पाने -१२२**

# ‘तो खूप चांगला होता’ हा पुरस्कार माणसाला मेल्याशिवाय भेटत नाही

**पान ४ वरून...** शकतात, थकलेला जीव उभा करू शकतात. आज समाजात मानसिक ताण, नैराश्य, एकटेपण वाढतंय. लोक बाहेरून मजबूत दिसतात; पण आतून तुटलेले असतात. अशा वेळी औषधांपेक्षा जास्त परिणामकारक असतात ते प्रामाणिक कौतुकाचे शब्द, मान्यतेचा स्पर्श आणि आदराची नजर. आपण हे बदलू शकतो आज, आत्ताच. कोणासाठी मोठा कार्यक्रम करण्याची गरज नाही. फक्त मनापासून बोलण्याची गरज आहे. आईला सांगा ''तुझ्यामुळे घर उभं आहे.'' वडिलांना सांगा ''तुमचा अभिमान वाटतो.'' मित्राला सांगा ''तू सोबत आहेस म्हणून धैर्य आहे.'' सहकाऱ्याला सांगा ''तुझं काम मोलाचं आहे.'' कौतुक म्हणजे चापलुसी नाही. कौतुक म्हणजे सत्याची कबुली.

चूक भूल देणे घेणे हा नियम आयुष्यात ज्यांना जमला त्यांना जीवन कळले असं मी म्हणेन. वाधीसाठी म्हैस मारणारी माणसं अनेक बघितली पण सगळ्या चुका पोटात घालणारी आईसारखी दुसरी व्यक्ती शोधून सापडणं कठीण आहे. माणसं समजून घ्यायला शिका. एक ताई बटाट्याची भाजी करण्यासाठी बटाटी कापत होती. अचानक तिला बटाट्याच्या वरिल बाजुला छिद्र पडलेले दिसले. तिने विचार केला की बटाटा खराब झाला आहे तो फेकून द्यावा, पण तिने तो फेकून न देता खराब झालेला तेव्हढा भाग कापून फेकून दिला. पुन्हा पाहिले असता अजून थोडा भाग खराब दिसला. तिने तो भागही कापून फेकून दिला. उरलेला बटाट्याचा अर्धा भाग कापून भाजीत टाकला. किती चांगली विचारसरणी आहे, ७० पैशांचा बटाटा आपण किती ध्यान देऊन कापतो. जो भाग खराब आहे तो कापून फेकून देतो. उरलेला भाग स्विकारतो. खुप चांगलं आहे हे. मात्र दुख या गोष्टीचं आहे की, आपण माणसाबाबत एव्हढे कठोर का वागतो? आपल्या जवळच्या एख्याद्या माणसाबाबत एक चुक दिसली तर त्याच्या पुर्ण व्यक्तीमत्वाला आपण कापून फ ेकून देतो. त्याच्या वर्षानुवर्षाच्या चांगल्या कामांकडे दुर्लक्ष करतो. आपण फक्त आपल्या अहंकारासाठी, मी पणासाठी त्याच्यासोबतचे प्रत्येक नाते तोडतो. मग एकच प्रश्न पडतो की, आपल्या जवळच्या माणसाची किंमत सत्तर पैशांच्या बटाट्यापेक्षाही कमी आहे का? या छोट्याशा गोष्टीचा जरूर विचार करा आणि आपल्या जवळच्या अमुल्य माणसांना लहान लहान चुकांसाठी जीवनातून वेगळे करु नका. माणूस म्हणुनी जन्मा आलो, माणूस म्हणुनी जगेल मी, हे तत्व अमलात आणा.

समाज अधिक संवेदनशील होईल, ते मोठ्या भाषणांनी नाही; तर छोट्या प्रामाणिक वाक्यांनी. माणूस जिवंत असताना त्याला ''तू चांगला आहेस'' असं ऐकायला मिळालं, तर मृत्यूनंतरच्या हजार वाक्यांची गरजच उरणार नाही. शेवटी प्रश्न एकच की, आपण पुष्पहार द्यायचा की शब्दहार? माणूस गेल्यावर ''तो खूप चांगला होता'' म्हणणं सोपं आहे. पण तो समोर उभा असताना ''तू खूप चांगला आहेस'' म्हणण्याचं धैर्य दाखवू या. कारण जिवंत माणसाला दिलेला सन्मान हाच खरा पुरस्कार असतो आणि तो मृत्यूनंतर नाही, तर आयुष्यभर मिळायला हवा.

## सणांचे पावित्र्य की महसुलाचा मोह?

**पान ४ वरून...** यात शंका नाही. समाज बदलतो, जीवनशैली बदलते आणि त्यानुसार प्रशासनालाही निर्णय घ्यावे लागतात. मात्र, बदल करताना मूल्यांचा पाया ढासळणार नाही, याची काळजी घेणे तेवढेच आवश्यक आहे. आर्थिक फायद्याच्या किंवा तात्पुरत्या सोयीच्या नावाखाली जर आपण सांस्कृतिक आणि नैतिक मूल्यांशी तडजोड करू लागलो, तर तो बदल प्रगतीचा नसून अधोगतीचा ठरू शकतो. सरकारने घेतलेला हा निर्णय म्हणूनच केवळ प्रशासकीय नाही, तर सामाजिकदृष्ट्याही पुनर्विचार करण्यासारखा आहे. कारण काही निर्णय हे फक्त वर्तमानासाठी नसतात, ते भविष्यातील समाजाची दिशा निश्चित करतात. आज घेतलेले निर्णय उद्याच्या पिढीचे विचार, सवयी आणि जीवनपद्धती घडवतात. त्यामुळेच, या निर्णयाकडे केवळ आर्थिक किंवा तांत्रिक दृष्टीकोनातून नव्हे, तर व्यापक सामाजिक आणि सांस्कृतिक परिणामांच्या दृष्टीने पाहणे गरजेचे आहे. अन्यथा, आपण नकळत अशा वाटेवर चालत जाऊ, जिथे सणांचा आत्मा हरवेल आणि उरेल तो केवळ बाह्य दिखावा. आणि तेव्हा कदाचित उशीर झालेला असेल.

## ओळख पक्ष्यांची : ठिपकेवाला पिंगळा



प्रतिमेतील पक्षी म्हणजे ठिपकेदार घुबड (अथेन ब्रामा) आहे, जो उष्णकटिबंधीय आशियामध्ये आढळणारा एक सामान्य लहान घुबड आहे. ते अंतर मोजण्यासाठी डोके टेकवतात आणि बहुतेकदा पहाटे आणि संध्याकाळी सक्रिय असतात. हे घुबड शेतजमिनीसह मोकळ्या जागेत राहतात आणि मानवी वस्तीजवळ राहण्यास चांगले जुळवून घेतात. ते प्रामुख्याने कीटक, लहान उंदीर आणि सरडे खातात. ते घट्ट असतात, सुमारे आठ इंच उंच असतात, राखाडी-तपकिरी पिसारा पांढऱ्या रंगाच्या ठिपक्यांसह असतो.

(छायाचित्र:चंद्रकांत पाटील)

## राशी-भविष्य

**मेष:** आज तुम्ही आध्यात्मिक कामांमध्ये व्यस्त असाल. खोल विचार तुम्हाला या प्रयत्नात मदत करेल. तुमच्या शत्रूंपासून सावध रहा. आज कोणताही नवीन उपक्रम सुरू करू नका.

**वृषभ:** आज तुमचा व्यवसाय वाढण्याची शक्यता आहे. तुम्हाला सामाजिक क्षेत्रात यश आणि प्रसिद्धी मिळेल. आज तुम्हाला पैसे मिळण्याची शक्यता आहे.

**मिथुन:** आज तुम्ही मनोरंजन आणि आनंदात व्यस्त असाल. मित्र आणि कुटुंबासह आनंददायी वातावरण असेल. समाजात तुमचा आदर आणि कीर्ती वाढेल .

**कर्क:** आजचा दिवस तुमच्यासाठी आनंददायी असेल आणि तुम्ही तुमच्या कुटुंबासोबत दर्जे दार वेळ घालवाल. आवश्यक कामांवर पैसे खर्च केले जातील, तरीही आर्थिक लाभासाठी हा दिवस चांगला आहे.

**सिंह:** आज तुम्हाला तुमच्या कुटुंबातील प्रत्येक सदस्याकडून पाठिंबा मिळेल. प्रेमसंबंध निर्माण होण्याची शक्यता आहे. तुम्हाला अस्वस्थ आणि अस्वस्थ वाटू शकते.

**कन्या:** आज गाडी चालवताना विशेष काळजी घ्या. कौटुंबिक तणाव वाढू शकतो किंवा वडिलोपार्जित मालमत्तेची समस्या उद्भवू शकते. यंत्रसामग्रीवर खर्च आणि मानसिक चिंता होईल.

**तूळ:** आज नवीन काम सुरू करण्यासाठी चांगला दिवस आहे. तुमची एखाद्या प्रिय व्यक्तीशी भेट होईल आणि तुमचे भाग्य वाढेल. सामाजिक आदर वाढेल.

**वृश्चिक:** आज तुमचे नियोजित काम पूर्ण झाले नाही तर तुम्हाला निराशा वाटू शकते. कोणतेही महत्त्वाचे निर्णय घेण्यापासून टाळा. कौटुंबिक वातावरणात त्रास वाढेल.

**धनु:** आज उत्कटतेने किंवा आवेगात निर्णय घेतल्याने पश्चात्ताप होऊ शकतो. तुमच्या मनातील आणि हृदयातील गोंधळ शांत होईपर्यंत कोणत्याही विषयाबद्दल किंवा व्यक्तीबद्दल कोणताही निर्णय घेणे टाळणे चांगले.


**मकर:** आज तुम्हाला तुमची प्रलंबित कामे पूर्ण करण्यासाठी खूप मेहनत आणि संघर्ष करावा लागू शकतो. एकाच वेळी खूप कामे केल्याने त्रास होऊ शकतो. आज माकडांना केळी खायला द्या.

**कुंभ:** आज जामीनदार आणि आर्थिक व्यवहार टाळा. खर्च वाढतील आणि तुमच्या आरोग्याची काळजी घ्या. कुटुंबाशी वाद होण्याची शक्यता आहे, म्हणून ते टाळा. एखाद्याशी गैरसमज झाल्यास भांडण होऊ शकते.

**मीन:** आजचा दिवस तुमच्यासाठी फायदेशीर आहे. तुमच्या नोकरीत किंवा व्यवसायात उत्पन्न वाढेल. आज तुम्ही नवीन मित्र बनवाल.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 318



चतुर्भुज
चपखल
टमटम
टंकयंत्र
नत्रवायू
नवनीत
पाणथळ
पोखरणे
रमजान
रसातळ
राजकोट
राणीवसा
वर्तमान
वरधावा
वरमाय
संहारक

**पाच अक्षरी**
अनधिकृत
अनुकरण
कपटविद्या
रामनवमी
श्रावणसरी
सभामंडप

**सहा अक्षरी**
गतानुगतिक
तडकाफडकी
वर्तमानपत्र

(उत्तर पुढील अंकी)

**संकेत शब्द:**–तिढा

**दोन अक्षरी**
अथ
कल
काया
काल
चव
जटा
जाऊ
जाड
टप
डफ
ढाळ
तनु
तर
थंडी
दान
धार
धाव
धिमा
नामी
नुक्ता
पोथी
पोळा
मात
माय
मीरा
यंदा
रड
वन
वसा
वाम
वंश
शंख
सजा
सन
साथ
हाट

**तीन अक्षरी**
अतिथी
अवनि
आवड
अंतर
काटक
कापरे
कावड
कीर्तन
गणेश
टाकाऊ
तुलना
दावाग्नि
धारणा
नटवा
नवल
पगडी
पातळ
पात्रता
रवंथ
वचक
वरदा
वरात
विदूर
विद्यार्थी
श्रावण
सकळ
सफल


**चार अक्षरी**
अधिकृत
अनिर्णित
अनुपम
अमंगल
अवकळा
करवत
कोचवान

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 699



**–: आडवी विधाने :–**

1) आपल्या स्वतंत्र भारताचे एक भूतपूर्व पंतप्रधान
5) भारताचे दक्षिण टोक, येथे स्वामी विवेकानंदांचे भव्य स्मारक आहे.
10) लबाडी, कृत्रिमता
11) जागा, प्रवेश, वाव
12) नातेवाईक, सगेसोयरे
14) लोभी, अधिक लालसा असलेला
16) कमळासारखे असलेले डोळे
19) तळतळाटाचे भाषण, अनिष्ट चिंतन
20) स्वाद, रुची
21) जोऱ्याचे, वेगाने सुटणारा
22) तत्वांश, अर्क
23) बाजू, शेवट
24) निश्चयी, अभिमान राखणारा
27) करुणा उत्पन्न करणारे
29) रांजण, मोठे पोट
30) एखादे काम दुसऱ्याकडून करवून घेण्यासाठी लालूच दाखविणे
34) थोडे, अल्प (हिं.)
35) एक सुवासिक लाकूड प्रकार
36) रताळे
38) मैत्री, भलेपणा
40) भाग्य, शुभ, चांगला
41) लहान शहरातील स्थानिक स्वराज्य संस्था
44) या सारखा
45) विष्णु पत्नी
47) जाणीव, समजूत
49) घरातील जमिनीखाली असलेली खोली
50) प्रशंसा, वाखाणणी
51) पेशव्यांच्या अष्ट प्रधानातील प्रत्येक मंत्र्यांच्या नावामागे लावण्यात येणारी मानाची पदवी
52) समारोह, उत्सव
55) तपश्चर्येची फलप्राप्ती, दैवी शक्ति
56) जनावराने खाल्लेले खाद्य पुन्हा तोंडात आणून ते चघळीत बसणे
59) कावळा
60) नियमितपणे ठराविक कालावधीनंतर प्रकाशित होणारे वृत्तपत्र
64) कमळ
65) जनतेने आपल्या मतदारसंघातून निवडून विधानसभेत पाठविलेला प्रतिनिधी
67) अन्न न मिळाल्याने होणारी परिस्थिती, अर्धपोटी राहणे
69) वेल, वल्ली 70) पैसा, आशय
71) सेवक, चाकर
72) जन्मलेला, उत्पन्न झालेला
73) सहज म्हणून पायी फिरणे
76) गाय 77) कुत्रा, श्वान (सं.)
78) सर्व धर्म समभावाचे पालन करणारा एक देश
80) मदिरा, दारु
81) नायट्रोजन वायू
82) नायिका म्हणून ‘हिम्मतवाला’ या हिंदी चित्रपटातून रजतपटावर झळकलेली अभिनेत्री
83) पूर्वी कधी घडली नाही आणि भविष्यात कधी घडणार नाही या अर्थाचे एक संस्कृत वचन

**–: उभी विधाने :–**

1) एखाद्या मंत्राचे वारंवार केलेले उच्चारण
2) विल्हेवाट लावणे, खाऊन टाकणे
3) मुखरस
4) आझाद हिंद सेनेचे संस्थापक
5) नाटक – सिनेमा ज्यावर बेतला असतो अशी कथा
6) वेगळा, भिन्न
7) एक प्रसिद्ध व गाजलेले मराठी संगीत नाटक
8) प्रकार, चाल, पद्धत
9) पडीत जमीन शेतीच्या उपयोगाची करणे
10) एका विशिष्ट हरिणाच्या बेंबीत आढळणारे सुगंधित द्रव्य
13) मुरडणे, मुरगळणे
15) हत्तीचे ओरडणे
17) अंगिकारलेले व्रत
18) मोठा प्रवाह, पूर, लोंढा
24) व्यंजनापासून बारा स्वरांच्या संयोगाने तयार होणाऱ्या अक्षरांची मालिका
25) दानशूर
26) सूर्य
28) श्रीविष्णुचा एक अवतार
30) सार्वजनिक, सर्वसामान्य
31) तक्रार, न्याय
32) खोदणे
33) आपले प्रतिबिंब आपल्यालाच दाखविणारी गोष्ट
34) संत कबिराने प्रवर्तलेला ईश्वर भनाचा मार्ग
36) दया, करुणा
37) तुडविलेले, चुरडलेले
38) संक्षिप्त उतारा, सारांश
39) आठवड्यातील एक वार
42) गाढव
43) समय, नाशकर्ता
44) रसिकता नसलेला
46) पराभव, प्रतिकार
48) मोठ्ठा आवाज
53) दीन, गरीब
54) न्यायालयाचे नियम
57) स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्य सैनिकांना प्रेरणादायी ठरलेला एक शब्द
58) लोकांनी मान्यता दिलेला पुढारी
60) अर्धा भाग
61) क्षणिक, पातळ
62) लेखन पद्धती
63) शोध 66) पृथेचा पुत्र अर्जुन
67) उदास झालेला, विरक्त, तटस्थ
68) चहूबाजूंनी,
70) परवानगी, मान्यता
72) ........ गडकर, मराठी – हिंदी सिनेसृष्टीत गाजलेली एक जुनी अभिनेत्री
74) रत्न, मौल्यवान वस्तु
75) अरण्य, जंगल
78) भविष्यात होणारे
79) आपल्या मनातील कल्पना काव्यबद्ध करणारा (उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

## थोडक्यात

### तडीपार गुंडाला अटक

**नागपूर :** एमआयडीसी ठाण्याचे पथक गस्त घालत असताना एका संशयास्पद तरुणाला ताब्यात घेतले ही कारवाई २३ फेब्रुवारीच्या पहाटे १२.२० च्या सुमारास करण्यात आली.
माहितीनुसार, आरोपी सुरज (अंडा) नवीनप्रसाद शहा (वय २३ वर्षे हिंगणा रोड झोपडपट्टी) हा अमर नगर येथील हनुमान मंदिराजवळ आढळून आला़अधिक तपासणीत त्याला पोलिस उपायुक्त (परिमंडळ १) यांनी २८ मार्च २०२४ रोजी दोन वर्षांसाठी नागपूर शहर आणि ग्रामीण हद्दीतून तडीपार (हद्दपार) केले होते. मात्र, तो परवानगीशिवाय शहरात गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरताना आढळून आला. कारवाईत पोलिसांनी त्याच्यावर महाराष्ट्र पोलिस कायदा कलम १४२ अन्वये गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

### संत गाडगे महाराज यांना अभिवादन

**नागपूर :** जिल्हाधिकारी कार्यालयात संत गाडगे महाराज यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे यांच्या हस्ते संत गाडगे महाराज यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### विभागीय क्रीडा निपुणता केंद्र येथे निवड चाचणी

**नागपूर :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या वतीने मिशन लक्ष्यवेध योजनेअंतर्गत निवासी स्वरूपातील विभागीय क्रीडा निपुणता केंद्र नागपूर येथे अथलेटिक्स व टेबल टेनिस या खेळांच्या निवड चाचण्या आयोजित करण्यात येणार आहेत. ज्या खेळाडूंना या निवड चाचणीत सहभागी व्हायचे आहे त्यांनी खाली दिलेल्या गुगल लिंकवर ऑनलाईन अर्ज (Google Form) भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. खेळाडूंनी फॉर्ममध्ये दिलेली सर्व माहिती अचूक व संपूर्ण भरावी. प्राप्त अर्जाची तपासणी करण्यात येईल. पात्र खेळाडूंना पुढील निवड चाचणीच्या दिनांक व इतर आवश्यक सूचना स्वतंत्रपणे कळविण्यात येतील.
या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक व पात्र खेळाडूंनी लवकरात लवकर अर्ज सादर करावा.

### तीन दिवसीय प्रदर्शनी

**नागपूर :** खुल्या प्रवर्गातील तरुण-तरुणींना उद्योग क्षेत्रात संधी उपलब्ध व्हावी, स्थानिक उत्पादनांना व्यापक बाजारपेठ मिळावी आणि उद्योजकांना थेट ग्राहकांशी संवाद साधता यावा या उद्देशाने 'अमृत पेठ' या राज्यस्तरीय विशेष उद्योजक प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. ही प्रदर्शनी २७, २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी तात्या टोपे सभागृह अत्रे ले-आउट येथे आयोजित करण्यात येणार आहे. प्रदर्शनीचा उद्घाटन समारंभ २७ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता येथे होणार आहे. उद्घाटनप्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर, उद्योजक, शासकीय अधिकारी, उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ तसेच सामाजिक क्षेत्रातील प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. नागपूर जिल्ह्यातील विविध उद्योग, लघुउद्योग, सूक्ष्म उद्योग, गृहउद्योग, महिला बचत गट, स्टार्टअप उपक्रम, हस्तकला, खाद्यपदार्थ प्रक्रिया उद्योग, सेवा क्षेत्रातील उद्योजक तसेच नाविन्यपूर्ण उत्पादने सादर करणारे नवउद्योजक सहभागी होणार आहेत. नागरिकांना दर्जेदार व स्थानिक उत्पादने थेट उत्पादकांकडून खरेदी करण्याची तसेच नव्या संकल्पना आणि व्यवसाय मॉडेल्स जाणून घेण्याची उत्तम संधी उपलब्ध होणार आहे.

# आर्थिक दुर्बल घटकांसाठी 518 सदनिका

## मनपातर्फे पीएम आवास योजना २.० कार्यान्वित, अडीच लाख रुपये शासकीय अनुदान

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २४ : शहररातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांसाठी प्रधानमंत्री आवास योजना २.० एएचपी अंतर्गत महानगरपालिकाकडून ५१८ जणांना सदनिका उपलब्ध होणार आहेत यासाठी लाभार्थींना ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया २४ फेब्रुवारी सुरू करण्यात आली आहे या योजनेमुळे अनेकांच्या स्वत:च्या घराचे स्वप्न पूर्ण होणार आहे. महापौर निता ठाकरे आणि महानगरपालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी यासंदर्भात माहिती दिली.**



उत्तर नागपूर क्षेत्रातील मौजा नारी येथे १ बीएचके व २ बीएचके सदनिकांचे बांधकाम केले जाणार आहे. यात १ बीएचके सदनिकांचे बांधीव (बिल्टअप एरिया) क्षेत्रफळ ४७८ चौरस फूट तर २ बीएचके सदनिकांचे बांधीव (बिल्टअप एरीया) क्षेत्रफळ ६१९ चौरस फूट बांधकाम राहणार आहेत. या योजनेमुळे अल्प उत्पन्न गटातील नागरिकांचे आपले स्वप्नातील घर साकार होणार आहे. ही योजना राबविताना पर्यावरण व रेन हार्वेस्टिंग बाबींकडे लक्ष देण्यात येईल,असेही यावेळी सांगण्यात आले पीएम आवास योजना (शहरी) २.० मधील भागीदारी तत्वावर परवडणारी घरे (एएचपी) ५१८ सदनिकांच्या प्रकल्प अहवालास केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीची मान्यता प्रदान करण्यात आली आहे. यात १ बीएचकेच्या सदनिकांची संख्या २१० तर २ बीएचके सदनिकांची संख्या ३०८ राहणार आहे. यात अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्ग व दिव्यांगासाठी राखीव सदनिका राहणार आहेत. यावेळी उपमहापौर लीला हाथीबेड, सत्तापक्ष नेते नरेंद्र बोरकर, मुख्य अभियंता मनोज तालेवार, कार्यकारी अभियंता सुनिल उईके, प्रकल्प विकासक गौरव अग्रवाल उपस्थित होते. यាप्रसंगी महापौर ठाकरे यांनी केंद्र आणि राज्य सरकारचे आभार मानले.

### महत्त्वाचे

**अर्जदार नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीतील रहिवासी असावा, अर्जदार तथा त्यांच्या कुटुंबाच्या नावे देशात कुठेही पक्के घर नसावे, शासन निर्णयानुसार अर्जदार तथा कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ३ लाख रुपयांपेक्षा अधिक नसावे. या प्रकल्पासाठी नोंदणी प्रक्रिया २४ फेब्रुवारी दुपारी ३ वाजेपासून सुरू होणार असून, ३१ मार्च २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत नोंदणी करता येईल. सदनिकांचे वाटप ऑनलाईन संगणकीय पद्धतीने होणार आहे.**

## संत गाडगेबाबांचा पुतळा उभारण्याची मागणी

**नागपूर, दि. २४ :** संत गाडगे बाबा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त नागपूर येथील मेडिकल चौकात त्यांचा भव्य पुतळा उभारून चौकाचे नामकरण “संत गाडगेबाबा चौक” करावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य धोबी परीट समाज महासंघाने केली आहे. संस्थापक अध्यक्ष डी. डी. सोनटक्के व महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रपरिषदेत ही माहिती दिली. महासंघाने शासनाकडे तीन प्रमुख मागण्या मांडल्या आहेत: २३ फेब्रुवारी हा 'राज्य स्वच्छता दिन' घोषित करावा, विधानभवनात बाबांचे तैलचित्र लावावे आणि नागपुरात त्यांचा पुतळा उभारावा. देबूजी झिंगराजी जानोरकर ऊर्फ संत गाडगेबाबांनी कीर्तनातून अंधश्रद्धा आणि जातिभेदावर प्रहार करत स्वच्छतेचा संदेश दिला. "देव माणसाच्या सेवेत आहे" हा विचार देणाऱ्या बाबांच्या जयंतीनिमित्त राज्यभर जनजागृतीपर कार्यक्रम व स्वच्छता मोहिमा राबवल्या जाणार आहेत. शासनाने या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

## स्थायी समिती, परिवहन व अन्य विषय समिती सदस्यांची निवड

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २४ :** नागपूर महानगरपालिकेच्या विशेष सभेमध्ये स्थायी समितीतील १६ सदस्य, परिवहन समितीचे १२ व दहा विषय समित्यांमध्ये सदस्यांची आज (ता. २४) निवड करण्यात आली. नागपूर महानगरपालिकेची विशेष सभा रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी महापौर श्रीमती निता ठाकरे होत्या. यावेळी उपमहापौर लिला हाथीबेड, मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी व निगम सचिव डॉ. रंजना लाडे उपस्थित होते.

महापौर निता ठाकरे यांनी स्थायी समितीमध्ये १६ सदस्यांची निवड करण्याच्या प्रस्तावाचे वाचन केले व सभागृहातील पक्षीय बलाबल अनुसार गटनेत्यांनी सदस्यांची नावे बंद लिफाफ्यात द्यावी, अशी विनंती केली. त्यानुसार सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर, विरोधी पक्षनेते संजय महाकाळकर व मुस्लिम बहुजन विकास आघाडीचे गटनेते शकील पटेल यांनी बंद लिफाफ्यामध्ये सदस्यांची नावे दिली. या पक्षीय बलाबलानुसार स्थायी समितीमध्ये भाजपचे ११, काँग्रेस-शिवसेना (उबाठा) महाविकास आघाडीचे ४ व मुस्लिम बहुजन विकास आघाडीच्या एका सदस्यांची निवड करण्यात आली. परिवहन समितीमध्ये भाजपचे ८ काँग्रेस-शिवसेना (उबाठा) महाविकास आघाडीचे ३ व मुस्लिम बहुजन विकास आघाडीच्या १ सदस्यांचा समावेश झाला आहे. त्याचप्रमाणे अनुक्रमे स्थापत्य व प्रकल्प विशेष समिती, वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती, विधी विशेष समिती, शिक्षण विशेष समिती, गलिच्छ वस्ती निर्मूलन व घरबांधणी विशेष समिती, क्रीडा विशेष समिती, महिला व बालकल्याण विशेष समिती, जलप्रदाय विशेष समिती, कर आकारणी व कर संकलन विशेष समिती व अग्निशमन व विद्युत विशेष समितीमध्ये पक्षीय बलाबल नुसार निवड करण्यात आली. गटनेत्यांनी बंद लिफाफ्यात दिलेल्या सदस्यांच्या नावाचे वाचन निगम सचिव व उपायुक्त डॉ. रंजना लाडे यांनी सभागृहात केले. त्यानंतर महापौर ठाकरे यांनी या सदस्यांची निवड संबंधित समितीत्यांमध्ये सदस्य म्हणून झाल्याची घोषणा केली.

# व्यसनमुक्तीसाठी जिल्हा कृती समिती करणार जनजागृती समितीची स्थापना

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २४ :** जिल्ह्याला व्यसनमुक्त बनविण्याच्या निर्धारातून समाजातील विविध क्षेत्रातील प्रतिनिधींना एकत्र आणत ‘व्यसमुक्ती नागपूर जिल्हा कृती समिती’ची स्थापना करण्यात आली आहे. जिल्हा परिषद समाज कल्याण अधिकारी सुखदेव कौरती यांच्या पुढाकाराने ही समिती गठित झाली असून जिल्ह्यात व्यसनमुक्तीची व्यापक चळवळ उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

जिल्हा परिषदेतील समाजकल्याण अधिकारी सुखदेव कौरती यांच्या दालनात नुकतीच बैठक पार पडली. जिल्हा समाजकल्याण अधिकारी सुखदेव कौरती यांची अध्यक्षपदी तर कार्याध्यक्षपदी गौरव आळणे यांची निवड करण्यात आली. सचिवपदी सामाजिक कार्यकर्ते चंद्रशेखर महाजन यांची निवड करण्यात आली. समितीच्या इतर पदाधिकाऱ्यांमध्ये गौरव आळणे (जिल्हा कार्याध्यक्ष), विलास शेवाळे (जिल्हा समन्वयक), नलिनी शिरकुरे (सहसमन्वयक), सपना पेंदाम (कार्यालयीन समन्वयक) यांचा समावेश आहे. विधी सल्लागार म्हणून ॲड. अनिल गुरुनानी यांची नियुक्ती करण्यात आली. सदस्य म्हणून पारशिवनी येथील जयसिंग रच्छोरे, कामठी तालुक्यातील ताराचंद पाखीडे, हिंगणा येथील पुरुषोत्तम शेरकुरे, कलाक्षेत्रातील मुकुंद ओझरकर व प्रेम घरडे, पोलिस विभागातील पोलिस कॉन्स्टेबल पायल यादव व प्रियंका सरोदे तसेच ज्येष्ठ नागरिक प्रतिनिधी अशोक पाटील यांची निवड केली. समितीचा मुख्य उद्देश जिल्ह्यातील शाळा-महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून व्यसनांविरोधात जनजागृती, प्रबोधन आणि समुपदेशन उपक्रम राबविणे हा आहे. युवकांना व्यसनांच्या विळख्यातून दूर ठेवण्यासाठी शैक्षणिक संस्था, पालक, स्वयंसेवी संस्था आणि प्रशासन यांचा समन्वय साधत व्यापक मोहिमा राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जनतेच्या स्वयंप्रेरणेने आणि सहभागातून व्यसनमुक्तीचे उपक्रम राबविण्यावर भर देण्यात येणार आहे.

## ‘महाज्योती’ येथे गाडगे बाबा यांना अभिवादन

**नागपूर, दि. २४ :** महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर येथे सोमवारी महान संत, थोर कीर्तनकार आणि समाजप्रबोधनाचे अखंड दीप असलेले गाडगे महाराज यांची १५० वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात ‘महाज्योती’चे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे यांच्या हस्ते राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. यាप्रसंगी मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रशांत वावगे, लेखाधिकारी रश्मी तेलेवार, सहाय्यक लेखाधिकारी वर्षा अहिर तसेच प्रकल्प संचालक कुणाल शिरसाठे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# शिवराय केवळ एका जातीचे नव्हे, तर अवघ्या विश्वाचे प्रेरणास्थान

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २४ :** "जगाच्या पाठीवर अनेक राजे होऊन गेले, ज्यांनी माणसांना गुलाम बनवून त्यांच्यावर राज्य केले. मात्र, छत्रपती शिवाजी महाराज हे असे एकमेव युगपुरुष होते, ज्यांनी गुलामांना माणूस बनवले आणि त्यांना मुक्तीचा श्वास घ्यायला शिकवले. दुर्दैवाने आज आपण महापुरुषांना जातीच्या चौकटीत अडकवतोय, परंतु महाराजांचे कर्तृत्व कोणत्याही एका जातीपुरते किंवा मातीपुरते मर्यादित नसून ते संपूर्ण विश्वाला प्रेरणा देणारे आहे," असे ओजस्वी प्रतिपादन प्रसिद्ध शिवव्याख्याते श्री. राहुल गिरी यांनी केले. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण व पारेषण कंपनी नागपूर परिमंडळ आणि छत्रपती शिवाजी महाराज जयंती महोत्सव समिती २०२६ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानाप्रसंगी ते बोलत होते.



**'छत्रपतींचा पराक्रम आणि हिंदवी स्वराज्य' या विषयावर बोलताना प्रसिद्ध शिव व्याख्याते राहुल गिरी.**

नागपूर येथील प्रकाश भवन प्रांगणात पार पडलेल्या या सोहळ्यात 'छत्रपतींचा पराक्रम आणि हिंदवी स्वराज्य' या विषयावर बोलताना राहुल गिरी यांनी शिवचरित्रातील अनेक प्रेरणादायी पैलू उलगडले. ते म्हणाले की, शिवराय हे केवळ महाराष्ट्राचे नसून अखंड हिंदुस्तानाचे स्फूर्तिस्थान आहेत, असे खुद्द पंडित नेहरूंनीही मान्य केले होते. अगदी इराणच्या राजाने औरंगजेबाला लिहिलेल्या पत्रातही अठरापगड जातींना एकत्र घेऊन सह्याद्रीच्या कानाकोपऱ्यात रयतेचे राज्य निर्माण करणाऱ्या या राजाचा गौरव केला आहे. राजमाता जिजाऊंच्या संस्कारांमुळेच 'बाया नाचविणारा नव्हे, तर बाया वाचविणारा राजा व्हा' ही शिकवण महाराजांनी सार्थ ठरवली. म्हणूनच ते सर्व जाती-धर्माच्या लोकांना एका ताटात घेऊन जेवणारे आणि परधर्माचा आदर राखणारे जाणते राजा ठरले. केवळ युद्धकौशल्यच नव्हे, तर शेती मोजण्याचे तंत्र विकसित करणारे, भारतीय आरमाराचे जनक आणि मानवी हक्कांचे रक्षण करणारे ते एक द्रष्टे प्रशासक होते.व्याख्यानात पुढे बोलताना गिरी यांनी नमूद केले की, वयाच्या १५ व्या वर्षी रायरेश्वराच्या मंदिरात घेतलेली स्वराज्याची शपथ ही शेकडो वर्षांच्या गुलामगिरीच्या शृंखला तोडण्याचा एक महान निश्चय होता. अफझलखान वध, पन्हाळगडचा वेढा आणि आग्र्याहून झालेली सुटका यांसारख्या घटनांमधून महाराजांचे बुद्धीचातुर्य आणि गनिमी काव्याचे दर्शन घडते. आजच्या बुडणाऱ्या समाजाला वाचवण्यासाठी तरुणांनी शिवचरित्राचा सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे. युवक कसा असावा, हे शिवरायांच्या युवावस्थेतील कार्यातून शिकता येते. ज्याला आपल्या कृतीतून समाजाचे भले कसे होईल हे उमजले, त्यालाच खरे शिवचरित्र कळले असे समजावे. महाराजांचा इतिहास केवळ टाळ्या वाजवण्यासाठी नसून तो आचरणात आणण्यासाठी आहे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महापारेषणचे मुख्य अभियंता सतीश अणे होते, तर विशेष अतिथी म्हणून महावितरणचे मुख्य अभियंता दिलीप दोडके उपस्थित होते. यាप्रसंगी सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव, कार्यकारी अभियंता संजय श्रृंगारे, हेमराज ढोके, धम्मदिप फुलझेले, स्वप्नील गोतमारे, राहुल जिवतोडे, चंदन तल्लरवार, नरेंद्र धवड आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नरेंद्र तिजारे यांनी केले, तर वक्त्याचा परिचय अमरदिप बागडे यांनी करून दिला. संपूर्ण कार्यक्रमाचे नेटके संचालन अमित पेढेकर यांनी केले. या व्याख्यानाला शिवप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, राहुल गिरी यांच्या वाणीने उपस्थितांमध्ये नवा उत्साह संचारला होता.

# मनपाच्या सेवेत ६ 'मिनी फायर टेंडर', २५ कचरा वाहने दाखल

## महापौर निता ठाकरे यांच्या हस्ते हिरवी झेंडी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २४ :** नागपूर शहराचा वाढता विस्तार आणि जुन्या वस्त्यांमधील अरुंद रस्त्यांची अडचण लक्षात घेता, नागपूर महानगरपालिकेने आपल्या ताफ्यात नवीन अत्याधुनिक वाहने समाविष्ट केली आहेत. सोमवार, २३ फेब्रुवारी रोजी मनपा मुख्यालयात आयोजित एका दिमाखदार सोहळ्यात महापौर श्रीमती निता ठाकरे यांच्या हस्ते ६ नवीन 'मिनी फायर टेंडर', २५ कचरा संकलन वाहने आणि नाले सफाईसाठी ३ पोकलेन मशिन्सचे लोकार्पण करण्यात आले.



छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय भवन येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाला उपमहापौर श्रीमती लिला हाथीबेड, सत्ता पक्षनेते श्री. नरेंद्र (बाल्या) बोरकर, नगरसेवक श्री. विजय होले, मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत व श्रीमती वैष्णवी बी, उपायुक्त श्री. मंगेश खवले, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, मुख्य अग्निशमन अधिकारी श्री. तुषार बारहाते, कार्यकारी अभियंता श्री. राजेश गुरमुळे, उपअभियंता श्री. उज्वल लांजेवार आणि स्वच्छता अधिकारी श्री. सागर हारगुडे व श्री. लोकेश बासनवार उपस्थित होते.

**अग्निशमन दलाचे बळकटीकरण:** शहरातील अरुंद गल्ल्यांमध्ये आगीच्या घटना घडल्यास मोठे बंब पोहोचण्यास अडथळा येतो. ही समस्या सोडवण्यासाठी सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पातून सुमारे ६ कोटी ७ लाख रुपयांच्या निधीतून २००० लिटर क्षमतेचे ६ नवीन 'मिनी फायर टेंडर' खरेदी करण्यात आले आहेत. यामुळे आता मनपाकडे एकूण १० मिनी टेंडर उपलब्ध झाले असून, शहराची आपत्कालीन यंत्रणा अधिक सक्षम झाली आहे.

**नाले सफाईसाठी पोकलेन:** शहरातील स्वच्छता राखण्यासाठी 'डोअर-टू-डोअर' कचरा संकलनासाठी २५ नवीन वाहने दाखल झाली आहेत. विशेष म्हणजे, कचरा संकलन करणाऱ्या कंपन्यांकडून वसूल केलेल्या दंडाच्या ४ कोटी ४७ लाख रुपयांच्या निधीतून ही खरेदी करण्यात आली आहे. तसेच, पावसाळ्यापूर्वी नाले सफाईसाठी २५ टनाची १ लाँगबूम आणि लहान नाल्यांसाठी ५ टन व ३.५ टनाचे २ पोकलेन देखील ताफ्यात सामील झाले आहेत.

"नागपूरकरांच्या सुविधेसाठी आणि सुरक्षेसाठी मनपा सदैव कटिबद्ध आहे," असे प्रतिपादन महापौर निता ठाकरे यांनी यावेळी केले.

**हाय-टेक तपास ...** कळमना पोलिसांची धडक कारवाई, तांत्रिक पुराव्यांचे सखोल विश्लेषण

# ४३ लाखांची घरफोडी, ५ आरोपींना अटक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २४ : नागपूर शहरात वाढत्या घरफोडीच्या घटनांना आळा घालण्यासाठी नागपूर पोलिस सक्रिय झाले असून, कळमना पोलिसांनी मोठ्या घरफोडीचा छडा लावला आहे. शनिवारी घडलेल्या या प्रकरणात ५ आरोपींना ताब्यात घेत तब्बल ४२ लाख ७४ हजार ८७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**



पोलिस सूत्रानुसार, अज्ञात चोरट्यांनी २१ जानेवारी २०२६ रोजी भारतनगर येथील शिक्षक वसाहतीमधील आमना मोहम्मद इक्बाल यांच्या बंद घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला होता. घरातील कपाटातून सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम आणि इतर मौल्यवान वस्तूंसह सुमारे ४३ लाख रुपयांचा ऐवज लंपास केला होता. याप्रकरणी कळमना ठाण्यात गुन्हा क्रमांक ५६/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले तपासादरम्यान परिसरातील १५० पेक्षा जास्त सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. मोबाईल लोकेशन, सीडीआर आणि तांत्रिक पुराव्यांचे सखोल विश्लेषण करण्यात आले.यासोबतच गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी इतर राज्यांतील पोलिसांशीही संपर्क साधण्यात आला. यानंतर तपास पथक आरोपींपर्यंत पोहोचले तपासाअंती ५ आरोपींना निष्पन्न करून त्यांना ताब्यात घेतले.

### विशेष पथक

**पोलिस उपायुक्त निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनात पोलिस उपनिरीक्षक संतोषकुमार रामलोड यांच्या नेतृत्वात विशेष पथक तयार करण्यात आले. यात पोलिस हवालदार रविकुमार शाहू, पोलिस हवालदार प्रदीप पवार, पोलिस अंमलदार मंगेश लोही, संतोष पांडे, अनिल जाधव, प्रफुल्ल गोहोकार यांचा समावेश होता.**

# संत गाडगे महाराज यांना महावितरणचे अभिवादन



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २४ :** महाराष्ट्रातील एक थोर संत, समाजसुधारक आणि लोकशिक्षक, अंधश्रद्धा, अज्ञान, व्यसनाधीनता यांसारख्या सामाजिक कुप्रथांविरुद्ध आपल्या कीर्तनांद्वारे आणि कृतीतून जनजागृती करणा-या संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त महावितरणतर्फे त्यांना अभिवादन करण्यात आले.

महावितरणच्या काटोल मार्गावरील विद्युत भवन या मुख्यालयात अधीक्षक अभियंता मंगेश वैद्य यांनी गाडगे महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले, यावेळी सहायक मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव, कार्यकारी अभियंता अजित जिचकार, वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) सुधीर टेकाम, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने, प्रणाली विश्लेषक प्रविण काटोले यांचेसह अधिकारी व कर्मचा-यांनी देखील गाडगे महाराज यांना अभिवादन केले.

अजिंक्य भारत

# आपलं अकोला

अकोला, बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६ www.ajinkyabharat.com


## फळ-भाजी विक्रेत्यांचे हॉकर्स झोनमध्ये स्थलांतर

**अकोला:** शहरातील वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी आणि रस्ते मोकळे करण्यासाठी महापालिकेने आक्रमक पाऊल उचलले आहे. महापौर यांनी २३ फेब्रुवारी रोजी घेतलेल्या आढावा बैठकीतील निर्देशानुसार, मंगळवारी उमरी येथील मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात आले. पूर्व झोन कार्यालय आणि अतिक्रमण विभागाने संयुक्त कारवाई करत, मुख्य रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या फळ व भाजी विक्रेत्यांना महानगरपालिकेच्या जुनी शाळा क्र. ५ येथील अधिकृत हॉकर्स झोनमध्ये स्थलांतरित केले. या कारवाईमुळे उमरीचा मुख्य रस्ता आता मोकळा झाला असून वाहनधारकांना मोठा दिलासा मिळाला आहे. या मोहिमेत सहायक आयुक्त राजेश सरप, चंद्रशेखर इंगळे, प्रवीण मिश्रा, शैलेश पवार, अक्षय बोर्डे व राहुल राऊत यांच्यासह अतिक्रमण विभागाच्या पथकाने सहभाग घेतला. यापुढेही अनधिकृत अतिक्रमणांवर कारवाई सुरूच राहणार असल्याचे प्रशासनातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

**महत्त्वाचे**

### अग्रवाल युवक-युवती परिचय संमेलन

**अकोला :** अग्रवाल समिती अकोला व अ.भा. अग्रवाल संमेलनाच्या संयुक्त विद्यमाने महानगरात आयोजित अग्रवाल समाजाच्या उच्चशिक्षित युवक-युवती परिचय संमेलनाची जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे. रविवार, १ मार्च रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत जवाहर नगर परिसरातील महाराजा अग्रसेन भवनात हे आयोजन होणार आहे. एकाच छताखाली समाजातील युवक-युवतींचा परिचय होऊन खर्चिक विवाह पद्धतीला फाटा मिळावा, यासाठी हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या संमेलनात डॉक्टर, अभियंता, प्राध्यापक, आयटी प्रोफेशनल, उद्योजक असे ७४० विवाह इच्छुक युवक-युवतींचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. प्रथमच समाजाची ई-परिचय पुस्तिका मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करून पालकांना मोबाइलवर पाठवण्यात येणार आहे. संमेलनाच्या सफलतेसाठी उमेश खेतान, दीपक गोयनका, महेंद्र खेतान, डॉ. मनोज अग्रवाल प्रयत्न करीत आहेत.

जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांना सर्वोच्च न्यायालयाचा ब्रेक

# प्रशासकराज राहणार कायम

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २४ :** गेल्या अनेक महिन्यांपासून रखडलेल्या अकोला जिल्हा परिषद आणि त्या अंतर्गत येणाऱ्या सात पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून घेण्याची परवानगी राज्य शासनाने मागितली होती. मात्र, २३ फेब्रुवारी रोजी झालेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने अशा प्रकारे निवडणुका घेण्यास स्पष्ट शब्दांत मनाई केली आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे अकोला जिल्ह्यातील राजकीय वातावरणात पुन्हा एकदा अनिश्चितता निर्माण झाली असून, निवडणुका लांबणीवर पडल्या आहेत.

राज्यातील अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या वर गेल्यामुळे




**अकोल्यातील ७ पंचायत समित्यांच्या निवडणुकांवर परिणाम**

अकोला जिल्हा परिषदेसोबतच अकोला, अकोट, तेल्हारा, बाळापूर, पातूर, मूर्तिजापूर आणि बार्शीटाकळी या सात पंचायत समित्यांच्या निवडणुकाही याच निर्णयामुळे रखडणार आहेत. या निवडणुका वेळेवर न झाल्यामुळे सध्या या संस्थांवर प्रशासकीय राजवट सुरू आहे. लोकप्रतिनिधी नसल्यामुळे ग्रामीण भागातील विकासकामांवर परिणाम होत असल्याच्या तक्रारी नागरिकांमधून येत आहेत. मात्र, आता न्यायालयाच्या नव्या भूमिकेमुळे या निवडणुका किमान पुढचे काही महिने तरी होण्याची शक्यता मावळली आहे.

कायदेशीर पेच निर्माण झाला होता. ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून सर्वोच्च न्यायालयात प्रदीर्घ काळ सुनावणी सुरू आहे. अकोला जिल्हा परिषद ही अशा संस्थांपैकी एक आहे जिथे आरक्षणाचे गणित ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडत आहे. राज्य शासनाच्या विधीज्ञांनी न्यायालयाला विनंती केली होती की, न्यायालयाचा अंतिम निर्णय येईपर्यंत या निवडणुका घेण्याची परवानगी मिळावी, जेणेकरून प्रशासकीय कामे विस्कळीत होणार नाहीत. परंतु, न्यायालयाने जैसे थे परिस्थिती ठेवण्याचे निर्देश देत ही मागणी फेटाळून लावली.

**जिल्ह्यातील नागरिकांचे आणि इच्छुकांचे लक्ष**

निवडणुकीची घोषणा होईल या आशेवर असलेल्या ग्रामीण भागातील राजकीय इच्छुकांची यामुळे मोठी निराशा झाली आहे. अनेक इच्छुकांनी आपापल्या मतदारसंघामध्ये बांधणी सुरू केली होती, मात्र आता न्यायालयाच्या निर्णयामुळे त्यांना पुन्हा वाट पहावी लागणार आहे. दुसरीकडे, सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष आता याकडे लागले आहे की, आरक्षणाचा हा तिढा कधी सुटणार आणि सर्वोच्च न्यायालय आपला अंतिम निर्णय कधी देणार?

# भंडारजजवळ स्विफ्ट-एसटीची भीषण धडक; अकोटचा वृद्ध ठार

अंजनगाव-अकोट महामार्गावरील घटना; रस्ते विभागाच्या दुर्लक्षामुळे एकाचा बळी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. २४ :** अंजनगाव-अकोट राष्ट्रीय महामार्गावरील भंडारज येथील होली क्रॉस रुग्णालयाजवळ एसटी बस आणि स्विफ्ट कारची समोरासमोर भीषण धडक झाली. या अपघातात अकोट येथील शालिकराम रामचंद्र वानरे (वय ६५) यांचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य दोन जण गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, शालिकराम वानरे हे आपल्या कुटुंबासह अकोट येथून मुरा देवी (ता. अंजनगाव सुर्जी) येथे देवदर्शनासाठी जात होते. या प्रवासात त्यांच्यासोबत नवविवाहित दाम्पत्यही होते. भंडारजजवळील एका धोकादायक वळणावर रस्त्याला मोठा खड्डा पडलेला आहे. या खड्ड्याचा अंदाज न आल्याने कार (क्र. २७ ८०८१) वरील नियंत्रण सुटले आणि समोरून येणाऱ्या एसटी



बसला (क्र. ४० ३९३२) कारची जोरदार धडक बसली. धडक इतकी भीषण होती की कारचा चक्काचूर झाला. या अपघातात कुसुम वानरे (६५, अकोट) आणि रखमाबाई शालिग्राम गवई (८०, अकोला) या गंभीर जखमी झाल्या असून त्यांना अचलपूर येथे हलवण्यात आले आहे. तर नवविवाहित वर प्रथमेश वानरे, नववधू उत्कर्ष वानरे यांच्यासह विमल पिंपळकर, वंदना पिंपळकर, रमेश पिंपळकर हे किरकोळ जखमी झाले आहेत. आनंदाच्या प्रवासातच काळाने घाला घातल्याने अकोट परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

भंडाराज येथील या वळणावर रस्ता दबलेला असून मोठे खड्डे पडले आहेत. इशारा फलक आणि वेगमर्यादेचे फलक नसल्याने येथे वारंवार अपघात होतात. प्रशासनाने तातडीने रस्ता दुरुस्ती करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# मोठी उमरी परिसरात अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २४ :** शहरातील मोठी उमरी भागात मोठी अतिक्रमण निर्मूलन मोहीम राबवण्यात आली. येथील मुख्य रस्त्यावरील हॉलिडे बारच्या बाजूला शामराव वाहुरवाघ यांनी मंजूर नकाशाच्या व्यतिरिक्त अनधिकृत बांधकाम केले होते, तसेच मुख्य रस्त्यावर किरकोळ स्वरूपाची अतिक्रमणेही करण्यात आली होती. या तक्रारींची दखल घेत मनपा प्रशासनाने पोलीस प्रशासनाच्या चोख बंदोबस्तात या अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई करून रस्ता मोकळा केला.

या कारवाईदरम्यान महापालिकेने शहरातील सर्व अतिक्रमणधारकांना कडक इशारा दिला असून, मुख्य रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा



निर्माण करणारी अतिक्रमणे संबंधितांनी स्वतःहून काढून घ्यावीत व मनपा प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे. या धडक मोहिमेत सहायक अतिक्रमण निर्मूलन अधिकारी चंद्रशेखर इंगळे, प्रवीण मिश्रा, पोलीस कर्मचारी आशिष खंडारे, स्नेहल जोगळेकर, मंगेश चुनावाला, कनिष्ठ अभियंता अक्षय बोर्डे, राहुल राऊत यांच्यासह अतिक्रमण विभागातील कर्मचारी व पोलीस पथक उपस्थित होते.

# कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानामुळे येणार क्रांती

आ. रणधीर सावरकर यांनी मांडला विधानसभेत अभ्यासपूर्ण प्रस्ताव

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २४ :** राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये आज सत्ताधारी पक्षाच्या वतीने विधानसभा नियम २९३ अन्वये कृषी क्षेत्राशी संबंधित महत्त्वपूर्ण प्रस्ताव सादर करण्यात आला. भाजपचे मुख्य प्रतोद आणि आमदार रणधीर सावरकर यांनी या प्रस्तावावर ४५ मिनिटांचे अभ्यासपूर्ण भाषण करून राज्यातील कृषी धोरण आणि भविष्यातील आव्हानांवर सविस्तर प्रकाश टाकला. शाश्वत शेती, समृद्ध शेतकरी या ध्येयानुसार शेतकऱ्यांचे आर्थिक बळकटीकरण करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर अनिवार्य असल्याचे त्यांनी यावेळी ठामपणे मांडले.

आमदार सावरकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करणे काळाची गरज आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने महाॲग्री धोरण २०२५-२९ तयार केले आहे. दिल्ली आणि मुंबई येथे झालेल्या २०२६ च्या परिषदेमध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेल्या प्रगत कृषी धोरणामुळे जागतिक तंत्रज्ञानाच्या नकाशावर महाराष्ट्राचे स्थान उंचावले आहे. या तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांच्या आयुष्यात मोठी क्रांती




घडणार असल्याचे त्यांनी नमूद केले. नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेचे (पोकरा) सह-अध्यक्ष म्हणून माहिती देताना आमदार सावरकर यांनी या नाविन्यपूर्ण उपक्रमाची माहिती दिली. या ॲपच्या माध्यमातून शेतकरी, नागरिक, व्यापारी आणि तंत्रज्ञांना एकाच ठिकाणी सर्व माहिती उपलब्ध होईल. सुरुवातीला ऊस पिकावर प्रयोग झाले असले तरी, आता सोयाबीन, कापूस आणि गहू या पिकांसाठीही हे तंत्रज्ञान प्रभावी ठरेल. पनवेल येथे शासन स्वतंत्र विद्यापीठाची निर्मिती करत असल्याची माहितीही त्यांनी दिली.

# स्थायी समिती सभापती निवडणूक २ मार्चला

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २४ :** महापालिकेतील स्थायी समिती सभापती पदांच्या निवडीचा कार्यक्रम जाहीर झाला असून, येत्या सोमवार, २ मार्च रोजी ही निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. यामध्ये स्थायी समिती सभापती, महिला व बालकल्याण समिती सभापती आणि प्रभाग समिती सभापती या पदांचा समावेश आहे. या निवडणुकीसाठी पीठासीन अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी वर्षा मीना यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या आदेशानुसार ही विशेष बैठक २ मार्च रोजी सकाळी ११ वाजता महापालिकेच्या स्थायी समिती सभागृहात बोलावण्यात आली आहे. या बैठकीत सर्व समिती सभापतींच्या निवडीचे कामकाज पूर्ण केले जाईल. निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी प्रशासनाने वेळापत्रक निश्चित केले आहे. बुधवार, २५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत अर्ज वाटप करण्यात येणार असून; गुरुवार, २६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत महापालिका सचिव कार्यालयात अर्ज स्वीकारण्यात येतील.

भाजपकडून अनेक दावेदार इच्छुकांच्या रांगेत असले तरी, सध्या विजय अग्रवाल यांचे नाव आघाडीवर असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला उद्या, बुधवारपासून सुरुवात होत असल्याने महापालिकेतील राजकीय वातावरण तापले असून, कोणत्या गटाला कोणती पदे मिळतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# रस्त्याची दुरवस्था; बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर ठिय्या

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २४ :** जिल्ह्यातील रस्त्यांची झालेली दुरवस्था आणि प्रशासकीय दिरंगाईविरोधात भ्रष्टाचार निर्मूलन समितीने आक्रमक पवित्रा घेतला असून, सार्वजनिक बांधकाम विभागाविरुद्ध तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. समितीच्या वतीने अकोला विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन सादर करण्यात आले असून, ६ मार्चपासून बेमुदत उपोषण छेडण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

समितीने दिलेल्या माहितीनुसार, उगवा फाटा ते आगार तसेच रेल्वे गेट ते अमानतपूर, भोड आणि हातरुण या मार्गांवरील रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. या मार्गांचे तातडीने डांबरीकरण करण्याची मागणी वारंवार करण्यात आली होती. रस्ते दुरुस्तीसोबतच काही ठिकाणी नवीन पुलांच्या बांधकामाचीही आवश्यकता आहे. या संदर्भात समितीने अनेकदा पत्रव्यवहार करूनही प्रशासनाकडून केवळ आश्वासनेच मिळाली, मात्र ठोस कार्यवाही झाली नाही, असा आरोप समितीने केला आहे. विशेष म्हणजे, संबंधित कामांसाठी १२ फ ेब्रुवारीपर्यंत निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले होते. ती मुदत उलटल्यानंतर निविदा प्रक्रिया रद्द झाल्याचे सांगत २० फेब्रुवारीपर्यंत काम पूर्ण करण्याचे तोंडी आश्वासन प्रशासनाने दिले होते. मात्र, दिलेल्या मुदतीनंतरही अद्याप प्रत्यक्ष कामाला सुरुवात न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

# आंबेडकर नगरात किरकोळ वादातून चाकूहल्ला

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २४ :** शहरातील आंबेडकर नगर परिसरात किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून तिघांवर चाकूने हल्ला केल्याची घटना सोमवारी मध्यरात्री घडली. याप्रकरणी सिव्हिल लाईन पोलीस स्टेशन येथे तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी व जखमी विशाल अशोक तेलगोटे (वय ४५, रा. नवीन बस स्थानकागे, आंबेडकर नगर) यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक बालोद करीत असून, दाखल अधिकारी म्हणून हेड कॉन्स्टेबल अजय राऊत आहेत.

ही घटना २४ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १ वाजेच्या सुमारास नवीन बस स्थानकामागील आंबेडकर नगर येथे घडली. फिर्यादींचा पुतण्या तुषार हा मित्रांसोबत बोलत असताना आरोपी तेथे आले. आरोपी क्रमांक १ ऋषभ विलास रायबोले (वय २३) याने तुषारच्या अंगावर पेटती सिगारेट फेकल्याने त्यांच्यात वाद झाला.

ही बाब तुषारने घरी सांगितल्यानंतर फिर्यादी विशाल तेलगोटे यांनी बुद्ध विहाराजवळ जाऊन संबंधित आरोपींना जाब विचारला. त्यावेळी आरोपी संदीप संतोष गवई (वय २५) व आरोपी सतीश गोपाल गवई (वय २५) यांनी शिवीगाळ केली. त्यानंतर आरोपी क्रमांक १ ऋषभ रायबोले याने विशाल तेलगोटे यांच्या डाव्या बरगडीत चाकूने वार केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

याचदरम्यान फिर्यादींचा पुतण्या कुणाल याच्या पोटात व उजव्या हातावर, तर तुषारच्या डोक्याच्या मागील बाजूस चाकूने वार करण्यात आले. या हल्ल्यात तिघेही जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. तसेच आरोपींनी "तुमच्या घरच्यांना जीवाने मारू" अशी धमकी दिल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. घटनेनंतर २४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४:१३ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करीत आहेत.

**हस्तकला...**



**अकोला: परप्रांतीय हस्त कलाकार शहरातील काही भागात डेरा टाकून बसलेले आहेत हे कलाकार बांबु पासून सोफा, झुला, टेबल, खुर्ची इत्यादि प्रकारच्या वस्तू विकून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवतात ह्या बांबूच्या वस्तूला ग्राहकांची चांगलीच पसंती मिळत आहे.**


(छाया. संजय ताथुरकर)

**दुर्लक्ष** — अकोलेकरांचे आरोग्य धोक्यात; डासांचा प्रादुर्भाव

# मोर्णा पुन्हा जलकुंभीच्या विळख्यात; स्वच्छता निरीक्षक जबाबदार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २४ :** शहराची जीवनवाहिनी असलेल्या मोर्णा नदीच्या पात्रातील जलकुंभीचा प्रशासनाने पूर्णतः सफाया केला होता, मात्र संबंधित यंत्रणेच्या हलगर्जीपणामुळे आता पुन्हा नदीपात्रात जलकुंभीने डोके वर काढले आहे. आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनील लहाने यांनी कोणतेही बाह्य कंत्राट न देता महापालिका स्तरावर पुढाकार घेऊन मोर्णा नदी जलकुंभीमुक्त केली होती. ही मोहीम राबवल्यानंतर नदी पुन्हा प्रदूषित होऊ नये आणि जलकुंभीचा उगम पुन्हा होऊ नये, याची महत्त्वाची जबाबदारी संबंधित स्वच्छता



निरीक्षकांवर सोपवण्यात आली होती.

मात्र, स्वच्छता निरीक्षकांनी या जबाबदारीकडे पूर्णतः दुर्लक्ष केल्याचे सध्याचे चित्र आहे. देखभालीच्या अभावामुळे नदीपात्रात जलकुंभीचा विळखा पुन्हा वाढू लागला असून, यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. प्रशासकाने स्वतः लक्ष घालून स्वच्छ केलेल्या नदीची ही दुरवस्था झाल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. जलकुंभीमुळे पाण्याचा प्रवाह थांबून दुर्गंधी पसरत आहे, ज्याचा थेट परिणाम अकोलेकरांच्या आरोग्यावर होण्याची भीती वर्तवण्यात येत आहे. आता पुन्हा याकडे गांभीर्याने लक्ष देऊन कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी जोर धरत आहे.

**मोर्णा नदीच्या स्वच्छतेसाठी महापौर सरसावल्या मोर्णा नदीच्या पात्रात उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच जलकुंभी वाढू लागली आहे. वाढत्या जलकुंभीमुळे शहरात डासांचा प्रादुर्भाव वाढून नदीकाठच्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेऊन महापौर शारदा खेडकर यांनी मंगळवारी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी जलकुंभीचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून आले. जलकुंभीचा विस्तार होण्यापूर्वीच तातडीने स्वच्छता मोहीम राबवून नागरिकांना दिलासा देण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले आहेत. या निर्णयामुळे शहरवासीयांना संभाव्य आजारांपासून संरक्षण मिळण्यास मदत होणार आहे.**

# ७ वर्षीय मुलासमोर वडिलांचा निर्घृण खून; आरोपी श्रीराम सोळंके यांचा जामीन अर्ज फेटाळला

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २४ :** अकोट येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने तेल्हारा तालुक्यातील हिंगणी बु. येथील खून प्रकरणातील मुख्य आरोपी श्रीराम सीताराम सोळंके (वय ५९) यांचा जामीन अर्ज फेटाळला आहे. विशेष जिल्हा व सत्र न्यायाधीश बी. एम. पाटील यांनी हा आदेश दिला.

तेल्हारा तालुक्यातील हिंगणी बु. येथील ३५ वर्षीय दिगंबर कोरडे यांच्या खूनप्रकरणी हिवरखेड पोलीस स्टेशन येथे अपराध क्रमांक ४२३/२०२४ अन्वये भारतीय न्याय संहिता () कलम १०३(१), ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल आहे. या प्रकरणात आरोपी २८ नोव्हेंबर २०२४ पासून अकोला कारागृहात न्यायालयीन कोठडीत आहे.

सरकारतर्फे सरकारी वकील ॲड. अजित देशमुख यांनी जामीन अर्जाला ठाम विरोध करत न्यायालयात सविस्तर युक्तिवाद सादर केला. फिर्यादी असलेल्या ३० वर्षीय पत्नीने दिलेल्या तक्रारीनुसार, तिचे पती दिगंबर कोरडे यांनी गावातील बंडू कोरडे यांच्याकडून २५ हजार रुपये उसने घेतले होते. २७ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास दिगंबर कोरडे ओट्यावर बसलेले असताना त्यांचा ७ वर्षीय मुलगा घाबरलेल्या अवस्थेत आईकडे धावत आला आणि "बाबांना छातीवर बसून मारत आहेत," असे सांगितले. पत्नी घटनास्थळी पोहोचली असता, आरोपी श्रीराम सोळंके हे दिगंबर यांच्या छातीवर बसून बुक्क्यांनी मारहाण करत होते व केस धरून डोके जमिनीवर आपटत होते. तर आरोपी योगेश सोळंके व नागेश सोळंके हे लाथांनी मारहाण करत होते.

पत्नी व मुलगा पोहोचताच आरोपी तेथून पसार झाले. जखमी दिगंबर यांना तातडीने शासकीय रुग्णालयात नेण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

शवविच्छेदन अहवालात ९ जखमा सरकारी पक्षाने न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, शवविच्छेदन अहवालानुसार मृतकाच्या शरीरावर एकूण ९ जखमा आढळून आल्या आहेत. या प्रकरणातील दोन प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणजे मृतकाची पत्नी आणि त्यांचा ७ वर्षीय मुलगा. या अल्पवयीन मुलाचा जबाब भारतीय न्याय संहिता कलम १८३ अन्वये तेल्हारा येथील प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर नोंदवण्यात आला आहे.

महत्त्वाचे

## भाजी विक्रेत्या महिलेचा विनयभंग

**मूर्तिजापूर:** तालुक्यातील मुंगशी येथील आठवडी बाजारात भाजीपाला विक्रीच्या कारणावरून झालेल्या वादात एका महिलेचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी मूर्तिजापूर ग्रामीण पोलिसांनी दोन नामजद आणि दोन अनोळखी अशा एकूण चार जणांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, २२ फेब्रुवारी रोजी सकाळी १०:३० वाजताच्या सुमारास फिर्यादी महिला आपल्या पतीसह आणि कामगारासोबत आठवडी बाजारात भाजीपाला विक्री करत होती. यावेळी एका पांढऱ्या रंगाच्या कारचे चाक भाजीपाल्याच्या दुकानावरून गेल्याने महिलेने कारचालकाला जाब विचारला. या साध्या कारणावरून वादाला तोंड फुटले.

महिलेस दिलेल्या तक्रारीनुसार, या वादाचे रूपांतर गंभीर भांडणात झाले. यावेळी संबंधित व्यक्तींनी महिलेशी गैरवर्तन करून ढकलाढकली केली. तसेच अश्लील शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद आहे. या तक्रारीवरून पोलिसांनी विविध कलमांअन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणात पोलिसांनी अविनाश चव्हाण आणि आकाश चव्हाण अशी नावे निष्पन्न केली असून, त्यांच्यासोबत असलेल्या इतर दोन अनोळखी व्यक्तींचा शोध सुरू आहे. घटनेचा अधिक तपास हेडकॉन्स्टेबल गणेश गावंडे करीत आहेत.

## जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला 'जलजीवन मिशन'चा आढावा

**अकोला, दि. २४ :** जिल्ह्यातील प्रत्येक कुटुंबाला नळजोडणीद्वारे शुद्ध पाणीपुरवठा करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सर्व यंत्रणांनी सर्वतोपरी प्रयत्न करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या.

यावेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता नीलेश राठोड यांनी प्रगती अहवाल सादर केला. मिशनअंतर्गत जिल्ह्यातील एकूण ५२३ गावांचा समावेश असून, त्यात अकोट (१४५), तेल्हारा (९६), अकोला (८९), मूर्तिजापूर (७१), बाळापूर (६५), बार्शीटाकळी (२९) आणि पातूरमधील २८ गावांचा समावेश आहे.

४ जुन्या व ११ नवीन योजनांची कामे अंतिम टप्प्यात असून, अनेक योजना ९० टक्क्यांहून अधिक पूर्ण झाल्या आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी शाळा व अंगणवाड्यांच्या पाणीपुरवठ्याचाही आढावा घेत कामांचा नियमित पाठपुरावा करण्याच्या सूचना दिल्या.

# ग्रामीण भागात 'बर्थडे'चा धिंगाणा; मोटारसायकलवर केक अन् फटाक्यांचा थरार!

## सुरक्षितता धाब्यावर; रात्रीच्या आरडाओरड्यामुळे लहान बालके अन् वृद्ध त्रस्त

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**उमरा, दि. २४ :** ग्रामीण भागात वाढदिवस साजरा करण्याच्या नावाखाली सध्या सुरू असलेला हुल्लडबाजीचा नवा ट्रेंड नागरिकांच्या डोकेदुखीचा विषय ठरत आहे. मोटारसायकलवर केक ठेवून कापणे, तो एकमेकांच्या चेहऱ्याला फासून अन्नाची नासधूस करणे आणि भररस्त्यात फटाक्यांची आतिशबाजी करत वाहतुकीला अडथळा निर्माण करण्याचे प्रकार वाढले आहेत. या विकृत होत चाललेल्या साजरीकरणामुळे सार्वजनिक शांतता धोक्यात आली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, रात्री उशिरापर्यंत चौकाचौकांत तरुणांची गर्दी जमते. मोठ्या आवाजात फटाके फोडले जात असल्याने घरातील लहान बालके दचकून जागी होत आहेत, तर हृदयविकार असलेल्या वृद्धांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. ध्वनीप्रदूषणाचे नियम धाब्यावर बसवून होणाऱ्या या जल्लोषाबद्दल स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

आनंद साजरा करण्याला कोणाचा विरोध नाही, पण इतरांना वेठीस धरणे कितपत योग्य? असा सवाल सुज्ञ नागरिक विचारत आहेत.

रस्त्यावर वाहने उभी करून केक कापल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. अनेकदा अशा जल्लोषात वादावादीचे प्रकारही घडतात. ''केक खाण्यासाठी असतो की वाया घालवण्यासाठी?'' अशी चर्चा असून, संस्कृतीच्या नावाखाली चाललेला हा पाश्चात्य प्रकार सामाजिक विघातक ठरत असल्याची खंत ज्येष्ठ नागरिक व्यक्त करत आहेत.

पोलिसांनी अशा हुल्लडबाजांवर कायदेशीर वचक बसवावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

### हुल्लडबाजी नको, सामाजिक भान जपा!

❑ सार्वजनिक ठिकाणी वाढदिवसाचा धिंगाणा घालण्यापेक्षा वृक्षारोपण, रक्तदान किंवा गरजूंना मदत करून सामाजिक जबाबदारी जोपासावी. केवळ दिखाव्यासाठी अन्नाची नासधूस आणि फटाक्यांमुळे इतरांना होणारा त्रास टाळून सुसंस्कृतपणे आनंद साजरा करणे हीच काळाची गरज आहे.

आधुनिकतेच्या नावाखाली सामाजिक जबाबदारी विसरणाऱ्या या तरुणांनी विधायक उपक्रमांकडे वळणे काळाची गरज बनली आहे.

## चान्नी येथे शिवजयंती उत्साहात साजरी

### आनंद बुद्ध विहारात प्रतिमा पूजन; शिवविचारांचा मांडला आढावा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**चान्नी, दि. २४ :** येथील आनंद बुद्ध विहार (रजि. क्र. १४६४) यांच्या कार्यालयात १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात मान्यवरांनी शिवरायांच्या विचारांचा जागर केला.

कार्यक्रमाची सुरुवात शिवाजी महाराजांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. पूजनाचा मान आनंद बुद्ध विहाराचे अध्यक्ष श्रावण सोनोने व पंचफुलाबाई सोनोने यांना मिळाला.

यावेळी सरपंच मोहन सोनोने, पंजाबराव सोनोने व विनायक सोनोने यांनीही प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. पंजाबराव सोनोने यांनी शिवरायांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकत, त्यांचे कार्य



आजही प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

या सोहळ्याला संस्थेचे भास्कर सोनोने, सुधाकर सोनोने, अविनाश सोनोने, साहित्यिक दिनकर बोदडे, सुरेश कळंबे, हिंमत सोनोने, दिलीप सोनोने, सतीश सोनोने, पुंजाजी सरदार, निरंजन सरदार यांच्यासह गावातील नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन शेतकरी संघटनेचे रवी सोनोने यांनी केले, तर आभार प्रदर्शन संजय सोनोने यांनी मानले.

## समाजमंदिराच्या जागेसाठी जनुनावासीय उपोषणाला

### टीनशेडचे अतिक्रमण हटविण्याची मागणी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. २४ :** तालुक्यातील जणूना बु. येथील बौद्ध वस्तीतील समाजमंदिरावर एका व्यक्तीने अतिक्रमण केल्याने खळबळ उडाली आहे. हे अतिक्रमण तातडीने हटविण्याच्या मागणीसाठी संतप्त बौद्ध बांधव आणि अनुयायांनी २३ फेब्रुवारीपासून मंगरुळपीर तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जणूना बु. गावात बौद्ध बांधवांच्या वस्तीत ७० बाय ७० (४९०० चौरस फूट) जागेत समाजमंदिर आहे. या समाजमंदिराच्या मोकळ्या जागेवर गावातीलच एका सेवानिवृत्त शिक्षकाने टीनशेड टाकून आणि त्यामध्ये




कुटार भरून जागा ताब्यात घेण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या अतिक्रमणामुळे समाजमंदिराच्या पवित्र्यास बाधा येत असून, सार्वजनिक जागेचा वापर करणे कठीण झाले आहे.

या संदर्भात संबंधित प्रशासनाकडे वेळोवेळी लेखी व तोंडी तक्रारी करण्यात आल्या होत्या. मात्र, प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची दखल न घेतल्याने आणि कोणतीही ठोस कारवाई न केल्यामुळे अखेर ग्रामस्थांनी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे.

जोपर्यंत अतिक्रमण काढले जात नाही, तोपर्यंत उपोषण मागे न घेण्याचा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला आहे.

## माजी जवान संतोष तायडे अमेरिकेत देशाचे प्रतिनिधित्व करणार

**मूर्तिजापूर प्रतिनिधी:** मूर्तिजापूर तालुक्यातील उनखेड येथील बीएसएफचे माजी जवान संतोष तायडे (वय ४८) यांनी ४२ किमीची मॅराथॉन यशस्वीरीत्या पूर्ण करत अमेरिकेतील प्रतिष्ठित बॉस्टन मॅराथॉन स्पर्धेसाठी पात्रता मिळवून जिल्ह्याचा मान उंचावला आहे. संतोष तायडे सध्या महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ (मेस्को, पुणे) अंतर्गत नागपूर महानगरपालिकेत सुरक्षा सेवेत कार्यरत आहेत. आपली कर्तव्ये सांभाळत त्यांनी कठोर सरावाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. दिल्ली येथे पार पडलेल्या एनडीएम मॅराथॉनमध्ये त्यांनी ४२ किमी अंतर अवघ्या ३ तास ०६ मिनिटे ५२ सेकंदात पूर्ण केले. या उल्लेखनीय कामगिरीमुळे त्यांना जगातील सर्वात जुन्या आणि नामांकित अशा बॉस्टन मॅराथॉनचे तिकीट मिळाले आहे.

## राष्ट्रीय लोक आंदोलन न्यासचा एल्गार

### देशव्यापी आंदोलनाचा इशारा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. २४ :** देश बदलायचा असेल तर प्रत्येक नागरिकाने देण्याची वृत्ती आणि समर्पणाची भावना अंगीकारली पाहिजे, असे प्रतिपादन राष्ट्रीय लोक आंदोलन न्यासाच्या कार्याध्यक्ष कल्पनाताई इनामदार यांनी केले. कवी विंदा करंदीकर यांच्या कवितेचा संदर्भ देत त्यांनी कार्यकर्त्यांना समाजसेवेचे आवाहन केले.

महाराष्ट्र दौऱ्यादरम्यान स्थानिक विश्रामभवनात आयोजित संघटन बैठकीत त्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. यावेळी मंचावर राष्ट्रीय खजिनदार दत्ता आवारी, कार्यालयीन व्यवस्थापक अन्सार शेख, वाशिम जिल्हाध्यक्ष सुधाकर चौधरी, सचिव संदीप पिंपळकर, प्रशांत सरनाईक, इरफान सय्यद आदींची उपस्थिती होती.



पद्मभूषण अण्णा हजारे यांच्या जीवनातील पंचसुत्री आत्मसात करण्याचे आवाहन करताना कल्पनाताई म्हणाल्या की, ''कार्यकर्ते हीच अण्णांची ताकद आहे. माहितीचा अधिकार, दप्तर दिरंगाई यांसारख्या कायद्यांसाठी अण्णांनी सरकारला झुकवले. लोक आंदोलन न्यास हा व्यवस्थेला कायद्याची अंमलबजावणी करण्यास भाग पाडण्यासाठी आहे. आता व्यापक जनआंदोलनाशिवाय पर्याय नाही. शेतीमालाला हमीभाव, कर्जमाफी, सिंचन सुविधा आणि पीकविमा अंमलबजावणी या मुद्द्यांवर देशव्यापी आंदोलन उभारण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला. यावेळी जिल्ह्यातील नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले.

बैठकीला गजानन व्यवहारे, गोपाल खिराडे, सय्यद जाकीर, कैफ जाकीर, सुनील बुरे, किरण पडघान, सुनिता पाटील, गीता वोरा, उज्वला चौधरी, रचना मेहता, अश्विनीताई अवताडे यांसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष सुधाकर चौधरी यांनी केले, तर सूत्रसंचालन गजानन व्यवहारे यांनी केले.

## लिंबूच्या शेतात आढळला अजगर



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २४ :** तालुक्यातील कोळंबी येथील प्रभात भुईभार यांनी मुस्तफापूर येथील स्नेहल ठाकरे यांच्या लिंबूच्या शेतात अजगर असल्याची माहिती दिली. या माहितीवरून सर्पमित्र प्रशांत नागे व कुमार सदाशिव यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.पाहणी केली असता, तो रॉक पायथन जातीचा अजगर असल्याचे निष्पन्न झाले. सर्पमित्रांनी मोठ्या कौशल्याने अजगराला सुरक्षितरीत्या पकडून कोणतीही इजा होऊ न देता निसर्गाच्या सानिध्यात मुक्त केले. या मोहिमेत पोलीस पाटील राजेश कानकिरड, तंटामुक्ती अध्यक्ष विक्की खांदेल व शुभम छबिले यांनी मोलाचे सहकार्य केले. सर्पमित्रांच्या या तत्परतेमुळे शेतातील संभाव्य धोका टळल्याने ग्रामस्थांनी सुटकेचा नि:श्वास टाकला आहे.

## श्री शिवाजी महाविद्यालयात श्रमदानाने साजरी झाली गाडगे बाबांची जयंती

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. २४ :** स्थानिक श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात कर्मयोगी संत गाडगे महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने महाविद्यालयात प्रतिमा पूजन व भव्य श्रमदान मोहिमेचे आयोजन करून बाबांच्या स्वच्छता हीच सेवा या विचारांना उजाळा देण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. एच. पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



डॉ. संतोष पाटोळे होते. प्रमुख उपस्थिती म्हणून ज्युनियर कॉलेजचे पर्यवेक्षक प्रा. संजय पट्टेबहादूर, एमसीव्हीसी प्रमुख प्रा. अर्चना कुचे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. भरत नागरे, सहकार्यक्रम अधिकारी डॉ. प्रतिभा पवित्रकार तसेच प्रा. सुरेंद्र देशमुख उपस्थित होते.

सुरुवातीला संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मान्यवरांनी आपल्या भाषणातून गाडगे बाबांच्या समाजसेवा व मानवतेच्या विचारांतून विद्यार्थ्यांना प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.

यानंतर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने संपूर्ण महाविद्यालय परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून परिसर स्वच्छ केला. या श्रमदानामध्ये आशिष वानखडे, मेहुल व्यास आणि ओम ठोंबरे या विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण झाली.

## २६ला सात ठिकाणी रास्ता रोको आंदोलन


**अकोट :** केंद्र व राज्य सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांविरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष आक्रमक झाला आहे. या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी येत्या २६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता अकोट तालुक्यातील सात प्रमुख ठिकाणी एकाच वेळी रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. या आंदोलनाचे नेतृत्व आमदार नितीन देशमुख करणार असून, मंगेश काळे व गोपाळ दातकर यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. प्रामुख्याने अमेरिकेसोबतचे शेतकरी विरोधी करार रद्द करणे आणि राज्य सरकारने जाहीर केलेले प्रति हेक्टरी १७ हजार रुपयांचे पीक विमा अनुदान तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावे.

आवाहन | ३ मार्चला यंदाचे एकमेव दृश्य चंद्रग्रहण

# अकोलेकरांना अनुभवता येणार 'सावल्यांचा खेळ'

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २४ : निसर्गातील सर्वात विलोभनीय आणि कुतूहल निर्माण करणारा खगोलीय चमत्कार अर्थात चंद्रग्रहण येत्या ३ मार्च रोजी घडणार आहे. विशेष म्हणजे, या वर्षात एकूण चार ग्रहणे होणार असली, तरी अकोलेकरांसह संपूर्ण महाराष्ट्राला दिसणारे हे या वर्षातील एकमेव दृश्य ग्रहण ठरेल. चंद्र उदयाला येतानाच ग्रहणावस्थेत असणार असल्याने खगोलशास्त्रात याला ग्रस्तोदित चंद्रग्रहण असे संबोधले जाते.**




पृथ्वी जेव्हा सूर्य आणि चंद्राच्या मध्ये एका सरळ रेषेत येते, तेव्हा चंद्र पृथ्वीच्या दाट सावलीत आल्याने हे ग्रहण घडते.

फाल्गुनी पौर्णिमेला होणाऱ्या या ग्रहणाची सुरुवात भारतीय वेळेनुसार दुपारी ३ वाजून २० मिनिटांनी होईल. ग्रहणाचा मध्य ५ वाजून ०३ मिनिटांनी असून, मोक्ष (समाप्ती) सायंकाळी ६ वाजून ४७ मिनिटांनी होईल.

हे ग्रहण भारताच्या पूर्व भागात अधिक वेळ आणि खग्रास (पूर्ण चंद्र झाकलेला) स्थितीत दिसेल, तर पश्चिम भागात ते खंडग्रास स्थितीत अनुभवायला मिळेल. अकोला परिसरात ग्रहण कालावधी केवळ २० मिनिटांचा राहील. त्यामुळे सायंकाळी ६ वाजून २७ मिनिटांनी चंद्रोदय होताना पूर्व क्षितिजावर हे दृश्य पाहणे नागरिकांसाठी सोयीचे ठरेल.

या ग्रहणाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, यावेळी चंद्र सिंह राशीत मघा ताऱ्यासोबत असेल. याच वेळी चंद्राच्या किंचित वरच्या बाजूला मिथुन राशीतील गुरु ग्रह अत्यंत तेजस्वी स्वरूपात उघड्या डोळ्यांनी पाहता येईल. ही नैसर्गिक घटना असून नागरिकांनी कोणत्याही अंधश्रद्धेला बळी न पडता या वैज्ञानिक आविष्काराचा आनंद घ्यावा, असे आवाहन विश्वभारती केंद्राद्वारे करण्यात आले आहे.

### ग्रहणाची वेळ व स्थिती

❑ सुरुवात दुपारी ३:२०, मध्य ५:०३, तर मोक्ष ६:४७ वाजेपर्यंत असेल. अकोल्यात सायंकाळी ६:२७ वाजता ग्रस्तोदित अवस्थेत चंद्रोदय होईल. पुढील २० मिनिटे अकोलेकरांना हे खंडग्रास ग्रहण पाहता येईल. यावेळी गुरु ग्रहाचेही दर्शन घडणार आहे.

## प्रसिद्ध कवी संजय अरबट यांची 'मायबोली' कविता आता विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात

### संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा निर्णय; अकोटच्या शिरपेचात मानाचा तुरा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. २४ :** स्थानिक सरस्वती नगर येथील रहिवासी आणि प्रसिद्ध कवी, गीतकार तथा गीतासाहित्य मराठी परिषदेचे अध्यक्ष संजय मधुकर अरबट यांच्या लेखणीचा गौरव झाला आहे. त्यांची मायबोली ही प्रसिद्ध कविता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या बी.ए. भाग-२ (सत्र ४) च्या मराठी विषयाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (एन ई पि ) नुसार तयार करण्यात आलेल्या संपादित वऱ्हाडी कविता या पाठ्यपुस्तकात या कवितेचा समावेश झाला आहे. या पुस्तकाचे संपादन डॉ. काशीनाथ बऱ्हाटे, डॉ. अशोक इंगळे, डॉ. श्रीकृष्ण पदमणे व इतर संपादक मंडळाने केले असून, ज्ञानपथ पब्लिकेशन्स, अमरावती यांनी ते प्रकाशित केले आहे.

मूळचे मुऱ्हा देवी (ता. अकोट) येथील रहिवासी असलेले संजय अरबट यांचे आतापर्यंत चार कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या प्रदीर्घ साहित्य सेवेसाठी त्यांना १९९८ मध्ये ज्ञानेश्वर: काल आणि आज पुरस्कार, २००४ मध्ये साहित्य सेवा पुरस्कार, २००७ मध्ये स्व. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन पुरस्कार, तसेच महाराष्ट्र प्रथम कवी पुरस्कार (२०२३) आणि नुकताच पुणे येथे समाज महर्षी



पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. त्यांची मुऱ्हाई देवीवर आधारित आई जोगवा व मुऱ्हाई देवीला चला ही गीते अत्यंत लोकप्रिय आहेत. ९६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात (वर्धा) त्यांच्या काव्यवाचनाचा गौरव करण्यात आला होता. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात त्यांच्या कवितेचा समावेश झाल्याबद्दल अकोटसह जिल्हाभरातील साहित्यिक आणि मित्रपरिवाराकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# वाशिमच्या वाट्याला मुंबई प्रवासाचा वनवासच!

## तीन वर्षे उलटली तरी नांदेड-मुंबई रुळावर येईना

। धनंजय कपाले ।

**वाशिम, दि. २४ :** रेल्वे प्रशासनाचे नियोजनशून्य कारभारी आणि लोकप्रतिनिधींची अनास्था यामुळे वाशिमच्या प्रवाशांच्या नशिबी मुंबईचा प्रवास आजही वनवास म्हणूनच उरला आहे. गाडी क्रमांक १७६६५/६६ आणि १७६६७/६८ नांदेड - मुंबई (लोकमान्य टिळक टर्मिनस) या रेल्वेगाड्यांची घोषणा होऊन तीन वर्षांचा काळ लोटला, पण अद्याप या गाडीचे साधे दर्शनही वाशिमच्या रुळांवर झालेले नाही. मंजुरी मिळूनही चाके का फिरत नाहीत? हा प्रश्न आता संतापाच्या लाटेसह उपस्थित केला जात आहे.

वाशिम जिल्हाचे मुख्यालय रेल्वे नकाशावर असूनही मुंबईसारख्या महानगराशी थेट जोडले न जाणे, हे या भागाच्या विकासाचे दुर्दैवच म्हणावे लागेल. सद्यस्थितीत वाशिममधून मुंबईला जाण्यासाठी एकही थेट रेल्वेगाडी नाही. परिणामी, लहान मुले, वृद्ध आणि रुग्णांना आधी बसने ठेवकाळत अकोला गाठावे लागते आणि तिथून मुंबईची गाडी पकडावी लागते. हक्काची रेल्वे गाडी मंजूर असतानाही ती सुरू न होणे, हे वाशिमच्या जनतेच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखेच आहे. प्रवाशांचा वेळ, पैसा आणि मनस्ताप याचा हिशोब रेल्वे प्रशासन कधी देणार, हा खरा सवाल आहे.




अकोला आणि हिंगोली या दोन्ही मतदारसंघातील प्रवाशांचा या गाडीशी थेट संबंध आहे. या तिन्ही खासदारांनी जर ताकद लावली, तरच रेल्वे मंत्रालयाची सुस्त यंत्रणा जागी होईल.

प्रवाशांचा संताप अन् प्रश्नांची सरबत्ती मंजूर झालेली ही गाडी आठवड्यातून दोन दिवस चालणार आहे. पूर्णा-वसमत-हिंगोली- वाशिम- अकोला-मलकापूर-भुसावळ- मनमाड-कल्याण असा या गाडीचा मार्ग आहे. ही गाडी सुरू झाल्यास वाशिमच्या प्रवाशांना अकोल्याच्या फेऱ्यातून कायमची मुक्ती मिळेल. मात्र, तीन वर्षांपासून रेल्वे प्रशासनाने या गाड्यांना यार्डमध्येच अडकवून ठेवले आहे की मंजुरीच्या फाईल्स धुळखात पडल्या आहेत, याची स्पष्टता कुणीही द्यायला तयार नाही. मुंबई हे केवळ रोजगाराचे ठिकाण नसून विदर्भातील लोकांसाठी ते एक महत्त्वाचे केंद्र आहे. या संवेदनशून्य कारभाराविरोधात आता प्रवासी संघटनांनीही आक्रमक पवित्रा घेण्याची तयारी दर्शवली आहे. जर येत्या काळात या मंजूर रेल्वेगाड्यांचे वेळापत्रक जाहीर झाले नाही, तर लोकप्रतिनिधींना जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागेल, हे निश्चित.

### खासदारांच्या पॉवरकडे लक्ष

या प्रलंबित प्रश्नावर आता राजकीय इच्छाशक्तीची गरज अधोरेखित होत आहे. वाशिम-यवतमाळचे नवनिर्वाचित खासदार संजय देशमुख यांनी या विषयावर आक्रमक पवित्रा घेऊन रेल्वे मंत्रालयाचे दरवाजे ठोठावण्याची गरज आहे. केवळ पत्रव्यवहार न करता प्रत्यक्ष कृतीतून ही गाडी रुळावर आणावी, अशी भावना जनसामान्यांत आहे. दुसरीकडे, या रेल्वेचा मार्ग अकोला आणि हिंगोली या महत्त्वाच्या जिल्ह्यांतून जातो. त्यामुळे अकोल्याचे खासदार अनुप धोत्रे आणि हिंगोलीच्या खासदारांनीही या मागणीसाठी संयुक्तपणे रेल्वे प्रेशर ग्रुप तयार करण्याची आवश्यकता आहे.

## महत्त्वाचे

### जिल्हाधिकारी कार्यालयात संत गाडगेबाबा यांना अभिवादन



**वाशिम :** अज्ञान,अंधश्रद्धा आणि स्वच्छता याबाबत जनजागृती निर्माण करणारे राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त दि. २३ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील वाकाटक सभागृहात आयोजित कार्यक्रमात अभिवादन करण्यात आले. यामप्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी जयेश खंडारे,सहायक अधीक्षक सुनील घोडे यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.उपस्थितांनी सुध्दा संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण केले.

### नऊ वर्षीय मदीया शेखचा पहिला रोजा; कौतुकाचा वर्षाव



**मानोरा :** पवित्र रमजान महिन्याला सुरुवात झाली असून, मुस्लिम धर्मीयांमध्ये या महिन्यातील उपवासाला (रोजा) विशेष महत्व आहे. कडक उन्हाच्या झळा आणि शिस्तीचे पालन करत मोठ्या व्यक्ती रोजा पाळतात; मात्र मानोरा तालुक्यातील शिवाजीनगर धामणी येथील अवघ्या नऊ वर्षांच्या मदीया बबलू शेख हिने २२ फेब्रुवारी रोजी आपला आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. मदीया ही इयत्ता तिसरीत शिकत असून, घरच्या मोठ्या व्यक्तींना रोजा ठेवताना पाहून तिनेही उपवास करण्याचा संकल्प केला होता. नऊ वर्षांचे कोवळे वय आणि दिवसाचा मोठा कालावधी लक्षात घेता, घरच्यांना तिच्या आरोग्याची काळजी होती. मात्र, मदीयाने आपल्या निर्धारावर ठाम राहत पहाटेच्या सहरीपासून ते सायंकाळच्या इफ्तारपर्यंत अन्नाचा कणही न घेता आणि पाण्याचा थेंबही न पिता हा कडक उपवास यशस्वीपणे पूर्ण केला. ग्रामीण भागात लहान मुलांमध्येही धार्मिक संस्कार आणि शिस्त रुजत असल्याचे हे एक बोलके उदाहरण ठरले आहे.

## जय मुंगसाजीच्या जयघोषाने उंबर्डा बाजार दुमदुमले

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**उंबर्डा बाजार, दि. २४ :** संत मुंगसाजी महाराजांच्या पुण्यतिथी महोत्सवात सहभागी होण्यासाठी जाणाऱ्या सहा विविध गावातून येणाऱ्या पालखी दिंडीचे २२ फेब्रुवारी रोजी उंबर्डा बाजार येथे आगमन झाले. या प्रसंगी जय मुंगसाजी श्री मुंगसाजी चा जयघोष झाला. या जयघोषाने संपूर्ण गाव दुमदुमले होते.

२४ फेब्रुवारी रोजी मुंगसाजी माऊलींचा पुण्यतिथी महोत्सव असल्याने या सोहळ्यामध्ये सहभागी होण्यासाठी पुंडलीक महाराज संस्थान पुंडलीकनगर मुर्तीजापूर, लहरीबाबा संस्थान मधापुरी, मुंगसाजी महाराज संस्थान लोहोगाव (वाढोणा), मुंगसाजी महाराज संस्थान तिघोरा, मुंगसाजी महाराज संस्थान मेहा, मुंगसाजी महाराज संस्थान अंबाडा, येथील मुंगसाजी माऊलीची पालखी २२ फेब्रुवारी रोजी येथे मुक्कामी दाखल झाल्या होत्या. गावात पालखी सोहळा दाखल होताच गावातील प्रमुख मार्गावर पालखीचे शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी पुंडलीक महाराज संस्थानच्या पालखीमधील वारकरी मंडळींची भोजनाची तथा निवासाची व्यवस्था किशोर मिरासे, लहरी महाराज संस्थान मधापुरी येथील वारकरी मंडळींची व्यवस्था नंदुबाप्पु देशमुख, मुंगसाजी महाराज संस्थान लोहोगाव येथील वारकरी मंडळींची व्यवस्था डॉ.न.म. चौधरी, मुंगसाजी महाराज संस्थान मेहा येथील वारकरी मंडळीची व्यवस्था साहेबराव सोमनाथे, मुंगसाजी महाराज संस्थान तिघोरा येथील वारकरी मंडळीची व्यवस्था राहुल राजेंद्र पचगाडे (अमरावती) व मुंगसाजी महाराज संस्थान अंबाडा ता. मोर्शी येथील वारकरी मंडळीची भोजनाची तथा निवासाची व्यवस्था मुन्नाभाऊ ठाकूर यांनी केली होती.

तसेच दरवर्षी प्रमाणे श्री सोपीनाथ महाराज व महादेव संस्थान येवता(बंदी) ता. कारंजा या पालखीमधील वारकरी मंडळींची नास्ता व लस्सी ची व्यवस्था गजानन भाऊ गाढवे व राजू भाऊ गाढवे या भावंडानी केली होती. तर नारायण भाऊ लोहाणा यांनी फराळाची व्यवस्था केली होती. या पालखी पदयात्रेत हजारो भाविकांनी सहभाग घेतला होता. येवता येथील गावकरी मंडळी टाळ, मृदुंग, भजनाच्या गजरात मग्न झाले होते. दि. २३ फेब्रुवारी रोजी सकाळपासून श्री क्षेत्र राफेरी येथे सर्व पालखी मंडळातील वारकरी मंडळींची भोजनाची व्यवस्था उंबर्डा बाजार येथील रवी महाराज श्रीराव यांच्या वतीने करण्यात आले होते.

## अमरावती विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात मधुराणीची कविता

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २४ :** येथील रहिवासी आणि प्रसिद्ध कवयित्री मधुराणी बनसोड-वाशिमकर यांच्या साहित्याची दखल आता शैक्षणिक स्तरावर घेतली गेली आहे. त्यांच्या गह्यना या वऱ्हाडी काव्यसंग्रहातील 'माहा बाप' ही कविता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या बी.ए. भाग-२ (सत्र ४) च्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आली आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार वऱ्हाडी कविता या संपादित पाठ्यपुस्तकात या कवितेचा समावेश करून विद्यापीठाने त्यांच्या साहित्यसेवेचा गौरव केला आहे.

मधुराणी बनसोड गेल्या २०-२२ वर्षांपासून मराठी साहित्यात सक्रिय आहेत. वऱ्हाडी बोलीसोबतच त्यांनी प्रमाण भाषेतही विपुल लेखन केले आहे. २०२३ मध्ये त्यांचा सन्मार्ग (अभंग संग्रह) आणि आम्ही वंशज सूर्याचे हे काव्यसंग्रह प्रकाशित झाले. त्यानंतर २०२४ मध्ये गह्यना आणि मी घार झाले हे संग्रह वाचकांच्या भेटीला आले. अलीकडेच २५ डिसेंबर २०२५ रोजी त्यांचा पाळणा प्रबोधनाचा हा वैशिष्ट्यपूर्ण संग्रहही प्रकाशित झाला आहे. आगामी काळात त्यांचे वनदेवाची टेकडी (ग्रामीण कथासंग्रह), बोले लावणी घुंगराला (लावणी संग्रह), अधीर मन झाले (प्रेम कविता संग्रह) आणि स्पंदन मधुराणीचे (गझलसदृश संग्रह) हे ग्रंथ प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. केवळ लेखनच नव्हे, तर डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या मार्गदर्शनाखाली अंधश्रद्धा निर्मूलन, स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी आतला आवाज या लघु नाट्याचे प्रयोग आणि शासन स्तरावरील आपत्ती व्यवस्थापन व स्वच्छता अभियानातही त्यांनी मोठे योगदान दिले आहे.

साहित्य आणि सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार, त्यागमुर्ती रमाई आंबेडकर पुरस्कार, महाकवी अश्वघोष आणि अंकुर वाङ्मय पुरस्कारांसह अनेक राज्यस्तरीय सन्मानांनी गौरवण्यात आले आहे.

❑ माझ्या कवितेची विद्यापीठाच्या अभ्यासक्रमासाठी झालेली निवड हा माझ्या साहित्य प्रवासातील सर्वोच्च सन्मान आहे. या निवडीमुळे माझ्या जीवनाचे सार्थक झाले.

- मधुराणी बनसोड

## शब्दांच्या अचूकतेतूनच प्रभावी शाहिरी शक्य- शाहीर गिरी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २४ :** ''शाहिरी ही केवळ गायनकला नसून समाजप्रबोधनाचे प्रभावी शस्त्र आहे. शाहिरीने इतिहासाचे आणि शब्दांचे भान राखणे गरजेचे असून, एका चुकीच्या शब्दामुळे ऐतिहासिक सत्याचा अपलाप होऊ शकतो,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ शाहीर रमेश गिरी यांनी केले. सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई तर्फे आयोजित प्रयोगसिद्ध लोककला प्रशिक्षण शिबिरात ते प्रमुख व्याख्याते म्हणून बोलत होते.




२३ फेब्रुवारी रोजी पार पडलेल्या या सत्रात गिरी यांनी रंगमंचावरील देहबोली, माईकचा वापर आणि सादरीकरणातील बारकाव्यांचे प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. ''ऐतिहासिक गौळणीत ताक विकल्याचा उल्लेख करणे वास्तववादी नाही, कारण त्याकाळी ताक विकले जात नसे; तिथे तूप हा शब्द सयुक्तिक ठरतो,'' असे उदाहरण देत त्यांनी शब्दरचनेतील गांभीर्य अधोरेखित केले. शिबिर संचालक शाहीर संतोष खडसे यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या शिबिरात प्रशिक्षणार्थ्यांनी प्रत्यक्ष सादरीकरण केले. गिरी यांनी विद्यार्थ्यांच्या त्रुटी दूर करत त्यांना आत्मविश्वासाने कला सादर करण्याची प्रेरणा दिली.

## 'निमा'च्या कायदेशीर लढाईसाठी संघटनात्मक बांधणी आवश्यक - ताटेवार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २४ :** नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (निमा) या संघटनेच्या माध्यमातून दिल्लीपर्यंत सुरू असलेली कायदेशीर लढाई आणि डॉक्टरांचे हक्क अबाधित राखण्यासाठी संघटनात्मक बळकटीकरण ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन संघटनेचे ज्येष्ठ नेते राजूभाऊ ताटेवार यांनी केले. वाशिम जिल्हा शाखेला सदिच्छा भेट दिली असता, आयोजित विशेष बैठकीत ते बोलत होते.

रविवारी (२२ फेब्रुवारी) वाशिम निमा शाखेच्या वतीने ताटेवार यांचे जंगी स्वागत करण्यात आले. याप्रसंगी आयोजित बैठकीत त्यांनी शाखेपासून ते दिल्लीपर्यंत संघटनेचे कार्य नेमके कसे चालते, यावर प्रकाश टाकला. विशेषतः आयुर्वेदिक डॉक्टरांच्या कायदेशीर बाजू भक्कम करण्यासाठी संघटना कोणती लढाई लढत आहे आणि भविष्यात कोणते कायदेशीर पेच सुटणे अपेक्षित आहे, याबद्दल त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. निमा ही केवळ स्थानिक संघटना नसून ती देशपातळीवर डॉक्टरांचे प्रतिनिधित्व करणारी शक्ती आहे, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.



संघटना अधिक प्रभावशाली होण्यासाठी लाईफ टाईम मेंबरशिप (आजीवन सदस्यता) आणि एमबीएस सदस्य संख्या वाढवणे आवश्यक असल्याचे ताटेवार यांनी सांगितले. सदस्यत्व वाढल्याने संघटनेचा आवाज शासन दरबारी अधिक प्रभावीपणे पोहोचू शकतो, असे सांगत त्यांनी या सदस्यत्वाचे विविध फायदे उपस्थित डॉक्टरांना पटवून दिले.

या बैठकीत वाशिम जिल्हा शाखेच्या वतीने स्थानिक डॉक्टरांच्या विविध मागण्या आणि समस्यांचे निवेदन ताटेवार यांना सादर करण्यात आले. जिल्हा स्तरावर प्रॅक्टिस करताना येणाऱ्या अडचणी आणि प्रशासकीय समस्या त्यांनी सविस्तर ऐकून घेतल्या व त्या सोडवण्यासाठी राज्य आणि केंद्र स्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

या बैठकीला अमरावती विभागीय सचिव डॉ. बाळासाहेब डाखोरे, निमा स्टेट बॉडी मेंबर डॉ. सागर आंबेकर, वाशिम शाखा अध्यक्ष डॉ. सतीश लांडकर, कोषाध्यक्ष डॉ. दीपक गट्टाणी, स्टुडंट फोरमचे विभागीय सचिव डॉ. सचिन चौधरी, माजी अध्यक्ष डॉ. राजेश चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच डॉ. नितीन बकाल, डॉ. सागर सदार, डॉ. प्रदीप देशमुख, डॉ. राम मडके यांच्यासह जिल्ह्यातील अनेक डॉक्टर्स व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सोळाव्या वर्षी सासरची स्वप्नं दाखवणाऱ्यांना कायद्याचा बडगा



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २४ :** जिल्ह्यामध्ये बालविवाहाच्या प्रथांना अटकाव करण्यासाठी प्रशासनाकडून राबविल्या जाणाऱ्या मोहिमेला मोठे यश आले आहे. मंगरूळपीर तालुक्यातील शिवणी गावात होऊ घातलेला एका १६ वर्षीय अल्पवयीन बालिकेचा विवाह जिल्हा महिला व बाल विकास विभाग आणि चाईल्ड लाईनच्या सतर्कतेमुळे वेळेत रोखण्यात आला. प्रशासनाने केवळ विवाहच रोखला नाही, तर पालकांचे समुपदेशन करून त्यांच्याकडून कायदेशीर हमीपत्रही लिहून घेतले आहे.

शिवणी गावात एका अल्पवयीन मुलीचा विवाह लावला जाणार असल्याची गोपनीय माहिती चाईल्ड लाईन १०९८ या टोल फ्री क्रमांकावर प्राप्त झाली होती. माहिती मिळताच जिल्हा प्रशासकीय यंत्रणा तातडीने सक्रिय झाली. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी उत्तम शिंदे, परिविक्षा अधिकारी गणेश ठाकरे आणि जिल्हा बाल संरक्षण अधिकारी भगवान ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली एका संयुक्त पथकाची स्थापना करण्यात आली. या पथकाने सर्वप्रथम संबंधित बालिकेच्या वयाची कागदोपत्री खातरजमा केली, ज्यामध्ये ती केवळ १६ वर्षांची असल्याचे स्पष्ट झाले.

### पालकांचे समुपदेशन आणि कायदेशीर इशारा

क्षेत्रीय कार्यकर्ता एकनाथ राठोड आणि नीती आयोगाच्या जिल्हा प्रकल्प सहाय्यक नीलिमा भोंगाडे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पथकाने मुलगी आणि तिच्या पालकांशी संवाद साधून त्यांचे समुपदेशन केले. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ नुसार बालविवाह हा गंभीर गुन्हा असून, यामध्ये सहभागी होणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई होऊ शकते, याची जाणीव पालकांना करून देण्यात आली. तसेच, कमी वयात विवाह केल्यामुळे मुलीच्या आरोग्यावर होणारे विपरीत परिणाम आणि तिच्या शिक्षणात येणारे अडथळे यावरही सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रशासनाच्या समुपदेशनानंतर पालकांना आपल्या चुकीची जाणीव झाली. जोपर्यंत मुलगी १८ वर्षांची होत नाही, तोपर्यंत तिचा विवाह लावणार नाही, असे लेखी हमीपत्र पालकांनी प्रशासनाकडे दिले. या समन्वित कारवाईमुळे एका बालिकेचे बालपण जपले गेले असून तिचे शैक्षणिक भविष्य सुरक्षित झाले आहे.

वऱ्हाडी जत्रा | चव वऱ्हाडी, कला न्यारी ; मिनी सरस प्रदर्शन

# बचत गटांच्या हस्तकलेला अस्सल चवीची जोड!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कारंजा, दि. २४ :** ग्रामीण भागातील महिला बचत गटांच्या कष्टाला बाजारपेठेची हक्काची जोड देण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या वतीने आयोजित 'वऱ्हाडी जत्रा' मिनी सरस प्रदर्शनाला कारंजात मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. २३ फेब्रुवारी रोजी धाबेकर सांस्कृतिक सभागृह येथे या पाच दिवसीय प्रदर्शनाचा शुभारंभ झाला असून, आता या प्रदर्शनाचे शेवटचे दोन दिवस शिल्लक आहेत.

प्रदर्शनाचे उद्घाटन कारंजाचे उपविभागीय अधिकारी तथा परिविक्षाधीन आय.ए.एस. अधिकारी आकाश वर्मा यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणावर भर दिला. ''ग्रामीण भागातील बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना योग्य व्यासपीठ मिळाल्यास त्यांच्या व्यवसायाला मोठी चालना मिळेल. आजच्या काळात महिलांनी डिजिटल मार्केटिंगचा प्रभावी वापर करणे आवश्यक आहे,'' असे प्रतिपादन त्यांनी केले. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक किरण गणेश कोवे यांनीही, नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन महिलांचे मनोबल वाढवण्याचे आवाहन केले.



२७ फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या प्रदर्शनात जिल्ह्यातील सुमारे १०० स्वयंसहायता समूहांची उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध आहेत. यामध्ये ८० वस्तू विक्रीचे स्टॉल आणि खवय्यांसाठी २० खानावळीचे स्टॉल उभारण्यात आले आहेत. विशेषतः घरगुती मसाले, हातमागावरील कापड, ग्रामीण हस्तकला आणि अस्सल वऱ्हाडी खाद्यपदार्थांची मेजवानी हे या जत्रेचे मुख्य आकर्षण ठरत आहे.

२३ तारखेला सुरू झालेल्या या 'वऱ्हाडी जत्रे'चा आज तिसरा दिवस असून, कारंजातील नागरिकांसाठी खरेदीची ही संधी आणखी दोन दिवस म्हणजेच २७ फेब्रुवारीपर्यंत उपलब्ध राहणार आहे. विधिमंडळाचे अधिवेशन सुरू असल्याने लोकप्रतिनिधींची अनुपस्थिती असली, तरी प्रशासकीय यंत्रणेने या प्रदर्शनाचे नेटके नियोजन केले आहे.

या सोहळ्याला गटविकास अधिकारी पूनम राणे, विस्तार अधिकारी सचिन गटलेवार, जिल्हा अभियान व्यवस्थापक सुधीर खुजे, प्रफुल्ल इटाळ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुधीर खुजे यांनी केले, सूत्रसंचालन जया खंडागळे यांनी तर आभार प्रदर्शन संदीप ढाले यांनी मानले. शेवटचे दोन दिवस शिल्लक असल्याने कारंजावासीयांनी या प्रदर्शनाला मोठ्या संख्येने भेट द्यावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

महत्त्वाचे

## विषमुक्त शेतीसाठी मूर्तिजापूरचा निर्धार; ७५ शेतकऱ्यांचे प्रशिक्षण



**मूर्तिजापूर :** रासायनिक शेतीच्या विळख्यातून मुक्त होऊन निसर्गपूरक शेतीकडे वळण्यासाठी मूर्तिजापूर तालुक्यातील ७५ शेतकऱ्यांनी खंबीर पाऊल उचलले आहे. पाणी फाउंडेशन आणि ग्रामपुत्र परिवार यांच्या पुढाकाराने बडनेरा (दुर्गापूर) येथील कृषी विज्ञान केंद्रात आयोजित तीन दिवसीय विशेष प्रशिक्षण शिबिर नुकतेच उत्साहात संपन्न झाले. २० ते २२ फेब्रुवारी दरम्यान झालेल्या या शिबिरात कृषी विभाग, उमेद, आत्मा आणि महाराष्ट्र शासनाच्या विविध यंत्रणांचे मोलाचे सहकार्य लाभले. रासायनिक खतांमुळे जमिनीचा ढासळणारा पोत, वाढते आरोग्य संकट आणि पर्यावरणाचा ऱ्हास यावर तज्ज्ञांनी प्रकाश टाकला. विषमुक्त अन्नासाठी जैविक खत निर्मिती, नैसर्गिक कीड नियंत्रण आणि मृदा संवर्धनाची पंचसूत्री शेतकऱ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकातून शिकवण्यात आली. शेतीचा खर्च कमी करून उत्पादन वाढवण्याचा मंत्र यावेळी देण्यात आला. मूर्तिजापूर तालुका भविष्यात विषमुक्त अन्न निर्मितीचे केंद्र बनेल, असा विश्वास ग्रामपुत्र परिवाराने व्यक्त केला आहे.

## उमरा परिसरात यंदा शिगोळ्यांचा तुटवडा; होळीवर सावट

**उमरा :** सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या अकोट तालुक्यातील उमरा परिसरात यंदा होळी सणाच्या पार्श्वभूमीवर शिगोळ्यांची (शेण्यांची) मोठी टंचाई जाणवू लागली आहे. गावामध्ये दिवसेंदिवस गुरेढोरे कमी होत असल्याने ही पारंपरिक अडचण निर्माण झाली असून, यंदाची होळी साजरी करताना ग्रामस्थांची ओढाताण होणार असल्याचे चित्र आहे. हिंदू परंपरेनुसार होलिका दहनात गाईच्या शेणापासून तयार केलेल्या शिगोळ्यांना विशेष धार्मिक महत्त्व आहे. लाकडांचा वापर टाळून पर्यावरणपूरक होळी साजरी करण्यासाठी शिगोळे उत्तम पर्याय मानले जातात. मात्र, सध्या गावात दुग्धव्यवसाय घटणे आणि पशुपालनात झालेली घट यामुळे शेण मिळवणे कठीण झाले आहे. पूर्वी प्रत्येक घरातून किमान एक तरी शिगोळा होळीसाठी दिला जात असे; मात्र आता बदलत्या परिस्थितीत ही परंपरा अडचणीत आली आहे. परंपरा आणि पर्यावरण यांचा समतोल राखण्यासाठी ज्या कुटुंबांकडे गुरे आहेत, त्यांनी शेण उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज व्यक्त होत आहे. सामूहिक पातळीवर प्रयत्न झाल्यास ही टंचाई दूर होऊ शकते, असे जाणकार सांगतात.

# निवृत्त पोलीस अधिकाऱ्याची शेतीत दबंग कामगिरी!

## दीड एकरात टरबूजातून कमावले साडेपाच लाख

। योगेश आगाशे ।

### आधुनिक तंत्रज्ञानामुळे १५० दिवसांत लाखोंची उलाढाल

**मूर्तिजापूर, दि. २४ : वर्दी उतरवून हाती नांगर धरल्यानंतरही जिद्द असेल तर काय साध्य होऊ शकते, याचे मूर्तिमंत उदाहरण कंझरा येथील निवृत्त पोलीस अधिकारी दिलीप महादेव नागोलकर यांनी घालून दिले आहे. पारंपरिक पिकांच्या साखळीतून बाहेर पडत त्यांनी अवघ्या दीड एकरात टरबूजाची लागवड केली आणि खर्च वजा जाता सुमारे साडेपाच लाख रुपयांचे निव्वळ उत्पन्न मिळवून आधुनिक शेतीचा नवा आदर्श निर्माण केला आहे.**



शासकीय सेवेतून निवृत्त झाल्यानंतर नागोलकर यांनी पूर्णवेळ शेतीकडे लक्ष केंद्रित केले. त्यांना त्यांचे पुत्र कृषी पदवीधर मंगेश नागोलकर यांची तांत्रिक साथ लाभली. मजुरांची टंचाई आणि पावसाचा लहरीपणा यावर मात करण्यासाठी त्यांनी फळपिकाची निवड केली. अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर येथील विघ्नहर्ता नर्सरीतून राशी या सुधारित वाणाची सुमारे १० हजार रोपे आणली. ठिबक सिंचन, कुजलेले शेणखत आणि वेळापत्रकानुसार फवारणी या त्रिसूत्रीमुळे पिकाला उत्तम बहर आला.

नागोलकर यांच्या बागेत पिकलेले टरबूज चवीला गोड आणि रंगाला गडद असल्याने व्यापाऱ्यांनी बांधावरच गर्दी केली. अकोला आणि अमरावती येथील व्यापाऱ्यांनी २३ ते २५ रुपये प्रति किलो दराने खरेदी केली. हे टरबूज थेट देशाची राजधानी दिल्लीच्या बाजारपेठेत रवाना झाले. पहिल्या तोड्यात १८ ते २० टन आणि दुसऱ्या टप्प्यात ५ टन असे एकूण २५ टन उत्पादन मिळाले. अवघ्या एक लाख रुपयांच्या खर्चात साडेपाच लाखांचा नफा मिळाल्याने नागोलकर कुटुंबाचा आनंद द्विगुणित झाला आहे.

❑ आजच्या धावपळीच्या काळात प्रत्येकाच्या आहारात फळांचे महत्त्व वाढले आहे. त्यामुळे भविष्यात फळबाग शेतीला नक्कीच सुवर्णकाळ येईल. पारंपरिक पिकांना फाटा देऊन शेतकऱ्यांनी कमीत कमी क्षेत्रात तरी फळपिकांचा प्रयोग करून पाहावा, जेणेकरून शेती फायद्याची ठरेल.

- **दिलीप नागोलकर,** निवृत्त पोलीस अधिकारी, मूर्तिजापूर

### १४ एकर बागायतीचा टर्नओव्हर

दिलीप नागोलकर यांच्याकडे एकूण १४ एकर बागायती क्षेत्र आहे. या मोठ्या क्षेत्रापैकी त्यांनी प्रयोगासाठी केवळ दीड एकराची निवड केली होती. कमी क्षेत्रातही आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास शाश्वत आणि मोठे उत्पन्न घेता येते, हे त्यांनी सिद्ध केले. त्यांच्या या यशाने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये फळबाग शेतीबाबत नवा आत्मविश्वास निर्माण झाला आहे.

## अल्पावधीतच वाडेगाव-तामसी-पिंपळगाव रस्त्याची दुरवस्था!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**बाळापूर, दि. २४ :** तालुक्यातील वाडेगाव-तामसी-पिंपळगाव या रस्त्याचे काम होऊन काहीच कालावधी लोटला असताना, रस्त्याची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली आहे. हे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप नागरिक करत असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.



प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत या ५ किलोमीटर रस्त्याचे काम करण्यात आले. दर्शनी फलकावरील माहितीनुसार, काम सुरू करण्याचा दिनांक २३ डिसेंबर २०२१ असा होता. मात्र, प्रत्यक्षात हे काम दीड ते दोन वर्षांनंतर सुरू झाल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली आहे. रस्त्याच्या कामाची एकूण किंमत ५२८.८७ लक्ष रुपये असून, पाच वर्षांच्या देखभाल-दुरुस्तीसाठी ५४.१९ लक्ष रुपयांची तरतूद आहे. असे असतानाही रस्ता अल्पावधीतच उखडल्याने संताप व्यक्त होत आहे.

रस्त्याच्या कामात दर्जेदार साहित्याचा वापर न केल्याने ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. शासनाकडून नागरिकांच्या सोयीसाठी लाखो रुपयांचा निधी दिला जात असताना, थातूरमातूर काम करून शासकीय निधी हडपण्याचा हा प्रकार असल्याचा आरोप होत आहे. यामुळे या कामाची तांत्रिक तपासणी करून दोषींवर कारवाई का होऊ नये? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. तामसी येथील सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य व ग्रामस्थांनी २३ फेब्रुवारी रोजी कार्यकारी अभियंत्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. रस्त्याची झालेली दुरवस्था पाहता खड्डे तात्काळ बुजवून दुरुस्ती करण्याची मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

❑ रस्त्याची लवकरात लवकर दुरुस्ती करून देण्यात यावी. रात्रीच्या वेळी एखाद्या रुग्णाला घेऊन जाताना रस्त्यावरील खड्ड्यांमुळे चालक आणि रुग्ण दोघांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

- **मिथुन काळे,** शेतकरी

❑ वाडेगाव-तामसी-पिंपळगाव रस्त्याचे काम अलिकडच्या काळातच झाले आहे. मात्र, इतक्या कमी वेळात खड्डे पडल्याने काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे स्पष्ट होत आहे. या कामाची उच्चस्तरीय चौकशी व्हायलाच हवी.

- **विजय पातोडे,** माजी सरपंच, तामसी

❑ शेतातील माल बाजारपेठेत नेताना किंवा शेतात ये-जा करताना शेतकरी व नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

- **गौतम जंजाळ,** शेतकरी, वाडेगाव

## तेल्हारा नगरपालिकेत 'जागरण गोंधळ' आंदोलन

### २२ प्रलंबित मागण्यांसाठी नागरिकांचा एल्गार; प्रशासनाच्या भूमिकेवर संताप

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**तेल्हारा, दि. २४ :** शहरातील प्रलंबित नागरी समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते आणि संतप्त नागरिकांनी मंगळवारी नगर परिषद कार्यालयात 'जागरण गोंधळ' आंदोलन छेडले. विशेष म्हणजे, आंदोलनकर्ते कार्यालयात पोहोचले असता मुख्याधिकारी आणि नगराध्यक्षांच्या दालनांना कुलूप दिसल्याने आंदोलकांनी संताप व्यक्त करत जोरदार घोषणाबाजी केली.



आंदोलनकर्त्यांच्या दाव्यानुसार, शहरांमधील विविध समस्यांबाबत तीन दिवसांपूर्वीच प्रशासनाला लेखी निवेदन देऊन आंदोलनाची पूर्वकल्पना देण्यात आली होती. मात्र, मंगळवारी आंदोलनाच्या वेळी मुख्याधिकारी सतीश गावंडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी दालनात उपस्थित नसल्याने नागरिकांनी संशय व्यक्त केला. प्रशासन चर्चेऐवजी पळ काढत आहे का? असा सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला. नागरी हिताशी संबंधित एकूण २२ मागण्यांचे निवेदन यावेळी प्रशासनाला सादर करण्यात आले. यामध्ये रस्ते, पाणीपुरवठा आणि स्वच्छता यांसारख्या मूलभूत सुविधांचा समावेश आहे. काही दिवसांपूर्वी गणेश आमले यांनी शिवभक्तांच्या वतीने दिलेल्या निवेदनातील मुद्द्यांचाही या आंदोलनात पुनरुच्चार करण्यात आला. नगर परिषदेचे नवनिर्वाचित सदस्य, विरोधी पक्षनेते आणि कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत आंदोलनकर्त्यांनी आपल्या मागण्या तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली. प्रशासनाने यावर ठोस भूमिका न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

## खा. अनुप धोत्रे यांच्या हस्ते जगन बगाडे यांचा यथोचित गौरव

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. २४ :** सघन कापूस लागवड तंत्रज्ञानाचा प्रभावी अवलंब करून कापूस उत्पादनात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अकोट तालुक्यातील खापरवाडी येथील प्रगतशील शेतकरी जगन प्रल्हाद बगाडे यांचा नुकताच गौरव करण्यात आला. अकोला येथील कृषी विज्ञान केंद्र येथे आयोजित विशेष सोहळ्यात खासदार अनुप धोत्रे यांच्या हस्ते त्यांचा शाल व श्रीफळ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.



राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत सघन पद्धतीने कापूस लागवड तंत्रज्ञान क्षेत्रात बगाडे यांनी केलेल्या प्रयोगाची दखल घेत हा सत्कार करण्यात आला. कमी जागेत आणि कमी कालावधीत अधिक उत्पादकता देणाऱ्या या तंत्रज्ञानामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मोठी मदत होत आहे.

यावेळी मार्गदर्शन करताना खासदार अनुप धोत्रे यांनी आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर करून कृषी क्षेत्रात बदल घडवणाऱ्या शेतकऱ्यांचे भरभरून कौतुक केले. पारंपारिक शेतीला फाटा देऊन अधिक नफा मिळवून देणाऱ्या अशा नाविन्यपूर्ण पद्धतींचा इतर शेतकऱ्यांनीही अवलंब करावा, असे आवाहन त्यांनी केले. कृषी विज्ञान केंद्र, अकोला यांनी या उपक्रमाचे यशस्वी नियोजन केले होते. या सोहळ्याला परिसरातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मूर्तिजापूर बाजार समितीत शुल्क थकबाकीचा गोंधळ; परवानाधारकाविरुद्ध पोलिसांत तक्रार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. २४ :** स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीमधील धान्य खरेदी व्यवहारापोटी शासनाचे बाजार शुल्क आणि देखरेख फी न भरल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी बाजार समितीचे सचिव रितेश मडगे यांनी एका अ वर्ग परवानाधारक खरेदीदाराविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली असून, कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे.

बाजार समितीने दिलेल्या तक्रारीनुसार, संबंधित खरेदीदाराने गेल्या तीन महिन्यांत अडत्यांमार्फत शेतकऱ्यांकडून सुमारे ४५२८.६६ क्विंटल सोयाबीन व इतर धान्याची खरेदी केली आहे. या संपूर्ण व्यवहाराची अंदाजे उलाढाल १ कोटी ७५ लाख रुपयांच्या घरात असल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे. नियमानुसार या व्यवहारावर ०.५ टक्के बाजार शुल्क आणि ०.५ टक्के देखरेख फी भरणे बंधनकारक असते. मात्र, संबंधितांनी सुमारे ९.९९ लाख रुपयांची ही थकबाकी अद्याप भरलेली नाही, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

थकबाकी भरण्याबाबत बाजार समिती प्रशासनाने संबंधित परवानाधारकाला वेळोवेळी लेखी व तोंडी सूचना दिल्या होत्या. एका बैठकीत ही रक्कम भरण्याचे आश्वासनही देण्यात आले होते; मात्र त्यानंतर संबंधितांनी संपर्क टाळल्याचे सचिव मडगे यांनी तक्रारीत नमूद केले आहे. दरम्यान, या गंभीर आरोपांबाबत संबंधित खरेदीदाराची बाजू अद्याप स्पष्ट होऊ शकलेली नाही.

शहरातील एका बड्या खरेदीदाराशी संबंधित हे प्रकरण असल्याने व्यापारी वर्तुळात मोठी चर्चा सुरू आहे. पोलिसांनी तक्रार प्राप्त झाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला असून, कागदपत्रांची पडताळणी सुरू केली आहे. तपास पूर्ण झाल्यानंतरच यातील सत्यता आणि नेमकी कायदेशीर दिशा स्पष्ट होणार आहे.

❑ या संदर्भात शहर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार प्राप्त झाली आहे. व्यवहाराची रक्कम मोठी असल्याने सर्व कागदपत्रे आणि बाजार समितीचे रेकॉर्ड तपासून पुढील कार्यवाही केली जात आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली निष्पक्ष तपास केला जाईल. तपास पूर्ण झाल्यानंतरच अधिकृत माहिती देता येईल.

- **अजित जाधव**, पोलीस निरीक्षक, शहर पोलीस ठाणे, मूर्तिजापूर

अनाथ आश्रमांकडे धाव | मुलींच्या अटींमुळे उपवर मुले विवाहाविना

# सरकारी नोकरी, फ्लॅट आणि एकुलता एक मुलगाच हवा!

। पद्माकर आखरे ।

**अकोला, दि. २४ :** ग्रामीण आणि निमशहरी भागातील विवाह संस्थेमध्ये सध्या एक मोठे संकट उभे राहिले आहे. मुलगा निर्व्यसनी आहे, कर्तबगार आहे किंवा प्रगतशील शेतकरी आहे, या गुणांपेक्षा त्याच्याकडे पैसा किती आणि सरकारी नोकरी आहे का? या निकषांवरच लग्नाच्या गाठी बांधल्या जात आहेत. मुलींच्या वाढत्या अटी आणि शर्तींमुळे ग्रामीण भागातील हजारो तरुण आजही लग्नाच्या प्रतीक्षेत असून, काहींनी आता आपला मोर्चा अनाथ आश्रमाकडे वळवल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे.



एकेकाळी मुलाचा स्वभाव आणि खानदान बघून लग्ने ठरत असत. मात्र, आता चित्र पूर्णपणे पालटले आहे. उपवर मुलींकडून आणि त्यांच्या पालकांकडून घालण्यात येणाऱ्या अटी ऐकून मुलाकडचे लोक चक्रावून जात आहेत. मुलाची कितीही शेती असली, तरी शहरात स्वतःचा फ्लॅट किंवा घर असणे सक्तीचे मानले जात आहे. खासगी क्षेत्रात चांगले वेतन असूनही सरकारी जावई शोधण्याकडे कल वाढला आहे. ''सासू-सासऱ्यांची कटकट नको'' म्हणत मुलगा एकटाच (एकुलता एक) असेल तरच पसंती दिली जात आहे. मुलीला शेतात काम करायचे नाही, तरीही मुलाच्या नावावर बॅकअप म्हणून शेती असावी, अशी विचित्र अट घातली जात आहे. यामुळे परिस्थिती इतकी बिकट झाली आहे की, ज्या शेतकरी मुलांची लग्ने जमत नव्हती, त्यांनी यापूर्वी मेळघाट किंवा इतर भागातील कोरकू जमातीच्या मुलींशी विवाह करण्यास संमती दर्शवली होती. आर्थिक देवाणघेवाण करून हे विवाह लावले जात होते. परंतु, आता कोरकू समाजातही शिक्षणाचे प्रमाण वाढल्याने आणि तिथल्या मुलींच्या जाणिवा विस्तारल्याने, त्यांनीही अशा प्रकारे लग्न करण्यास नकार दिला आहे. ''आम्ही आमच्या मुली शेतकरी मुलांना देणार नाही,'' असा पवित्रा या समाजाने घेतल्याने उपवर मुलांसमोरचा हा शेवटचा पर्यायही बंद झाला आहे.

अनाथ आश्रमात वधू शोधण्याचा प्रयत्न ज्या मुलांचे वय ३०-३५ च्या पुढे गेले आहे आणि ज्यांच्याकडे ना सरकारी नोकरी आहे ना शहरात घर, अशा हताश तरुणांनी आता अनाथ आश्रमांची पायरी चढण्यास सुरुवात केली आहे. ''आम्हाला कोणत्याही जातीपातीची मुलगी चालेल, ती अनाथ असली तरी चालेल,'' केवळ कौटुंबिक आधार मिळावा आणि आयुष्याचा जोडीदार मिळावा, या आशेने हे तरुण आता या शेवटच्या पर्यायाची चाचपणी करत आहेत.

### सामाजिक समतोल धोक्यात?

या बदलत्या मानसिकतेमुळे समाजात लग्नाळू मुलांची संख्या वाढत असून, यामुळे मानसिक नैराश्याचे प्रमाणही वाढले आहे. शेती करणाऱ्या मुलाला मुलगी नाकारली जात असल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी वर्ग हतबल झाला आहे. जर हीच परिस्थिती राहिली, तर भविष्यात विवाहाची मोठी समस्या निर्माण होऊन सामाजिक समतोल बिघडण्याची भीती समाजशास्त्रज्ञांनी व्यक्त केली आहे.

## मंगरूळपीर तालुक्यात बालविवाह रोखला; प्रशासनाची तात्काळ कारवाई

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरूळपीर, दि. २४ :** मंगरूळपीर तालुका येथील ग्राम शिवणी येथे होऊ घातलेला सोळा वर्षीय बालिकेचा बालविवाह प्रशासनाच्या तात्काळ व समन्वयित कारवाईमुळे वेळेत रोखण्यात आला. सदर प्रकरणाबाबत चाईल्ड लाईन १०९८ या टोल-फ्री क्रमांकावर गोपनीय माहिती प्राप्त झाली होती. माहिती मिळताच संबंधित बालिकेच्या वयाची तातडीने खातरजमा करण्यात आली.

यानंतर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी उत्तम शिंदे, परिविक्षा अधिकारी गणेश ठाकरे व जिल्हा बाल संरक्षण अधिकारी भगवान ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली संयुक्त पथकाची स्थापना करण्यात आली. क्षेत्रीय कार्यकर्ता एकनाथ राठोड व जिल्हा प्रकल्प सहाय्यक (, नीती आयोग) नीलिमा भोंगाडे यांनी घटनास्थळी भेट देऊन बालिका व तिच्या पालकांचे समुपदेशन केले. समुपदेशनादरम्यान बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ अंतर्गत होणाऱ्या कायदेशीर कारवाईची माहिती, अल्पवयीन विवाहामुळे होणारे आरोग्यविषयक धोके तसेच मुलीच्या शिक्षण व भवितव्यावर होणारे दुष्परिणाम याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

महिला व बाल विकास विभाग व चाईल्ड लाईन १०९८ यांच्या सतर्कतेमुळे एका बालिकेचे बालपण व भविष्य सुरक्षित झाले आहे. जिल्ह्यात बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ ची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी बालविवाह होत असल्यास तात्काळ चाईल्ड हेल्पलाईन १०९८ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी उत्तम शिंदे यांनी केले आहे.

## महत्वाचे

### आरोपींवर कठोर कारवाई करावी- हिंदूराष्ट्र सेना

**चिखली :** सकल हिंदू समाजाच्या वतीने हिंदू राष्ट्रसेना यांनी काल २३ फेब्रुवारी २६ रोजी उपविभागीय अधिकारी (महसुल) यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये अशा आशयाचे नमुद केले आहे की, लोणार तालुक्यातील चिखला येथे काही लोकांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाला विरोध करून स्मारकाचे समर्थन करणाऱ्या माता भगीनींना अमानुष मारहाण केली. यामुळे सकल हिंदू समाजाच्या भावना दुखावल्या आहेत. याप्रकरणी सखोल चौकशी करून आरोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी. अन्यथा २५ फेब्रुवारी पासुन सकल हिंदू समाजाच्या वतीने व्यवसाय प्रतिष्ठाणे बंद करून निषेध व्यक्त करण्यात येणार आहे. निवेदनावर सोनु चव्हाण, रवि माळवंदे, शंकर खराडे, जीवन जाधव यांचे नावे आहेत.

### संकटांतूनच आध्यात्मिक उन्नती- सुधांशू महाराज

**खामगाव :** जीवनातील अडचणी या माणसाला खच्ची करण्यासाठी नसून घडवण्यासाठी येतात. संक्टरांकडे पराभव म्हणून नव्हे, तर साधना आणि आत्म परीक्षणाची संधी म्हणून पाहिले, तर तीच उप्रतीची पायरी ठरतात, असे विचार प.पू. सुधांशूजी महाराज यांनी व्यक्त केले. विश्वजागृती मिशन यांच्या वतीने आयोजित मक्ती सत्संगात ते बोलत होते. स्थानिक भारत एम डॉ. बाधासाहेब आंबेडकर मैदान येथे झालेल्या या कार्यक्रमात भाविकांना आध्यात्मिक जीवनाचे महत्व पटवून देताना महाराजांनी दया, करुणा आणि सकारात्मक दृष्टिकोन यांचा स्वीकार करण्याचे आवाहन केले. सुख-दुःखाच्या लाटांमध्ये स्थिर राहणारा आणि अंतःकरणात सहृदयता जपणारा भक्तत्व खऱ्या अयनि ईश्वरप्राभीच्या मार्गावर पुढे जातो, असे ते म्हणाले. अहंकाराचा त्याग आणि देवाप्रती कृतज्ञता हीच खरी भक्ती असल्याचे सांगताना त्यांनी नमूद केले की, मन शुद्ध असेल तर प्रत्येक संकट हे कृपेचे रूप धारण करते. अध्यात्म म्हणजे केवळ पूजा-अर्चा नसून आचरणातील सगुणांची जोपासना होय, असे त्यांनी स्पष्ट केले. समाजात प्रेम, सेवा आणि समर्पणाची भावना रुजवणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. या सत्संगात आचार्य शिवदत्त यांच्यासह अनेक मान्यवर आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नामस्मरण, भक्तिगीत आणि प्रेरणादायी प्रवचनामुळे परिसर भक्तिमय झाला होता. कार्यक्रमातून नैतिकता आणि संस्कारांची जपणूक करण्याचा संदेश देण्यात आला. उपस्थितांनी या सत्संगातून नवचैतन्य आणि सकारात्मक ऊर्जा मिळाल्याची भावना व्यक्त केली.

### दिव्यांग केशव उटाळे यांच्या उपोषणाची सांगता

**खामगाव :** शहरातील जलालपुरा भागात राहणारे दिव्यांग नागरिक केशव महादेव उटाळे यांनी त्यांच्या घरासमोरील रस्त्यावर ठेवण्यात आलेल्या पाण्याच्या टाक्या व अतिक्रमण हटविण्याच्या मागणीसाठी आज मंगळवारी बेमुदत अन्नत्याग उपोषण सुरु केले होते. मात्र उटाळे यांना नगरपालिकेने समस्या निकाली काढल्याचे पत्र देत उपोषण मागे घेण्यास सुचविले, त्यानंतर नगराध्यक्षा अपर्णाताई सागर फुंडकर आणि नगरपालिका पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत उटाळे यांच्या उपोषणाची काही तासातच सांगता झाली.

**कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव**

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १५०० - २०५० |
| गहू | २००० - २५०० |
| तुर | ६००० - ७९५० |
| हरभरा | ४६०० - ५४०० |
| सोयाबीन | ४७०० - ७१०० |
| उडीद | ४६५० - ७४०० |
| मुग | ७५०० - ५५०० |
| तिळ | ७६०० - ७६०० |

# राष्ट्रपती आज शेगाव येथे राष्ट्रीय आरोग्य मेळाव्याचे करणार उद्घाटन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.२४ :** भारत सरकारचे आयुष मंत्रालय, अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २५ ते २८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथे चार दिवसांचा ''राष्ट्रीय आरोग्य मेळावा २०२६'' आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याचे उद्घाटन देशाच्या महामहीम राष्ट्रपती द्रोपदी यांच्या हस्ते होत आहे.

औषधी वनस्पती लागवड आणि कृषी वनीकरणाद्वारे आयुष औषध प्रणालींबाबत सर्वसामान्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे, सर्वसमावेशक आरोग्य सेवा प्रदान करणे आणि शेतकऱ्यांसाठी उपजीविकेच्या नवीन संधी निर्माण करणे हे या मेळाव्याचे उद्दिष्ट आहे. उद्घाटन समारंभ संत गजानन महाराज संस्थानच्या विसावा मैदानावर होणार आहे. उद्घाटन समारंभ महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा



पवार व केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव आणि इतर अनेक मान्यवर पाहुण्यांच्या उपस्थितीत होणार आहे. या संपूर्ण मेळाव्यात नागरिकांना आयुर्वेद, योग आणि निसर्गोपचार, युनानी, सिद्ध, सोवा रिग्पा, होमिओपॅथी आणि इतर पारंपारीक आरोग्यसेवा शाखांसह विविध आयुष प्रणालीं मार्फत मोफत आरोग्य तपासणी, वैद्यकीय सल्ला आणि औषधे घेण्याची संधी मिळेल. आयुष क्षेत्रातील उत्कृष्ट उत्पादन पद्धती, गुणवत्ता मानके आणि अलीकडील संशोधन प्रदर्शित करण्यासाठी अनेक प्रतिष्ठित आयुष औषधनिर्माण आणि वेलनेस कंपन्या या मेळाव्यात सहभागी होणार आहेत. त्याचबरोबर दैनंदिन आरोग्य गरजांसाठी औषधी वनस्पती आणि साध्या घरगुती उपचारांचे समर्पित प्रदर्शन देखील या मेळाव्यात भरवले जाणार आहे. बुलढाणा जिल्हा आणि आसपासच्या भागातील शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचा शाश्वत आणि लाभदायी स्रोत म्हणून कृषी वनीकरण आणि औषधी वनस्पतींची लागवड स्वीकारण्यास प्रोत्साहन देणारा एक विशेष उपक्रम यावेळी आयोजित करण्यात आला असून, तो या राष्ट्रीय आरोग्य मेळावा -२०२६ चे एक प्रमुख आकर्षण आहे. दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता शेगाव येथील विसावा परिसरात ''आयुर्वेदिक शेती, उत्पादन आणि विपणन'' या विषयावर विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

**उपस्थित राहण्याचे खा.जाधव यांचे आवाहन**

या महामेळाव्यात, शेतकऱ्यांना वनोत्पादनांवर आधारित आणि औषधी पिकांची लागवड, प्रक्रिया, मूल्यवर्धन आणि विपणन यावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळेल जेणेकरून पारंपारिक शेती करणाऱ्यांना आयुर्वेदिक शेतीसह ते करता येईल आणि त्यांच्या उत्पन्नात भर पडेल.केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी शेतकऱ्यांना आयुर्वेदिक शेती आणि उत्पादन कार्यक्रमात सक्रियपणे सहभागी होण्याचे आणि पारंपारिक पिकांसोबत औषधी वनस्पती लागवडीची क्षमता शोधण्याचे आवाहन केले आहे. शेतकऱ्यांनी त्यांच्या जमिनीचा काही भाग औषधी वनस्पतींसाठी राखून ठेवल्याने शेतकऱ्यांना शाश्वत आणि लाभदायी उत्पन्न मिळेल, तर नागरिकांना उच्च दर्जाचे नैसर्गिक उपचार पर्याय उपलब्ध होतील आणि आयुष मूल्य साखळी अधिक मजबूत होईल असे मत त्यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र आणि शेजारील राज्यांमधील नागरिक, शेतकरी, बचत गट, विद्यार्थी, आरोग्य स्वयंसेवक आणि आयुष भागधारक यांनी शेगावला भेट देऊन राष्ट्रीय आरोग्य मेळावा २०२६ चा जास्तीत जास्त लाभ घ्यावा आणि या राष्ट्रीय कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात येत आहे.

# संग्रामपूर तालुका पत्रकार संघ विभागीय आदर्श पुरस्काराने सन्मानित; विदर्भात मिळविला मान

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**संग्रामपूर दि.२४ :** अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेतर्फे दिला जाणारा प्रतिष्ठेचा आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार संग्रामपूर तालुका पत्रकार संघाला २२ फेब्रुवारी रोजी कर्जत (जि. रायगड) येथे आयोजित झालेल्या भव्य सोहळ्यात प्रदान करण्यात आला. यंदा ३५५ तालुक्यांमधून निवड झालेल्या पाच आदर्श संघांमध्ये संग्रामपूर तालुक्याने स्थान मिळवून आपल्या पत्रकारितेचा दर्जा आणि समाजाभिमुख कार्याची दखल घेतली आहे. संग्रामपूर तालुक्याचा विशेष उल्लेख त्याच्या समाजाभिमुख पत्रकारितेसाठी केला जातो, जिथे राजकारणात टिकाटिपणीपेक्षा विकासाच्या मद्यांवर लक्ष केंद्रित केले जाते. यामध्ये जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंह राजपूत राणा यांच्या सहकार्याचा महत्वपूर्ण वाटा आहे.

महाराष्ट्र राज्यातील ३५५ तालुक्यांमधून निवड होत पहिल्या पाच मध्येस्थान मिळवत जिल्ह्याचे शेवटचे टोकावरील सातपुडा पर्वत रांगेच्या पायथ्याशी असलेल्या ग्रामीण अविकसित संग्रामपूर तालुक्याने शासन व जनतेच्या हिताचे दृष्टीने विविध उपक्रम राबवून आदर्श पुरस्काराचा मान पटकावला. ह्या यशामुळे संग्रामपूर तालुक्यासह बुलढाणा जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. समाजाभिमुख व विकासाभिमुख पत्राकारितेमुळे संग्रामपूर तालुक्याचा विशेष उल्लेख केला जातो. राजकारणाला केवळ टिके पुरते मर्यादीत न ठेवता विकासासाठी प्रेरक लिखाण करणारी पत्रकारिता हे येथील वैशिष्ट्य असल्याची दखल या पुरस्कारातून घेण्यात आली.अ.भा. मराठी पत्रकार परिषद ही ८२ वर्षापासून पत्रकारांच्या हितासाठी कार्यरत असलेली मातृसंस्था आहे. परिषदेच्या वतीने दरवर्षी उल्लेखनीय कार्यासाठी विविध आदर्श पुरस्कार दिले जातात. यंदाचा वसंतराव काणे 'आदर्श तालुका पत्रकार संघ' पुरस्कार संग्रामपूर तालुका पत्रकार संघास मिळाल्याने अमरावती महसूल विभागून एकमेव बुलढाणा जिल्ह्याचा गौरव झाला. कर्जत (रायगड)येथील सोहळ्यात मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, मावळचे खासदार शिरंग बारणे, माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार महेंद्र थोरवे, वृत्तवाहिनी प्रतिनिधी मंदार फणसे, राजकीय विश्लेषक हेमंत देसाई, प्रदेश प्रतिनिधी चंद्रकांत बर्दे, जिल्हाध्यक्ष रणजीत राजपूत, रायगड प्रेस क्लब अध्यक्ष अभय आपटे, राहुल देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

# लुडो खेळावरून दोन गटांत हाणामारी; परस्पर तक्रारीवर गुन्हे दाखल

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मलकापूर दि.२४ :** मोबाइलवर लुडो खेळताना मध्ये बोलल्याच्या क्षुल्लक कारणावरून दोन गटांत शाब्दिक वाद होऊन त्याचे रूपांतर हाणामारीत झाल्याची घटना दाताळा येथील इंदिरानगर परिसरात घडली. या प्रकरणी मलकापूर ग्रामीण पोलिसांनी दोन्ही बाजूंच्या तक्रारींवरून अदखलपात्र गुन्हे दाखल केले आहेत. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री साडेआठच्या सुमारास गजानन लक्ष्मण सावळे (४२) हे मित्रांसह लुडो खेळत असताना समीर शहा जाबीर शहा याने खेळात हस्तक्षेप केल्याने वाद निर्माण झाला. ''मध्ये का बोलतोस?'' असे विचारल्यावर समीर शहा व आसीफ शहा मंसूर शहा यांनी सावळे यांना मारहाण करून जीविताची धमकी दिल्याची तक्रार सावळे यांनी केली आहे. त्यानुसार भारतीय न्याय संहितेच्या कलम ११५ (२), ३५१ (२)(३) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. दरम्यान, समीर शहा (२२) यांनी दिलेल्या प्रति-तक्रारीत सावळे यांनीच प्रथम चापट मारून शिवीगाळ केल्याचा आरोप केला आहे. त्यानुसार सावळे, ईश्वर सुरळकर व निखिल खराटे यांच्याविरुद्ध कलम ११५ (२), ३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस अंमलदार बाळू टाकरखेडे करीत आहेत.

# राज्यातील २८ हजार ग्राम रोजगार सहाय्यक मानधनाच्या प्रतिक्षेत

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**देऊळगाव माळी दि. २४ :** महाराष्ट्र राज्यामध्ये महात्मा गांधी रोजगार हमी योजना लागू करण्यात आली असून या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील २८ हजार ग्रामपंचायत मध्ये ग्राम रोजगार सहाय्यक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ग्राम रोजगार सहाय्यक हे ग्रामपंचायत स्तरावर ग्रामसेवकांना मदत करणे व रोजगार हमीची घरकुल सिंचन विहिरी, फळबाग लागवड व इतर रोजगार हमी योजनेतील कामासाठी प्रत्याक्ष लाभार्थ्यासोबत संपर्क करून काम पूर्ण करण्यासाठी नियमित काम करीत आहेत.

रोजगार हमी योजनेवर काम करणाऱ्या ग्राम रोजगार सहायकानां २.५०,४ व ६ टक्के प्रमाणे कमिशन तत्वावर मानधन देण्यात येत होते. गेल्या अनेक दिवसांपासून रोजगार सहाय्यक संघटनेच्या माध्यमातून रोजगार सहाय्यकांना मासिक मानधन मिळावे यासाठी पाठपुरावा करण्यात येत होता. विधानसभा निवडणूक २०२४ च्या पूर्वी ग्राम रोजगार सहाय्यक संघटनेच्या वतीने खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून तत्कालीन मुख्यमंत्री व आताचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे ग्राम रोजगार सहाय्यकांना मासिक मानधन देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली होती . विधानसभा निवडणुकीच्या पूर्वी महाराष्ट्र शासनाने ३ ऑक्टोबर २०२४ रोजी ग्राम रोजगार सेवकांना ८ हजार रुपये मासिक मानधन व २ हजार रुपये प्रोत्साहन व प्रवास भत्ता देण्याचा शासन निर्णय काढला.निवडणुकीच्या काळात काढलेल्या शासन निर्णयामुळे रोजगार सेवकांना मासिक मानधन मिळेल अशी अपेक्षा होती. शासनाने मानधन दिले नाही त्यामुळे रोजगार सहाय्यकांची फसवणूक झाली आहे. शासनाचे लक्ष वेधण्यासाठी येणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशन काळात राज्यातील २८ हजार ग्राम रोजगार सहाय्यक मुंबई येथील आझाद मैदानावर बेमुदत आंदोलन करणार असल्याचे बुलढाणा जिल्ह्यातील ग्राम रोजगार सहाय्यक संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीमंत देशमुख, जिल्हा संघटक संजय मोरे,मेहकर तालुक्यातील तालुका अध्यक्ष परमानंद अवसरमोल, उपाध्यक्ष किशोर निकम, रोजगार सेवक विष्णू आखरे, प्रविण ठोकळ यांनी सांगितले.

# लोणार तालुक्यात पहिल्यांदाच आढळला दुर्मिळ काळतोंड्या साप

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**लोणार दि.२४ :** डोके पूर्णपणे काळे असल्यामुळे याचे नाव काळतोंड्या पडले. लोणार तालुक्यातील सरस्वती गावात तांबोळा रोड वरील गट न. ५६ मधील शेतकरी सतिश किसन सरकटे यांच्या शेतातील गोठ्यावर सापडला हा साप. पूर्णपणे बिनविषारी आणि निरुपद्रवी आणि लाजाळू स्वभावाचा, जास्तीत जास्त दीड फूट लांबीचा, लालसर तपकिरी रंग पाठीवर छोट्या कळ्या ठिपक्यांची रांग, डोके काळे व त्यावर सोनेरी रंगाची नक्षी, पोटाकडील भाग हिरवट पिवळसर रंगाचा लांब गोलाकार शरीर आणि लांब निमुळती शेपूट ही या सापाची शरीर रचना. लहान पाली, सापसुरळ्या आणि छोटे साप हे याचे खाद्य, हा साप दिनचर तसेच निशाचर पण आहे. जमिनीवर दगड व लाकडी ओंडक्याखाली आढळतो आणि विशेषतः पाल्या पाचोळ्यात राहणे हा साप पसंत करतो. वन्यजीव प्रेमी व सर्पमित्र असलेले विनय पुष्पा शरदराव कुलकर्णी आणि त्यांचे सहकारी सचिन कापूरे, कमलेश आगरकर, विजय नरवाडे आणि वन्यजीव छायाचित्रकार उमेश चिपडे यांनी या सापाच्या सविस्तर नोंदी व छायाचित्र घेतले.

# कोनड खुर्द येथे शिवजयंती उत्साहात साजरी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.२४ :** दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी बॅरिस्टर जोगेंद्रनाथ मंडल शैक्षणिक, सांस्कृतिक क्रीडा बहुउद्देशीय संस्था, कोनड खुर्द यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी सरपंच संजय वानखेडे, ग्रामसेवक डुकरे पाटील, माजी सरपंच तुळशीदास जावळे तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. तसेच ग्रामपंचायतचे सर्व आजी-माजी पदाधिकारी उपस्थित होते. याचप्रमाणे शिवप्रतिष्ठान मित्र मंडळ व भिमटायगर मित्र मंडळ यांचे सर्व सदस्यही कार्यक्रमास उपस्थित होते. याचबरोबर भास्कर जावळे, पंजाबराव जावळे, गणेश विक्रम जावळे, रामदास झाल्टे, विजय जावळे, रामू जावळे, सिद्धार्थ वानखेडे, गगजान वानखेडे, विजय वानखेडे, अरुण जाधव, फकिरा जाधव, सिद्धार्थ पैठणे, प्रताप वानखेडे तसेच बचत गटाच्या सर्व



महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धार्थ पैठणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रताप वानखेडे यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष दादाराव भिकाजी सुरडकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, महापुरुषांचे विचार मानवाला भौतिक व मानसिक समाधान देणारे व प्रेरणादायी असतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

# कवितेचे बीज रुजविण्याचे माध्यम म्हणजे काव्यांकुर-सुभाष किन्होळकर

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.२४ :** सध्याच्या काळात वाचन चळवळ लोप पावते की काय असे वाटत असतांना बालकांसाठी एखादी चळवळ चालवणं खूप कठीण आहे. कवितेचे बीज रुजवण्याचे माध्यम म्हणजे काव्यांकुर आहे असे प्रतिपादन बाल साहित्यिक सुभाष किन्होळकर यांनी केले. मृण्मयी मल्टीपर्पज सोसायटीच्या वतीने आयोजित काव्यांकुर कार्यक्रमादरम्यान ते बोलत होते.

काव्यांकुरच्या माध्यमातून बालकांना मोठे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची जबाबदारी मृण्मयी मल्टीपर्पज सोसायटीने घेतली. ही कौतुकास्पद बाब आहे. कविता सादर करणे म्हणजे खूप




सोपी गोष्ट आहे असे नाही. ओठांची हालचाल करत असतांना शब्दांचे उच्चारण चांगले होते, त्या माध्यमातून आंतरिक भावना व विचारांचे प्रगटीकरण होते. हे लहान मुलांच्या लकबीतून सहजपणे बाहेर येते. पालकांनीही आपल्या मुलांमधील वेगळेपण जपण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. काव्यांकुरच्या माध्यमातून लहान मुलांनी विविध प्रकारच्या कविता सादर करत असतांना शेतीमातीची, देशभक्तीची, मातृभाषेची गोडी सांगणारी, बहिणाबाईंची अशा विविध प्रकारच्या कविता सादर करून वैचारिक प्रगल्भता दाखवली. मुलांनी सादर केलेल्या कवितांमध्ये त्यांच्या पालकांचेही मोठे योगदानही वाखाण्यासारखे आहे. पालकांनी काव्यांकुरकडे स्पर्धेच्या माध्यमातून न बघता ही आपल्या पाल्यासाठी व्यासपीठावर काहीतरी सादर करण्यासाठी असलेली खूप मोठी संधी आहे. या दृष्टीने बघावे. त्यातूनच आपल्या मुलांमधील जिज्ञासू वृत्ती जागृत होईल. त्यातून त्यांच्यामध्ये चांगल्या प्रकारची ऊर्जा निर्माण होईल असे मत बाल साहित्यीक सुभाष किन्होळकर यांनी मृण्मयी मल्टीपर्पज सोसायटीच्यावतीने काव्यांकुर स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले. याप्रसंगी व्यासपीठावर डॉ.गजेंद्र निकम व डॉ. वैशाली निकम यांची उपस्थिती होती. ज्ञानपीठ पुरस्कार विजेते वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या २७ फेब्रुवारी जयंती पर्वावर मराठी राजभाषा गौरव साजरा करण्यात येतो या निमित्ताने मृण्मयी मल्टीपर्पज सोसायटीच्या वतीने वय ५ ते १५ या वयोगटातील बालकांसाठी काव्यांकुर या कविता सादरीकरण स्पर्धेचे आयोजन दिनांक २२ फेब्रुवारी रोजी करण्यात आले होते.

**आध्यात्मिक** | **गुरु शिष्य भक्ती सोहळ्यातील कीर्तन सेवेचे पहिले पुष्प**

# प्रपंच आणि परमार्थात तात्यासाहेबांचे सेवेलाच प्राधान्य - श्रावण महाराज

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**चिखली दि.२४ :** गुरु आणि शिष्याचे नाते कसे असावे, याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे गुरु मुंगसाजी महाराज आणि त्यांचे शिष्य कर्मयोगी तात्यासाहेब यांचा जीवनप्रवास होय. ''गुरु हा संत कुळीचा राजा, गुरु हा प्राणविसावा माझा...'' या वचनाप्रमाणे गुरु मुंगसाजी महाराज यांच्यावर कर्मयोगी सिद्धिविनायक बोंद्रे यांची अफाट श्रद्धा होती. कर्मयोगी तात्यासाहेबांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात प्रपंच आणि परमार्थ या दोन्ही क्षेत्रात सेवेलाच सर्वोच्च प्राधान्य दिले, असे प्रतिपादन ह.भ.प. श्रावण महाराज जगताप नाशिक यांनी केले.

सोमवार, दि.२२ फेब्रुवारी रोजी श्री मुंगसाजी महाराज मंदिर, अनुराधा नगर चिखली येथे गुरुशिष्य भक्ती सोहळ्याचा भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. या सोहळ्यात कीर्तन सेवेतील पहिले पुष्प ह.भ.प. श्रावण महाराज जगताप यांनी गुंफले.''ज्याचे गर्जता पवाडे, कळिकाळ पाया पडे... तो हा पंढरीचा राणा...'' या अभंगाचे प्रभावी निरूपण करताना त्यांनी सांगितले की,




संतांच्या नामस्मरणात एवढी ताकद आहे की, कळिकाळालाही त्याच्या चरणी नतमस्तक व्हावे लागते. ज्याच्या नामस्मरणाने भक्ती आणि मुक्ती या दोन्ही साध्य होतात, त्या विठ्ठल नामाच्या आधारानेच जीवनातील संकटांवर मात करता येते. तात्यासाहेबांनी गुरुसेवेला जीवनाचे ध्येय मानून समाजकार्य, अध्यात्म आणि लोकसेवा यांचा सुंदर संगम साधला. प्रपंच सांभाळताना परमार्थ विसरला नाही आणि परमार्थ करताना प्रपंचाची जबाबदारी टाळली नाही, हीच त्यांच्या जीवनाची खरी शिकवण असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. कीर्तन सेवेदरम्यान उपस्थित भाविकांनी नामघोषात सहभाग घेतला. मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. याप्रसंगी मुंगसाजी महाराज सेवा प्रतिष्ठान चे अध्यक्ष जितेंद्रदादा बोंद्रे, सौ. भारतीताई बोंद्रे, परमहंस रामकृष्ण मौनिबाबा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.आ राहुलभाउ बोंद्रे, हिरकणी उत्कर्ष प्रतिष्ठानच्या अध्यक्षा ॲड. वृषालीताई बोंद्रे, उपाध्यक्ष डॉ. विश्वनाथ यादव, कोषाध्यक्ष सिध्देश्वर वानेरे, वर्धमानशेठ डहाळे, राष्ट्रवादी श. प. चे जिल्हाध्यक्ष नरेश शेळके, काशिनाथ आप्पा बोंद्रे, शिवराज पाटील, रवीआप्पा तोडकर, बि. टी. जाधव, प्राचार्य डॉ. अरूण नन्हई, कॅम्पस डायरेक्टर कैलास बियानी, प्राचार्य आर. एच. काळे, डॉ. राजेंद्र कोकाटे, डॉ. प्रशांत गावंडे, यांची उपस्थिती होती.

# एनसीसीमध्ये राष्ट्रीयस्तरावर गो. से. महाविद्यालयाची दमदार कामगिरी; २६ फेब्रुवारी रोजी अमरावती येथे सन्मान

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.२४ :** राष्ट्रीय छात्रसेना (एनसीसी) गट मुख्यालय, अमरावती यांच्या वतीने दि. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले असून हा कार्यक्रम विद्या भारती महाविद्यालय, अमरावती येथे संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमास संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती चे कुलगुरू मा. डॉ. मिलिंद बारहाते प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच एनसीसी अमरावती ग्रुपचे ग्रुप कमांडर ब्रिगेडियर सचिन गवळी यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. यावर्षी गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव यांनी एनसीसी क्षेत्रात उल्लेखनीय व उत्कृष्ट कामगिरी करत ''उत्कृष्ट एनसीसी महाविद्यालय'' हा मान पटकावला आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर यांची ''उत्कृष्ट प्राचार्य'' म्हणून तर लेफ्ट. सुहास पिढेकर यांची ''उत्कृष्ट एएनओ'' म्हणून निवड करण्यात आली आहे. महाविद्यालयातील कॅडेट्सनी राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल यश संपादन केले आहे. एसयूओ हर्षल किरण पाटील आणि जेयूओ साक्षी विजय अहिरकर यांनी पीएम रॅली २०२६ तसेच पुणे ते दिल्ली सायकल मोहिमेत सहभाग नोंदवून दिल्ली येथे महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले. तसेच थल सैनिक कॅम्प (टीएससी) २०२५ मध्ये जेयूओ विश्वजीत इंगळे यांनी उल्लेखनीय सहभाग नोंदवला. रिपब्लिक डे कॅम्प (आरडीसी) २०२६ मध्ये जेयूओ राष्ट्रपाल जयपाल गवार गुरु यांनी 'गार्ड ऑफ ऑनर' या मानाच्या प्रकारात सहभाग घेत दिल्ली येथे महाविद्यालयाची पताका फडकावली. विशेष म्हणजे पीएम रॅली, टीएससी आणि आरडीसी या तिन्ही राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमांमध्ये महाविद्यालयातील कॅडेट्सचा सहभाग राहिला असून हा अभिमानास्पद त्रिवेणी यशाचा मान महाविद्यालयाने प्राप्त केला आहे. मागील काही वर्षांपासून टीएससी व आरडीसी कॅम्पमध्ये सातत्याने सर्वाधिक कॅडेट्सचा सहभाग गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव मधून होत असल्यामुळे खामगाव शहरात गो. से. महाविद्यालयाचे एनसीसी युनिट हे प्रमुख व आदर्श युनिट म्हणून ओळखले जाते.

## महत्त्वाचे

### ग्रा.पं.गैरकारभार प्रकरणी कारवाईची मागणी

**खामगाव :** तालुक्यातील सजनपुरी येथील ग्रामस्थांनी उपविभागीय अधिकारी (महसुल) यांना नुकतेच निवेदन दिले आहे. त्यामध्ये नमुद केले आहे की, सजनपुरी ग्रामपंचायतीने मेरी पंचायत ॲपवर गावातील पाच महिलांची नावे व मोबाईल क्रमांक त्यांच्या संमतीविना मध्ये प्रसिद्ध केली आहेत. १ जानेवारी २०२३ पासून हा प्रकार सुरू असून, या महिलांच्या नावांच्या आधारे शासकीय निधीचा अपहार झाल्याचा संशय ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. तसेच शिवजयंती १९ फेब्रुवारी रोजी असतांना सुध्दा शासकीय आदेश असतानाही ग्रामपंचायतीने अधिकृतरीत्या शिवजयंती साजरी केली नाही. याबद्दल २१ फेब्रुवारीच्या ग्रामसभेत सोनू सीताराम कौशल यांनी जाब विचारला असता सरपंचांचा मुलगा सय्यद मुजफ्फर उर्फ मुज्या याने सर्वांसमोर सोनू कौशल यांना जीवे मारण्याची धमकी दिली. इतकेच नव्हे तर रात्री १ वाजता व्हिडिओ कॉल करून मानसिक छळ देखील केला. ग्रामसभेत ग्रामसेवकांनीही महिलांना अपमानास्पद वागणूक देत ग्रामसभा अर्धवट गुंडाळली. गावातील गरजु नागरिकांना घरकुल योजनेपासुन वंचित ठेवण्यात आले असुन ग्रामपंचायत सदस्यांच्या नातेवाईकांना घरकुल योजनेचा लाभ दिला जात आहे, असे आरोप निवेदनात केले असुन या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करून सरपंच, ग्रामसेवक व सरपंच पुत्र सय्यद मुजफ्फरवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी निवेदनात केली आहे.

### विज्ञान सप्ताहाचे आयोजन

**खामगाव :** नोबेल पारितोषिक विजेते थोर शास्त्रज्ञ डॉ.सी.व्ही रमण यांच्या रमण प्रभाव या शोधाच्या स्मरणार्थ राष्ट्रीय विज्ञानदिन २८ फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो. त्या अनुषंगाने नॅशनल हायस्कुल मध्ये काल २३ फेब्रुवारी २६ पासुन विज्ञान सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहाचे उद्घाटन सेवानिवृत्त कलाध्यापक संजय गुरव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी इयत्ता ५वी ते ९वी च्या विद्यार्थ्यांसाठी विज्ञानावर आधारीत पोस्टर मेकींग स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये सुमारे १५० विद्यार्थी सहभागी झाले होते. तर आज २४ फेब्रुवारी रोजी न.प. प्रा. शाळेतील इयत्ता ५ वीच्या विद्यार्थ्यांसाठी सुहास उदापुरकर अकोला यांच्या मार्गदर्शनात थ्रीडी शोचे आयोजन करण्यात आले होते. या शोचे उद्घाटन न.प. उपमुख्याधिकारी आनंद देवकते यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी न.प.शाळा क्र.६ चे शिक्षक शरद इंगळे व उबरहांडे विद्यार्थ्यांसह उपस्थित होते. न.प.च्या इतर प्राथमिक शाळांसाठी सुध्दा २४ ते २६ फेब्रुवारी पर्यंत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असुन विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्याध्यापिका सौ. उदापुरकर यांनी केले.

### करवाढ रद्द करावी अन्यथा आंदोलन

**खामगाव :** न.प.ने सन २०२५-२६ करीता केलेली प्रस्तावित करवाद अवाजवी व अन्यायकारक असल्याने रद्द करण्यात यावी, अशी मागणी नागरी हक्क संरक्षण समितीचे अध्यक्ष भिकाजी रेठेकर व सचिव ॲड. तरूण मोहता यांनी मुख्याधिकारी डॉ. प्रशांत शेळके यांना १६ फेब्रुवारी २६ रोजी एका निवेदनाद्वारे केली आहे. न.प.ने करवाढ रद्द न केल्यास समितीच्या वतीने जनहितार्थ लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. निवेदन देतांना विहिंप जिल्हा पालक बापुसाहेब करंदीकर, सामाजिक संघटनेचे पदाधिकारी अश्वीन पटेल, विहिंप जिल्हा कोषाध्यक्ष अमोल जोशी, भा. बौ. महासभा शहराध्यक्ष दादाराव हेलोडे, पतंजली योग शिक्षिका शालीनीताई भोपळे, नोटरी वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. टी. एम. हुसैन, राजेंद्रसिंह राजपूत, अंबादास साबळे, एकता फाऊंडेशन अध्यक्ष गोलु ठाकुर, गुरुद्वारा प्रबंध समितीचे जितु मेहरा, राजु जोशी, मराठा सेवा मंडळाचे सदस्य श्याम आंबेकर उपस्थित होते, अशी माहिती राजेश ढवळे यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली.

# राष्ट्रपतींच्या स्वागतासाठी शेगाव सज्ज

## संत नगरीत अभूतपूर्व सुरक्षा व्यवस्था

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी



**शेगाव दि.२४:** देशाचे प्रथम नागरिक २५ फेब्रुवारी रोजी संत नगरी शेगाव येथे भेट देणार असल्याच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण शहरात अभूतपूर्व आणि बहुस्तरीय सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. राष्ट्रपतींच्या दौऱ्यामुळे शेगाव शहर अक्षरशः उच्चसुरक्षा कवचाखाली आले असून, संतभूमीला छावणीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि श्री संत गजानन महाराज संस्थान यांच्या समन्वयातून दौऱ्याची जय्यत तयारी सुरू आहे.

या दौऱ्यासाठी तब्बल ३० जिल्ह्यांतील पोलीस पथके शेगावात दाखल झाली आहेत. सुमारे तीन हजारांहून अधिक पोलीस अधिकारी व कर्मचारी, ३२ श्वान पथके तसेच बॉम्बशोध व नाशक पथके शहरात तैनात करण्यात आली आहेत. शहरातील सर्व प्रवेशद्वारांवर कडेकोट तपासणी सुरू असून, प्रत्येक वाहनाची बारकाईने चौकशी केली जात आहे. प्रमुख चौक, बसस्थानक, रेल्वे स्थानक, तसेच मुख्य मार्गांवर विशेष नाकाबंदी करण्यात आली आहे. संशयास्पद हालचालींवर पोलिसांची गरुडदृष्टी असून, शहरभर बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे २४ तास नियंत्रण ठेवले जात आहे. हेलिपॅडपासून मंदिर परिसर आणि विसावा मैदानापर्यंत संपूर्ण मार्गावर विशेष सुरक्षा वर्तुळे उभारण्यात आली आहेत. स्थानिक गुन्हे शाखा, दहशतवादविरोधी पथक आणि विशेष सुरक्षा पथकांची स्वतंत्र नियुक्ती करण्यात आली आहे. वरिष्ठ पोलीस अधिकारी स्वतः मैदानात उतरून पाहणी करत असून, जिल्हा प्रशासनाकडून सातत्याने आढावा बैठका घेण्यात येत आहेत. प्रत्येक विभागाला स्पष्ट जबाबदाऱ्या देण्यात आल्या असून, कोणतीही त्रुटी राहू नये यासाठी काटेकोर नियोजन करण्यात आले आहे. श्री गजानन महाराज मंदिर परिसरात त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्था लागू करण्यात आली आहे. मंदिराच्या प्रवेशद्वारांवर मेटल डिटेक्टर, बॅगेज स्कॅनिंग यंत्रणा आणि श्वान पथकांच्या माध्यमातून तपासणी केली जात आहे. स्वतंत्र नियंत्रण कक्ष कार्यरत करण्यात आला असून, संपूर्ण परिसरावर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. राष्ट्रपतींच्या भेटीदरम्यान काही काळासाठी सामान्य दर्शन स्थगित राहणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. दरम्यान, राष्ट्रपतींच्या स्वागतासाठी शहरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली आहे. प्रमुख रस्त्यांवर आकर्षक सजावट, रोषणाई आणि स्वागत फलक लावण्यात आले असून, संपूर्ण शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिकांमध्ये अभिमानाची भावना व्यक्त होत असून, संतभूमीत देशाच्या प्रथम नागरिकांचे स्वागत करण्यासाठी सर्वत्र तयारी सुरू आहे. प्रशासनाकडून नागरिकांना सहकार्याचे आवाहन करण्यात आले आहे. सुरक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन करावे, वैध ओळखपत्र सोबत बाळगावे आणि तपासणीदरम्यान संयम राखावा, असे आवाहन करण्यात आले आहे. राष्ट्रपतींच्या दौऱ्यामुळे शेगाव शहर राष्ट्रीय पातळीवर पुन्हा एकदा चर्चेत आले असून, हा दौरा संत नगरीसाठी ऐतिहासिक ठरणार असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

# संग्रामपूर तालुका पत्रकार संघ विभागीय आदर्श पुरस्काराने सन्मानित

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी




**संग्रामपूर दि.२४ :** अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेतर्फे दिला जाणारा प्रतिष्ठेचा आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार संग्रामपूर तालुका पत्रकार संघाला २२ फेब्रुवारी रोजी कर्जत (जि. रायगड) येथे आयोजित झालेल्या भव्य सोहळ्यात प्रदान करण्यात आला. यंदा ३५५ तालुक्यांमधून निवड झालेल्या पाच आदर्श संघांमध्ये संग्रामपूर तालुक्याने स्थान मिळवून आपल्या पत्रकारितेचा दर्जा आणि समाजाभिमुख कार्याची दखल घेतली आहे. संग्रामपूर तालुक्याचा विशेष उल्लेख त्याच्या समाजाभिमुख पत्रकारितेसाठी केला जातो, जिथे राजकारणात टिकाटिपणीपेक्षा विकासाच्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित केले जाते. यामध्ये जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंह राजपूत राणा यांच्या सहकार्याचा महत्त्वपूर्ण वाटा आहे.

महाराष्ट्र राज्यातील ३५५ तालुक्यांमधून निवड होत पहिल्या पाच मध्ये स्थान मिळवत जिल्ह्याचे शेवटचे टोकावरील सातपुडा पर्वत रांगेच्या पायथ्याशी असलेल्या ग्रामीण अविकसित संग्रामपूर तालुक्याने शासन व जनतेच्या हिताचे दृष्टीने विविध उपक्रम राबवून आदर्श पुरस्काराचा मान पटकावला. ह्या यशामुळे संग्रामपूर तालुक्यासह बुलढाणा जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. समाजाभिमुख व विकासाभिमुख पत्रकारितेमुळे संग्रामपूर तालुक्याचा विशेष उल्लेख केला जातो. राजकारणाला केवळ टिके पुरते मर्यादीत न ठेवता विकासासाठी प्रेरक लिखाण करणारी पत्रकारिता हे येथील वैशिष्ट्य असल्याची दखल या पुरस्कारातून घेण्यात आली. अ.भा. मराठी पत्रकार परिषद ही ८२ वर्षापासून पत्रकारांच्या हितासाठी कार्यरत असलेली मातृसंस्था आहे. परिषदेच्या वतीने दरवर्षी उल्लेखनीय कार्यासाठी विविध आदर्श पुरस्कार दिले जातात. यंदाचा वसंतराव काणे 'आदर्श तालुका पत्रकार संघ' पुरस्कार संग्रामपूर तालुका पत्रकार संघास मिळाल्याने अमरावती महसूल विभागातून एकमेव बुलढाणा जिल्ह्याचा गौरव झाला.कर्जत (रायगड)येथील सोहळ्यात मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, मावळचे खासदार शिरंग बारणे, माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार महेंद्र थोरवे, वृत्तवाहिनी प्रतिनिधी मंदार फणसे, राजकीय विश्लेषक हेमंत देसाई, प्रदेश प्रतिनिधी चंद्रकांत बर्दे, जिल्हाध्यक्ष रणजीत राजपूत, रायगड प्रेस क्लब अध्यक्ष अभय आपटे, राहुल देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. राज्य पातळीवरील हा पुरस्कार सन्मानपत्र, मानचिन्ह, शाल व श्रीफळ अशा स्वरूपात मान्यवरांचे हस्ते प्रदान करण्यात आला.

# विदर्भाच्या लेखणीचा राज्यस्तरावर डंका

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी




**संग्रामपूर दि.२४:** आवाज लेखणीचा या दुसऱ्या राज्यस्तरीय साहित्य संमेलनात संग्रामपूर तालुक्यातील बोडखा येथील कवी दीपक भगवान उमाळे यांनी आपल्या उत्कृष्ट काव्यरचनेच्या जोरावर राज्य कवी युवा नायकहा बहुमान पटकावला आहे.

दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी नाशिक येथे पार पडलेल्या या दिमाखदार राज्यस्तरीय कवी संमेलनात महाराष्ट्रातील अनेक दिग्गज कवींनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत दीपक उमाळे यांनी सादर केलेल्या कवितेने उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या काव्यरचनेतील शब्दसामर्थ्य आणि सादरीकरणाची पद्धत यामुळे त्यांना हा राज्यस्तरीय सन्मान देऊन गौरवण्यात आले. बी.एस.एफ. बहुउद्देशीय संस्था (अमरावती), संत कबीर बहुउद्देशीय संस्था (बुलढाणा) आणि उपेक्षित नायक न्यूज यांच्या संयुक्त विद्यमाने या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. भूषण नि. सरदार आणि अध्यक्ष कृष्णा मुदगल यांच्या हस्ते दीपक यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

# पंचायत राज अभियान अंतर्गत गाडगे बाबा जयंती उत्साहात

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी




**संग्रामपूर दि.२४ :** मुख्यमंत्री पंचायत राज अभियान अंतर्गत आज गाडगे बाबा जयंती चे औचित्य साधून पिंप्री काथरगाव गट ग्रामपंचायत च्या वतीने गाडगेबाबा जयंती फार मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आणि ग्राम स्वच्छता करण्यात आले. स्वच्छता दिंडी सुद्धा काढण्यात आली हुबेहूब गाडगे बाबाची वेशभूषा धारण करून गोपाल इंगळे यांनी गावाला भेट दिली आणि शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून गावांमध्ये ग्रामस्वच्छता केली.

या कार्यक्रमाला लोकनियुक्त आदर्श सरपंच सौ सुवर्णाताई गणेश टापरे, उपसरपंच कुसुमताई डाखोडे, ग्रामपंचायत सदस्य कडू भाऊ कांबळे, विलास कंकाळ शीलाताई मुंडे, पार्वताबाई हातेकर तसेच शिक्षक वृंद वाघमारे ,गुहाळ, बुंदे अंगणवाडी सेविका खराटे ताई, अंगणवाडी मदतनीस कंकाळ ताई, मुंडे ताई तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिकशालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धम्मपाल हातेकर, नाना पाटील, संजय मुंडे ,संजय नांदोकार, जगन्नाथ बावस्कर, शीलाबाई हातेकर, मीराबाई चव्हाण, जयश्री कंकाळ, नंदाताई टापरे, ज्योतीताई नांदोकर, शकुंतला बावस्कार, सोपान कंकाळ, आदित्य सरदार, सुपेश डाखोडे, चेतन टापरे, सुयोग मेतकर भगवान मुंडे, गौरव मुंडे, सुपेश खराटे, गावातील आणि शालेय विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमरावती विद्यापीठ परीक्षेत गावंडे महाविद्यालयाचे यश

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**साखरखेर्डा दि.२४ :** येथील स्व. भास्करराव शिंगणे कला, प्रा. नारायणराव गावंडे विज्ञान व आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालयाने शैक्षणिक गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा पुन्हा कायम ठेवली आहे. महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. आम्रपाली राजू गवई हिने उन्हाळी २०२५ च्या वाङ्मय स्नातक परीक्षेत पाली विषयात गुणवत्ता यादीत सुवर्णपदक पटकावले.

दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे संपन्न झालेल्या बेचाळीसाव्या दीक्षांत समारंभात कु. आम्रपाली राजू गवई हिला मान्यवरांच्या हस्ते सुखदेव शिवाजी सरकटे सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. या सन्मानामुळे महाविद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांची परंपरा अधिक दृढ झाली आहे. पाली विषयासारख्या प्राचीन भाषेच्या अध्ययनात उत्कृष्ट प्राविण्य मिळवणे ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. सातत्यपूर्ण अभ्यास, शिस्तबद्ध परिश्रम आणि मार्गदर्शकांचे योग्य मार्गदर्शन यांमुळे हे यश संपादन केले. कु. आम्रपाली राजू गवई हिने आपल्या यशाचे श्रेय प्राचार्य डॉ. निलेश गावंडे, संस्थेच्या अध्यक्षा प्रा. डॉ. सौ. मिनलताई गावंडे तसेच पाली विभाग प्रमुख डॉ. राजेश चौरपागर यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाला दिले.

# सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, अधिकारी संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी पाटील

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी



**लाखनवाडा दि.२४:** महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी अधिकारी संघटनेची नुकतीच जिल्हा कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून जिल्हा अध्यक्ष रवींद्र पाटील जिल्हा कोषाध्यक्ष शा.ना.मानकर, कार्याध्यक्षपदी ते.रा.निकस, अशोक ठोंबरे जिल्हा सरचिटणीसपदी यांची एक मुखी निवड करण्यात आली.

यामध्ये दिनांक २० जून २०२६ रोजी राज्य उपाध्यक्ष मारुती वाढे यांच्या अध्यक्षतेखाली मवाळ विदर्भ अध्यक्ष, विदर्भ संघटक ज्ञानदेव क्षीरसागर, यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संघटनेची महत्वपूर्ण बैठक संपन्न झाली, असून या बैठकीमध्ये संघटनेच्या बुलढाणा जिल्हा अध्यक्षपदी रवींद्र पाटील तर जिल्हा कोषाध्यक्ष पदी शा.ना. मानकर यांची निवड करण्यात आली. यामध्ये जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून अशोक ठोंबरे, जिल्हा कोषाध्यक्ष शा.ना. मानकर यांची निवड करण्यात आली असून या निवडीमुळे संघटनेच्या पदाधिकारी व सर्व सभासदांना मध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# भालेगाव बाजार येथे हिंदू संमेलन उत्साहात

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी



**खामगाव दि.२४:** येथील भालेगाव बाजार येथे दिनांक २३ फेब्रुवारी रोजी सकल हिंदू काळेगाव मंडळ च्या वतीने या हिंदू संमेलनाचे आयोजन केले होते.

हिंदु जागृतीच्या दिशेने तसेच हिंदु समाजामध्ये नविन उर्जा आणि चेतना प्रदान करण्यासाठी संपुर्ण हिंदु समाज, सनातन धर्म, सनातन संस्कृती आणि सामाजिक एकतेचे प्रतिक असलेले हिंदु सम्मेलन चे आयोजन भालेगांव बाजार येथे करण्यात आले आहे. या हिंदू संमेलन साठी प्रमुख वक्ते म्हणून विदर्भ प्रांत सहप्रचारक परीक्षित जावडे यांनी सकल उपस्थित हिंदू बांधवांना संघटित हिंदू आणि समर्थ भारत हिंदू प्रेरित मार्गदर्शन केले. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले रोहना येथील शिव व्याख्याते हभप संतोष महाराज मनसुटे यांनीही उपस्थिती हिंदू बांधवाना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या इतिहासाला उजळा दिला तसेच कुंबेफळ येथील हभप सौ संगीताताई रहाणे यांनीही आपल्या मार्गदर्शनातून प्रबोधन केले.हे संमेलन सुरू होण्यापूर्वी प्रमुख मान्यवरांनी गो माता पूजन खंडेश्वर महाराज पूजन आणि छत्रपती शिवाजी महाराज आणि भारत मातेचे पूजन करून केले. या संपूर्ण हिंदू संमेलन साठी काळेगाव मंडळ हिंदू संमेलन अध्यक्ष प्रवीण दिवानाले आणि समस्त हिंदू संमेलनाचे सदस्य यांचे सहकार्य लाभले या संमेलनाचे सूत्रसंचालन हरिदास हुरसाड यांनी केले. प्रास्तविक राहुल मुंढे यांनी केले तर आभार प्रदर्शन कृष्णाजी महाराज यांनी केले. कार्यक्रम झाल्यानंतर भारत मातेच्या आरतीने सांगता झाली. त्यानंतर प्रसादाचे वाटप करण्यात आला. संम्मेलनास काळेगाव भालेगाव ढोरपगाव वडजी भेंडी कवळगाव बेलखेड नांद्री मांडणी कुंबेफळ शेंदरी दिवठाणा येथील हिंदू बांधव उपस्थित होते.

निवेदन

## काँग्रेस पक्षाची जिल्हा पोलिस अधीक्षकांकडे मागणी

# चिखला घटनेतील समाजकंटकांवर कठोर कारवाई करा

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी




**खामगाव दि. २४:** लोणार तालुक्यातील चिखला गावात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा हटविण्यावरून झालेल्या वादात पुतळ्याच्या बचावा करिता आलेल्या महिलांना विवस्त्र करून तसेच लहान मुलांना झुंडशाही करीत बेदम मारहाण करणाऱ्या समाजकंटक लोकांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी खामगाव विधानसभा काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात दि.२३ फेब्रुवारी रोजी एएसपी श्रेणिक लोढा यांच्या मार्फत जिल्हा पोलिस अधिक्षक बुलडाणा यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात नमुद आहे की, बुलढाणा जिल्ह्यात लोणार तालुक्यातील चिखला या गावात अत्यंत संतापजनक प्रकार घडला आहे. चिखला येथे रयतेचे राजे, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाला विरोध करत गावातील काही देशद्रोही प्रवृत्तीच्या समाजकंटकांनी शिवरायांचे स्मारक नष्ट करण्याचा नीच प्रयत्न केला. सोबतच या शिव स्मारकाचे रक्षण करण्यासाठी बसलेल्या शिवप्रेमी रणरागिणी महिलांना व लहान मुलांना अत्यंत अमानवीय वागणूक देत त्यांच्यावर दगडफेक केली तसेच विवस्त्र करून मारहाण करण्यात आली. राजमाता मॉसाहेब जिजाऊंच्या या जिल्ह्यात लेकींवर झालेला हा अत्याचार कधीही सहन केला जाणार नाही. या अन्याय अत्याचाराचा आम्ही जाहीर निषेध करतो व या प्रकरणी सखोल चौकशी करून समाजकंटक लोकांवर कायदेशीर कारवाई करून कठोर शासन करावे अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर खामगाव विधानसभा मतदार संघ समन्वयक ज्ञानेश्वर पाटील, तालुका अध्यक्ष तेजेंद्रसिंह चौहाण, शहर अध्यक्ष स्वप्निल ठाकरे पाटील, ओबीसी विभागाचे सचिव अजय तायडे, शेख जुलकर शेख चांद, धनंजय देशमुख, शहर कार्याध्यक्ष किशोरआप्पा भोसले, अल्पसंख्यांक जिल्हा उपाध्यक्ष अस्लम पटेल, जिल्हा संघटन सचिव अतुल सिरसाट, अल्पसंख्याक शहर अध्यक्ष बबलू पठाण, नसीमोद्दीन मो. प्रमोद चिंचोळकर, दिपके, अजीज पटेल, ॲड. अशोक इंगळे, सैय्यद जाफर, इलीयास अहेमद, साहील देशमुख, समाधान बोन्द्रे, परशराम धर्माळे, सौरभ रिछारिया, दिनेश सपकाळ, मोहम्मद इरफान, लक्ष्मण मिरगे यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या

# समाजाचा उद्धार करणे हे आपले कर्तव्य आहे- डॉ. बावस्कार

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी



**नांदुरा दि. २४:** माझा जन्म अत्यंत गरीब कुटुंबात झाला, त्यामुळे मी स्वतःला धन्य समजतो. त्यामुळेच मी गरिबांची सेवा करत यशाच्या उच्च शिखरावर पोहोचू शकलो असा दृढ विश्वास पद्मश्री पुरस्कार प्राप्त डॉ. हिम्मतराव बावस्कार यांनी व्यक्त केला. ते इंडियन मेडिकल असोसिएशन नांदुराच्या वतीने देण्यात आलेल्या पहिल्या स्व. डॉ. वसंत नांदुरकर स्मृती ''आदर्श डॉक्टर ''पुरस्काराने सन्मानित केल्यानंतर सत्काराला उत्तर देताना व्यक्त केला.

मी एमबीबीएस झाल्यानंतर प्रथम कोकणात रायगड जिल्ह्यात सेवा कार्याला सुरुवात केली. जेथे साप व विंचू दंशामुळे मृत्यूचे प्रमाणे मोठ्या प्रमाणावर होते. त्यावर संशोधन करून ते मी रोखू शकलो. एवढेच नव्हे तर बुलढाणा जिल्ह्यात आलेल्या केस गळती व किडनी आजाराने ग्रस्त लोकांकरिता संशोधन केले व त्यावर उपाय शोधून काढला असेही त्यांनी पुढे सांगितले. अर्थात माझे हे सर्व संशोधन कार्य गरीब शोषित पीडित समाजाकरिताच केले याचे त्यांनी स्मरण करून दिले. आदर्श डॉक्टर ची व्याख्या आपल्या देशात अद्यापही ठरली नाही असेही ते पुढे म्हणाले. कार्यक्रमाची सुरुवात प्रथमता प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रजनाने झाली. दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स विद्यापीठाचे माजी कुलगुरू वेदप्रकाश मिश्रा यांनी ज्यांचे प्रबंध आंतरराष्ट्रीय लँडस्केप व बीजीएम सारख्या ब्रिटिश मेडिकल जनरलीझममध्ये प्रसिद्ध झाले आहेत. अशा एका युगप्रवर्तक आदर्श डॉक्टर व्यक्तीला आदर्श डॉक्टर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले हा एक दुर्मिळ योग आहे, असे आपल्या मनोगतात व्यक्त केले. माजी खासदार डॉ. उल्हास पाटील माजी मंत्री डॉ. रंजीत पाटील ,नगराध्यक्षा मंगलाताई मुंढेकर, डॉ. राजेश राजोरे यांनीही शुभेच्छा पर मनोगत व्यक्त केले. यावेळी विचार पिठावर डॉ. प्रमोदिनी बावस्कार,डॉ. शिवदास गाडेकर महाराज, डॉ. मंजुषा गिरी, डॉ. अशोक बावस्कर, डॉ . सुशिला नांदुरकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. सन्मान चिन्ह ,सन्मानपत्र व रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरूप होते. नगर परिषदेच्या टाऊन हॉलमध्ये दिनांक २२ फेब्रुवारीला झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. व्ही. व्ही. देशमुख यांनी भूषविले होते. अतिशय रंगारंग झालेल्या हा कार्यक्रम इंडियन मेडिकल असोसिएशनचे सर्व पदाधिकारी यांनी अथक परिश्रम करून यशस्वी केला.

अजिंक्य भारत •
आपलं जालना
जालना, बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६ www.ajinkyabharat.com


## महत्त्वाचे

### पाणीपट्टी थकविणाऱ्या ग्रामपंचायतींना आवाहन

**जालना :** जालना पाटबंधारे विभागांतर्गत विविध प्रकल्पांतून अनेक ग्रामपंचायतींना पिण्याच्या पाण्यासाठी पाणीपुरवठा केला जातो. मात्र या योजनांकडून पाणीपट्टी भरण्याबाबत सातत्याने टाळाटाळ केली जात असल्याचे समोर आले आहे. सध्या विभागाची ४ कोटी ८५ लाख ६३ हजार रुपयांची थकबाकी आहे. तरी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत योजनाधारकांनी सात दिवसांची अंतिम मुदतीत आपली थकबाकी जमा करावी, असे कार्यकारी अभियंता एस. बी. कोरके यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे. महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ मधील भाग ६, कलम ४९ (ज) नुसार कारवाई केली जाणार आहे. यामध्ये केवळ पाणीपुरवठाच नव्हे, तर संबंधित योजनेचा विद्युत पुरवठाही खंडित करण्यात येणार असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे.

### गावठी पिस्टलसह दोघांना अटक

**जालना :** स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करत गावठी पिस्टलसह दोन आरोपींना अटक केली असून, ७ लाख ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सचिन साहेबराव विंचाल (वय २५ रा. नांदी ता. अंबड), भाऊत्याल देवचंद जन्हाडे (वय ३७, रा. नांदी), अशी अटक आरोपींची नावे आहेत. स्थानिक गुन्हे शाखेला बदनापूर परिसरात अवैध शस्त्र बाळगणाऱ्या व्यक्तीबाबत गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार पथकाने शनिवारी रात्री साडेबाराला सोमठाणा रोडवर रेल्वे गेटजवळ दोन संशयितांना कारसह ताब्यात घेतले. तपासादरम्यान आरोपीकडून ४१ हजारांचे गावठी पिस्टल, दोन जिवंत काडतुसे तसेच ७ लाखांची कार, असा ७ लाख ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल जात केला. संबंधित आरोपीवर बदनापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि योगेश उबाळे, अंमलदार संभाजी तनपुरे, रुस्तुम जैवाळ, प्रभाकर वाघ, कैलास खार्डे, देविदास भोजने, इर्शाद पटेल, चालक सौरभ मुळे यांनी केली.

### घरकुल ही मूलभूत गरज-ॲड.मगरे

**परतूर :** शिवसेना दलित आघाडीच्यावतीने अनेक वर्षांपासून भूमिहीन, बेघर, निराधार या त्रिसूत्री कार्यक्रमाची जन आंदोलनाच्या माध्यमातून रस्त्यावरचा संघर्ष आणि जालना जिल्हा शिवसंपर्क सामाजिक अभियान गाव, वाडी - तांडावस्तीमध्ये जाऊन विहित नमुन्यात उपेक्षित समाजातील वंचित घटकाचा शोध घेऊन त्याला शासकीय योजनेचा लाभ देण्यात शिवसेना दलित आघाडीला यश आलेले असल्याचे शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्कर मगरे यांनी सांगितले. यावेळी उपविभागीय अधिकारी यांच्याशी चर्चा करुन त्यांना निवेदन देण्यात आले. शिवसेना दलित आघाडीच्या वतीने जालना जिल्ह्यात तालुकानिहाय, तालुकास्तरीय भूमिहीन, बेघर, निराधार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. १८ फेब्रुवारी रोजी येथील भूमिहीन, बेघर निराधार मेळाव्यात ॲड. भास्कर मगरे यांनी मार्गदर्शन केले. शासनाच्या योजनांमधून उपेक्षित समाजातील बंचितांना निवारा देण्यात यावा, तसेच महाराष्ट्र शासनाचा शंभर दिवसाच्या ग्रामीण महाआवास मधून जागेअभावी अपूर्ण घरकुले प्राधान्य क्रमाने पूर्ण करावी, अशी मागणीही उपविभागीय अधिकारी यांच्याशी चर्चा करून निवेदनाद्वारे करण्यात आली, यावेळी मधुकर मोरे, बाळासाहेब भदर्गे, संभाजी पाटीलसह बेघर निराधारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# जाफ्राबाद तालुक्यात शेतकरी आत्महत्या वाढणार?

## रोहयोचे मस्टर थांबल्याने शेतकरी हवालदिल

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**जाफ्राबाद, दि. २४ :** जाफ्राबाद तालुक्यातील अनेक गावातील रोजगार हमी अंतर्गत मंजूर झालेल्या कामांची देयके रखडल्याने शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडले आहेत. मस्टरच्या भरोशावर कर्ज काढून विहिरी व इतर कामे पूर्ण केलेल्या अनेक शेतकऱ्यांना अद्याप पैसे मिळाले नसल्याने कर्जाचा बोजा वाढत आहे. शिवाय मस्टर काढण्यासाठी शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक केली जात आहे. शिवाय पैसे न देणऱ्यांचे मस्टर झीरो केले जात असल्याने शेतकरी त्रस्त झाला आहे. वेळेत देयके न मिळाल्यास परिस्थिती आणखी बिघडून तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढण्याची भीती व्यक्त केली जात असून, प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा अशी मागणी शेतकरी करत आहे.

तालुक्यातील रोजगार हमी योजनेअंतर्गत विविध विकासकामांना वेग आला असला, तरी मस्टर न काढणे आणि देयके रखडविणे या कथित प्रकारांमुळे शेतकरी व शेत मजूर गंभीर अडचणीत सापडल्याचा आरोप लाभार्थ्यांकडून होत आहे. विहिरी, गोठे, घरकुल, फळबाग, बांधावरील वृक्षलागवड यांसारख्या वैयक्तिक लाभाच्या कामांना कार्यादेश देऊनही आठवड्याला मस्टर काढले जात नसल्याची तक्रार अनेक गावांतून पुढे आली आहे.

तालुक्यातील देऊळझरी, हनुमंत खेडा , आंळद, चापणेर, सिपोरा, वरुड, ब्रम्हपुरीसह अनेक गावांची परिस्थीती गंभीर झाली आहे .तर अनेक गावात घरकुलांचे देयके न दिल्यामुळे लाभार्थ्यांना उघड्यावरच राहण्याची वेळ आली आहे .

उलट काही ठिकाणी कागदोपत्री रस्त्यांची कामे दाखवून मस्टर काढले जात असल्याची चर्चा तालुक्यात रंगली आहे.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, अनेकांनी विहिरी खोदण्यासाठी कर्ज काढले आहे. मजुरी, यंत्रभाडे, सिमेंट, लोखंडी साहित्य यासाठी मोठा खर्च करून कामे पूर्णत्वास नेली; परंतु मस्टर नोंदी न झाल्याने देयके अडकली आहेत. वेतन न मिळाल्याने कर्जफेड, हप्ते आणि दैनंदिन खर्च भागवणे कठीण झाले आहे. काही शेतकरी मानसिक तणावाखाली असून, परिस्थिती अशीच राहिल्यास गंभीर परिणाम संभवतील, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

अनेक गावातील ग्रामस्थांचा आरोप आहे की, काही ठिकाणी रोजगार सेवक जाणीव पूर्वक शेतकरी वर्गाला पैसे न दिल्यामुळे मस्टर न काढण्यास सांगतात. तर संगणक चालक, अभियंता आणि लिपिक यांच्या संगनमताने निवडक कामांचेच मस्टर काढले जातात. पैसे देणाऱ्यांची कामे पुढे सरकतात तर इतरांची प्रकरणे प्रलंबित ठेवली जातात, अशी चर्चा गावोगावी सुरू आहे, यामुळे योजनेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

कामगारांचे म्हणणे आहे की, रोजगार हमी ही ग्रामीण भागातील गरजूंसाठी जीवनरेखा आहे. वेळेवर मजुरी मिळाली तरच कुटुंबाचा उदरनिर्वाह शक्य होतो. मस्टर नोंदी थांबल्याने अनेकांना आठवड्याचा पगार मिळत नाही. त्यामुळे जिवन अवशक वस्तु व किराणा,माल कसा खरेदी करचा असा प्रश्न मजुर वर्गा पुढे निर्माण झाला आहे.

शिक्षण, आरोग्य यांसारख्या मूलभूत गरजांचा प्रश्न निर्माण झाला आहे.

दरम्यान, संबंधित यंत्रणेकडून आरोपांची पडताळणी सुरू करावी गरीब शेतकरी वर्गाला प्रशासनाने तातडीने स्वतंत्र चौकशी समिती नेमून सर्व प्रलंबित मस्टरची छानणी करून, दोषींवर कडक कारवाई करावी आणि पात्र लाभाव्यांची देयके त्वरित अदा करावीत, अशी मागणी तालुक्यातील शेतकरी करत आहेत.

.योजनेचा उद्देश ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध करून देणे आणि शाश्वत विकासकामे उभी करणे हा आहे. मात्र, देयके रखडल्याने शेतकरी आर्थिक कोंडीत सापडत असल्याचे चित्र समोर येत आहे.

# जिल्ह्यात मका खरेदी केंद्राची संख्या वाढवा

## खा.कल्याण काळे यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**जालना, दि. २४ :** जालना जिल्ह्यात मका खरेदी केंद्रांची संख्या वाढवून खरेदी तात्काळ सुरू करावी तसेच जिल्ह्याला दिलेला लक्षांक वाढवावा, अशी मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या पत्राद्वारे केली आहे.

पत्रात नमूद केल्याप्रमाणे, जालना जिल्ह्यात यावर्षी मका पेरणी झालेले क्षेत्र सुमारे ५७,३४५ हेक्टर असून अंदाजे ६०,००० शेतकऱ्यांनी मका पिकाची पेरणी केली आहे. तसेच जिल्ह्यात अंदाजे १७ लाख क्विंटल मक्याचे उत्पादन झाल्याचा अंदाज असतानी शासनाने मका खरेदीसाठी १,००,००० क्विंटल इतका लक्षांक दिलेला आहे टप्प्याटप्प्याने मिळालेला लक्षांक केवळ ८,००० क्विंटल आहे. त्यापैकी आजपर्यंत फक्त १,४८४ क्विंटल मका खरेदी करण्यात आलेला आहे. जिल्ह्यात नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची संख्या २,२४६ असून त्यापैकी केवळ ५५ शेतकऱ्यांकडूनच मका खरेदी करण्यात आलेली आहे. तसेच संपूर्ण जिल्ह्यात सध्या फक्त १० मका खरेदी केंद्रे कार्यरत आहेत. जालना जिल्ह्यात मका पिकाचे सरासरी उत्पादन हेक्टरी २९.७६ क्विंटल इतके झालेले असताना खरेदीची गती अत्यंत मंद असल्याचे दिसून येते.

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी तात्काळ मका खरेदी केंद्रांची संख्या वाढवावी, खरेदी प्रक्रिया वेगाने राबवावी तसेच जिल्ह्याला दिलेला खरेदी लक्षांक वाढवावा, अशी मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केली आहे.

यावेळी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, त्र्यंबकराव पाबळे, भाऊसाहेब साळुंके, विलास दानवे व शेतकरी मोठ्या संखेने उपस्थित होते.

# योग्य मोबदला दिल्याशिवाय भूसंपादन करू देणार नसल्याचा शेतकऱ्यांचा निर्धार

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. २४ :** मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्राला जोडणाऱ्या जळगाव-जालना प्रस्तावित रेल्वे मार्गाच्या उभारणीसाठी प्रशासकीय हालचालींना आता वेग आला आहे. या रेल्वे मार्गाची एकूण लांबी १७४ किलोमीटर आहे. त्यापैकी सुमारे १४० किलोमीटरचा मोठा भाग जालना जिल्ह्यातून जाणार आहे. प्रशासनाकडून भूसंपादनासाठी मोजणीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे. २०१३ च्या प्रचलित भूसंपादन कायद्यानुसार मावेजा देण्यात यावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे,

जालना ते जळगाव दरम्यान रेल्वे मार्ग उभारण्यासाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू आहे. भूसंपादनाच्या सर्वेक्षणात फळबागा, शेतातील विहिरींसह इतर मालमत्तांची माहिती गोळा करण्यात आली आहे. या मार्गावर तब्बल १७ रेल्वेस्थानके असतील. नशिराबाद, धानवड, नेरी, सुनसगाव बुद्रुक, पहूर, वाकोद, अजिंठा लेणी, अन्वी, सिल्लोड, भोकरदन, सायगाव, केदारखेड, राजूर, बावणेपांगरी, पिंपळगाव, नागेवाडी, दिनेगाव या गावांत स्थानके असणार आहेत. दरम्यान, या मार्गावर १३० छोटे पूल, तीन नद्यांवरील मोठे पूल आणि तीन बोगदे तयार करण्यात येणार आहेत. जालना तालुक्यातील १ व बदनापूर तालुक्यातील ८ गावांतील जमिनी रेल्वे मार्गासाठी संपादित करण्यात येणार आहेत. यात भोकरदन तालुक्यातील १८९.०४ हेक्टर तर बदनापूर तालुक्यातील १३७ हेक्टर व जालना तालुक्यातील ०.८२ हेक्टर जमिनीचा समावेश आहे.

रेल्वे मार्गाच्या भूसंपादनासाठी आवश्यक असणाऱ्या जमीन संपादनाचा अहवाल प्रशासनास प्राप्त झाला आहे. यानुसार, येत्या काही दिवसांत ज्या शेतकऱ्यांची जमीन संपादित करण्यात येणार आहे, अशा शेतकऱ्यांना नोटीस पाठवण्यात येणार आहे. यानंतर शेतकऱ्यांच्या मावेजासह इतर बाबींवर पुढील कार्यवाही होईल.

# परतूर शहरात सीसीटीव्ही बसविण्याची मागणी

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**




**परतूर, दि. २४ :** शहरात वाढत्या गर्दी, वाहतूक आणि गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विशेषतः सायंकाळनंतर सार्वजनिक ठिकाणी महिलांना असुरक्षित वाटत असल्याने संपूर्ण शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

परतूर नगरपालिकेत महिला नगराध्यक्षासह १३ महिला नगरसेविका असल्याने महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ठोस निर्णय घेण्याची ही मोठी संधी असल्याचे मत व्यक्त होत आहे. बाजारपेठ, बसस्थानक परिसर, शाळा-कॉलेज परिसर, मुख्य चौक, निर्जन रस्ते तसेच मुख्य रस्त्यावर सीसीटीव्ही यंत्रणा उभारल्यास गुन्हेगारीवर आळा बसण्यास मदत होणार आहे. दरम्यान, अनेक शहरांमध्ये ही व्यवस्था प्रभावी ठरली असून परतूरमध्येही ती तातडीने राबवावी, अशी मागणी होत आहे.

महिला सक्षमीकरणाच्या दिशेने ठोस पाऊल उचलण्यासाठी नगरपालिकेने पुढाकार घेऊन शहरातील महिलांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून द्यावे, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. आता महिला नगराध्यक्ष व नगरसेविका या आव्हानाला कशा प्रकारे सामोऱ्या जातात, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

# जालना विभागातील ४ आगारात नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड दिले जाणार

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. २४ :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एसटीच्या प्रवासात या पुढे विविध सामाजिक सवलतींचा लाभ घेण्यासाठी महामंडळाचे नेशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (स्मार्ट कार्ड) अनिवार्य करण्यात आल्याची माहिती जालना विभाग नियंत्रक मनीषा सपकाळ व विभागीय वाहतूक अधिकारी सुरेश टकले एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

जालना जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिक आणि महिलांसह इतर सवलतधारकांच्या सोयीसाठी जालना विभागातील ४ आगारात सुमारे २२८ अधिकृत एवंट नियुक्त करण्यात आले आहेत. बसस्थानकांवरच नोंदणीची प्रक्रिया पार पडणार असल्याने ग्रामीण भागातील प्रवाशांनाही मोठा दिलासा मिळणार आहे. एसटीचा हा निर्णय म्हणजे परंपरागत प्रवास व्यवस्थेला डिजिटल स्पर्श देणारा टप्पा आहे. तिकीट हातात आणि सुट्या पैशाची चिंता या जुन्या गोष्टी आता इतिहासजमा होत आहेत.

शालेय व तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याच्या सरल क्रमांकाशी जोडलेले कार्ड दिले जाईल. अमृत ज्येष्ठ नागरिक, सर्वसाधारण ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांना आधार संलग्न कार्ड मिळेल. दिव्यांग प्रवाशांना यूआयडी क्रमांक जोडून विशेष सुविधा असलेले कार्ड दिले जाईल. पुरस्कारार्थी व पत्रकार, स्वातंत्र्यसैनिक, अधिस्वीकृतीधारक पत्रकार आणि राज्यस्तरीय पुरस्कार विजेत्यांना विभागीय कार्यालय येथील मुख्यालय आगारामार्फत वितरण केले जाणार आहे.

# आंतरराज्य घरफोडी करणारा कुख्यात गुंड गोंदी पोलिसांच्या जाळ्यात

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**जालना, दि. २४ :** घरफोडी व चोरी करणारा कुख्यात गंड रवी अन्ना शिंदे यास गोंदी पोलिसांनी जेरबंद केले आहे. कर्नाटक राज्यातील पोलीस स्टेशन हारुगीरी अंतर्गत झालेल्या घरफोडी, चोरी करणार्या टोळीतील रवी आन्ना शिंदे (वय २८) रा. नविन सिरसगाव ता. अंबड जि. जालना हा गोंदी हद्दीत असल्याची माहिती मिळाल्याने सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर व त्यांचे पोलीस कर्मचारी तसेच कर्नाटक पोलिसांनी रवी आन्ना शिंदे यास गुरूवारी शहापूर परीसरात सापळा रचून अटक केली व कर्नाटक पोलीसांच्या स्वाधिन करण्यात आले. रवी शिंदे याच्यावर जालना तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यात घरफोडी, दरोडा आदी प्रकारचे गुन्हे दाखल आहेत. सदरची कारवाई वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर तसेच पोउपनि मुपडे, पोउपनि हावले, पोउपनि जंगले तसेच पोलीस कर्मचारी भोजने, हावाळे, गायकवाड, सिद्दीकी आदींनी पार पाडली.

# पाच एकरातील तुरीचा गंज जाळला

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. २४ :** ५ एकरातील तुरीचा गंज अज्ञात व्यक्तीने जाळून टाकल्याची घटना तालुक्यातील जळगाव येथे १८ फेब्रुवारी रोजी घडली. यामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले असून, मौजपुरी पोलिसांनी पंचनामा केला आहे.

जळगाव येथील उद्धव शिवाजी पठारे यांची गट नंबर ११७ मध्ये शेती आहे. यंदा त्यांनी तुरीची लागवड केली होती.

तुरीची सोंगणी करून गंजी घातली होती. परंतु, अज्ञात व्यक्तीने ती जाळून टाकली असून, त्यांचे मोठे नुकसान झाले. जळगाव येथे पीक जाळून टाकल्याच्या तीन ते चार घटना घडल्या असून, संबंधित व्यक्तीचा शोध घेऊन कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. यासंदर्भात मौजपुरी पोलिसांनी पंचनामा केला आहे.

**अपेक्षा** शिवजन्मोत्सव सोहळ्यात जनभावना व्यक्त

# जालन्यात भव्य शिव महोत्सव साजरा व्हावा-अरविंद देशमुख

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



जालन्यातील लोकप्रतिनिधींना आवाहन करताना शिवजयंतीला एकत्रितरित्या शिव महोत्सव साजरा केला जावा, अशी अपेक्षा व्यक्त केली

**जालना, दि. २४ :** मराठा महासंघ मराठा क्रांती मोर्चा प्रणित शिवजन्मोत्सव समितीच्यावतीने जालना शहरात १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती निमित्त भव्य मिरवणूक काढण्यात आली. नाशिक येथील ५० जणांचे बँजो पथक, लेझीम आणि मलखांब यांच्या पथकांसह निघालेल्या या मिरवणुकीने जालन्यात शिवकालीन वातावरण निर्माण केले होते. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात समितीचे संस्थापक अध्यक्ष अरविंद देशमुख यांनी प्रास्ताविक भाषणात

या सोहळ्याप्रसंगी व्यासपीठावर आ.अर्जुनराव खोतकर, महापौर वंदनाताई मगरे, उपमहापौर राजेश राऊत, पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, प्रशिक्षणार्थी पोलीस अधीक्षक शेखर, पोलीस उपाधीक्षक अनंत कुलकर्णी, धनगर समाजाचे नेते दीपक बोऱ्हाडे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण आदी उपस्थित होते.

अरविंद देशमुख पुढे म्हणाले की, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर आणि बीड या जिल्ह्यांप्रमाणेच जालन्यातील आजी-माजी आमदार, खासदार आणि प्रशासकीय विभागांनी पुढाकार घेऊन इथून पुढची शिवजयंती मोठ्या स्वरूपात साजरी करावी. केवळ एक दिवसाचा कार्यक्रम न ठेवता शिव महोत्सव साजरा व्हावा, ज्यामध्ये शिवकालीन कला आणि संस्कृतीचे दर्शन घडवणारी प्रदर्शने आयोजित केली जावीत, जेणेकरून ग्रामीण भागातील जनतेला त्याचा लाभ घेता येईल. याकामी आमची समिती पूर्ण ताकदीने अंगमेहनत आणि आर्थिक योगदान देण्यास तयार आहे.

मागील वर्षीच्या एकच शिवजयंती या मुद्द्यावर भाष्य करताना त्यांनी स्पष्ट केले की, शिवजयंती एक नव्हे तर अनेक झाल्या पाहिजेत. प्रत्येक वॉर्डातून आणि चौकातून शिवरथ निघाले पाहिजेत. पंढरपूरला जशा विविध दिंड्या एकत्र येतात, त्याचप्रमाणे प्रत्येक प्रभागातून आणि ग्रामीण भागातून शिवमय रथ मिरवणुकीने एका ठिकाणी एकत्रित येऊन मोठा सोहळा व्हावा, असा मानस त्यांनी व्यक्त केला. राजकीय पक्षांच्या लोकप्रतिनिधींनी आणि नगरसेवकांनी आपापल्या वॉर्डातून शिवरथ काढण्यासाठी कटिबद्ध व्हावे, अशी इच्छाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

अजिंक्य भारत

# आपलं अमरावती

अमरावती, बुधवार,२५ फेब्रुवारी २०२६

## थोडक्यात

### दारूड्या पित्याची अल्पवयीन मुलांना मारहाण

अमरावती : लहान मुलाने वडिलांची दुचाकी नेली. दरम्यान वडिलांना तिचा ब्रेक वायर तुटलेला दिसला. याबाबत त्यांनी लहान मुलाला दारूच्या नशेत शिवीगाळ करीत मारहाण केली. दरम्यान मोठा भाऊ त्याच्या बचावासाठी धावला. वडिलांनी त्याला लोखंडी चुलीने मारहाण करीत बोटाला चावा घेत जखमी केले. ही घटना साऊर येथे घडली. मुलाच्या तक्रारीवरून वलगाव पोलिसांनी वडिलांविरुद्ध गुन्हा नोंदवला. पुढील तपास पोलीस करीत आहे.

### गावठी दारू अड्डयावर पोलिसांची धाड

अमरावती : नांदगाव पेठ पोलिसांनी पिंपळविहीर येथे कारवाई केली. या वेळी त्यांनी प्लास्टिकच्या डबकीत असलेल्या २० लीटर हातभट्टीची दारू जप्त केली. तिची अंदाजे किंमत २ हजार रुपये आहे. नांदगाव पेठ पोलिसांनी एका युवतीविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

अमरावती : रतनगंज येथे युवकाने राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली. किशोर प्यारेलाल चढार (३७) असे मृतकाचे नाव आहे. नागपुरी गेट पोलिसांनी मर्ग नोंदवला.

### दाम्पत्याला अश्लील शिवीगाळ

अमरावती : फोटो काढण्याच्या क्षुल्लक कारणावरून पुरुषासह महिलेने नातेवाईक असलेल्या दाम्पत्याला शिवीगाळ केली. इतकेच नव्हे, तर मारहाण करण्यासाठी अंगावर धावून गेले. ही घटना रामपुरी कॅम्प येथे घडली. महिलेच्या तक्रारीवरून गाडगे नगर पोलिसांनी राजेश सोनी (५०) याच्यासह एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला. पुढील तपास गाडगेनगर पोलीस करीत आहे.

### अपघातात एकाचा मृत्यू

अमरावती : शहरात एकाच दिवशी तीन वेगवेगळे अपघात घडलेत. यामध्ये एकाचा मृत्यू झाला, तर तिघे जखमी झालेत. एक अपघात बडनेरा, तर दोन वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेत. रामकृष्ण वासुदेवराव कुसरकर (५०, रा. खोलापूर पांढरी) असे मृतकाचे नाव आहे, तर मोहम्मद साबीर मोहम्मद अब्दुल (५०, रा. अलमास नगर), रामराव देवराव बेलोकार (७०, रा. दारापूर) व अन्य एक असे जखमी झालेत. या घटना बडनेरा येथील चक्रधर पेट्रोल पंपापुढे नागपूर मार्गावर, खारतळेगावाजवळ व शिराळा बसस्टँड ते साऊर फाटा येथे घडल्यात.

### सावळा येथे सावकारावर गुन्हा दाखल

अमरावती : धामणगाव रेल्वे तालुक्यातील सावळा येथील एका व्यक्तीविरुद्ध अवैध सावकारी प्रकरणी दत्तापूर पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यात आला आहे सहकार विभागाने धामणगाव रेल्वे तालुक्यातील सावळा येथे गोपाल प्रभाकर टेकाडे यांच्या घरी व शेतात एकाचवेळी दोन पथक नेमुन २ जानेवारी रोजी धाड टाकली होती. या कारवाईत त्यांच्याकडून ९६ संशयास्पद दस्ताऐवजसह २७ प्रकारचे शेती साहित्य जप्त केले होते. या प्रकरणाच्या चौकशीनंतर सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था धामणगाव रेल्वे येथील सहकारी अधिकारी श्रेणी-१ येसुदास दामोधर खोब्रागडे यांनी लेखी तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीनुसार, गोपाल प्रभाकर टेकाडे (रा. सावळा) यांनी परवानगीशिवाय सावकारी व्यवसाय केल्याचा आरोप आहे. सदर प्रकरणात जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था अमरावती यांच्या आदेशानुसार २ जानेवारी रोजी आरोपीच्या राहत्या घरी व शेतशिवारात धाड टाकण्यात आली.

# दलित वस्तींवरील २७ कोटींच्या कामांची स्थगिती उठविली

## पालकमंत्र्यांचे आदेश; रखडलेल्या कामांना येणार गती

**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**अमरावती, दि.२४ :** समाजकल्याण विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तींच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या योजनेअंतर्गत सन २०२५-२६ साठी २७ कोटींची कामे प्रस्तावित असताना या कामांना स्थगिती देण्यात आली होती. त्यामुळे ही कामे रखडली होती. याची दखल घेत पालकमंत्र्यांनी या कामांवरील स्थगिती उठविल्याने मार्च एण्डिगपूर्वी कामे पूर्ण करण्याचे प्रशासनासमोर आव्हान उभे ठाकले आहे.

समाजकल्याण विभागामार्फत पंचायत समितीकडून प्राप्त प्राधान्यक्रम यादी तसेच लोकप्रतिनिधी यांच्या शिफारसीनुसार या कामांचा आराखडा मंजूर करण्यात आला आहे. निवडलेल्या कामांमध्ये दलित वस्तीमधील मलनिस्सारण व्यवस्था (नाली), पाणीपुरवठा, काँक्रिट रस्ते, एलईडी लाईट बसविणे, पेव्हिग ब्लॉक, समाजमंदिर



बांधकाम व दुरुस्ती यांचा समावेश आहे. सन २०२५-२६ मधील २७ कोटींच्या ६७० मंजूर कामांना प्रशासकीय मान्यता देऊन निधीच्या अनुषंगाने ३९७ कामांसाठी पहिला हप्ता पंचायत समित्यांना वितरित करण्यात आला होता.

मात्र, जिल्हा नियोजन बैठकीत पालकमंत्र्यांच्या निर्देशानुसार या कामांना तात्पुरती स्थगिती देण्यात आली होती. दरम्यान, कामांच्या स्वरूपाबाबत पुनरावलोकन करताना मोठ्या प्रमाणात रस्ते व पेव्हिंग ब्लॉकची कामे समाविष्ट झाल्याबद्दल पालकमंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली. त्याऐवजी मलनिस्सारण, गटार व्यवस्था, पाणीपुरवठा व एलईडी लाईट यांसारख्या मूलभूत सुविधांवर भर देण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार पंचायत समित्यांकडून ११२ कामांमध्ये बदल प्रस्ताव सादर करण्यात आले. सदर कामांबाबत आवश्यक प्रमाणपत्रे, जिओ-टॅगिंग फोटो व इतर कागदपत्रे पालकमंत्र्यांसमोर सादर करण्यात आली.ही कामे मागासवर्गीय घटकांच्या सामाजिक व भौतिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाची असल्याने विलंब टाळण्याच्या दृष्टीने लोकप्रतिनिधींनी स्थगिती उठविण्याची मागणी केली होती. या सर्व बाबींचा विचार करून पालकमंत्र्यांनी ६७० कामांवरील स्थगिती उठविण्यास मान्यता दिली आहे. तसेच प्रस्तावित ११२ बदल कामांच्या अनुषंगाने आवश्यक सुधारणा करून कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले आहेत.

> दलित वस्तीच्या कामांवरील स्थगिती उठविली असून पंचायत समित्यांनी बदल प्रस्ताव ग्रामपंचायत ठराव, आवश्यक प्रमाणपत्रे व अंदाजपत्रकासह करावेत.
>
> **डी.एम. पुंड,**
> **जिल्हा समाज कल्याण अधिकारी**

# बस-कार अपघातात एक ठार, सहा जखमी

## अंजनगाव- आकोट रस्त्यावरील घटना

**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, दि.२४ :** अंजनगाव आकोट राष्ट्रीय महामार्ग रोडवरील भंडारज रोडवर आज दिनांक २४ फेब्रुवारी रोजी दुपारी चार वाजताच्या दरम्यान एसटी बस व कारचा अमोरा समोर अपघात होऊन एकाचा जागीच मृत्यू झाला असून सहा जन गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. अंजनगाव सुर्जी येथून आकोटकडे जार्नाया राष्ट्रीय महामार्ग क्र ५७२ वरील भंडारज येथे दुपारी चार वाजता एसटी महामंडळाची बस क्रमांक एम एच २० जी सी ३९३२ ही बस आकोटकडे जात असताना समोरून भरधाव येणारी कार क्रमांक एमएच २७ जी ई ८०८१ ची भीषण आमोरासमोर टक्कर होऊन यामध्ये कारचालक शालिग्राम वानरे वय ६० यांचा जागीच मृत्यू झाला असून या कारमधील नुकतेच लग्न झालेले प्रथमेश वानरे वय ३० , उत्कर्षा वानरे ( कडू) वय २७ जखमी झाली असून त्याच कारमधील कुसुम वानरे वय ६० , रुखमाबाई गवई वय ७० सर्व राहणार अचलपूर हे गंभीर जखमी झाले असून त्यांना अंजनगाव ग्रामीण रुग्णालयातून उप जिल्हा ग्रामीण रुग्णालयाकडे अचलपूर येथे पुढील उपचाराकरिता पाठवण्यात आले आहे. तर परिवहन महामंडळाच्या बसमध्ये जखमी झालेले वंदना पिंपळकर वय ३५, रमेश रामचंद्र पिंपळकर वय ७० रा. अचलपूर हे सुद्धा गंभीर जखमी झाले असून पुढील उपचारासाठी त्यांना उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले







आहे. अपघाताची भीषणता एवढी प्रचंड होती की कारच्या समोरचा भाग व एसटी बसचा समोरील भागाचा चेंदामेंदा झाला. भंडारज रोडवर हा भीषण अपघात घडताच या गावातील ग्रामस्थ मदत करण्यासाठी धावून आले . तातडीने गंभीर जखमींना अंजनगाव ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. ग्रामीण रुग्णालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी कर्मचारी यांनी तातडीने जखमी रुग्णांवर उपचार सुरू केले. अंजनगाव आकोट या राष्ट्रीय महामार्गावर भंडारज जवळ नेहमी अपघात होत असून , ह्या ठिकाणी या मार्गाची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पाहणी होणे गरजेचे आहे.

# मनपा जनसंवाद बैठकीत राडा!

## २६२ तक्रारींपैकी १०८ तक्रारींचे जागेवरच निराकरण



> नगरपालिका मुख्यालयातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात जनसंवाद कार्यक्रम सुरू असताना, प्रभाग क्रमांक १ मधील एक तक्रारदार त्यांची तक्रार घेऊन आले. १. शेगाव रहाटगाव परिसरातील रहिवासी नगरसेवक चंदू खेडकर यांचा एका व्यक्तीशी जोरदार वाद झाला. वृत्तानुसार, तो व्यक्ती प्रभाग क्रमांक १ मधील जमिनीच्या प्रश्नाबद्दल तक्रार करण्यासाठी जनसंवाद कार्यक्रमात आला होता. तक्रारीला आक्षेप घेत नगरसेवक चंदू खेडकर यांनी सांगितले की ही जमीन सार्वजनिक जागा आहे आणि संबंधित व्यक्ती त्यात अनावश्यकपणे हस्तक्षेप करत आहे. याच मुद्द्यावरून नगरसेवक चंदू खेडकर आणि तक्रारदार यांच्यात जोरदार वाद झाला.

**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**अमरावती,दि.२४ :** शहरातील विविध विभागांमध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने आज महानगरपालिका मुख्यालयात जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन केले. शहरातील विविध भागात राहणाऱ्या नागरिकांकडून २६२ तक्रारी प्राप्त झाल्या, त्यापैकी १०८ तक्रारींचे जागेवरच निराकरण करण्यात आले. उर्वरित १५४ पैकी गृहकराशी संबंधित १०९ तक्रारींचे महापालिका अधिकारी आणि अधिकाऱ्यांनी सुनावणी घेतली. उर्वरित तक्रारी पुढील शुक्रवारी ऐकण्याचा निर्णय घेण्यात आला.

तुम्हाला कळवूया की, आज सकाळी १०.३० वाजता महानगरपालिकेच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या जनसंवाद कार्यक्रमाच्या तयारीचा एक भाग म्हणून महानगरपालिका प्रशासनाने महानगरपालिका मुख्यालयाच्या तळमजल्यावर विभागवार टेबल आणि स्टॉल लावले होते. नागरिकांकडून आलेल्या तक्रारी, ज्या लवकर सोडवणे आवश्यक होते, त्या जागेवरच सोडवण्यात आल्या. त्यामुळे एकूण २६२ पैकी १०८ तक्रारी लवकर सोडवण्यात आल्या. मिळालेल्या माहितीनुसार, आज प्राप्त झालेल्या तक्रारींमध्ये स्वच्छता, वीजपुरवठा, घरे, मालमत्ता कर, विहिरींची स्वच्छता यासारख्या तक्रारी होत्या. त्यापैकी सुमारे १०९ तक्रारी मालमत्ता कराशी संबंधित होत्या. पीआर कार्ड, अतिक्रमणे, रस्ते आणि गटार, पथदिवे आणि उन्हाळी हवामान. या जनसंपर्क मोहिमेत महापौर श्रीचंद तेजवानी, उपमहापौर सचिन भेंडे, महापालिका आयुक्त सौम्या शर्मा-चांडक, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक आणि महेश देशमुख, नगरसेवक अविनाश मार्डीकर, मंगेश मनोहरे, चंदू खेडकर, अर्चना पाटील, आशिष अतकरे, उपायुक्त योगेश पिठे आणि नरेंद्र वानखडे, सहाय्यक आयुक्त भूषण पुसटकर, नंदकिशोर तिखिले, गणेश शिंदे आणि अजय बोबडे यांच्यासह अनेक अधिकारी आणि नगरसेवक उपस्थित होते. विविध प्रभागातील नगरसेवकांनीही सार्वजनिक समस्यांच्या सुनावणी आणि निराकरणादरम्यान मौल्यवान सूचना दिल्या.

# नक्षली हल्ल्यात कोब्रा कमांडो गंभीर जखमी

## दिल्लीच्या एम्समध्ये यशस्वी शस्त्रक्रिया | धामणगावच्या झाडा गावातील रहिवासी सैनिकाची शौर्य गाथा

**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, दि.२४ :** तालुक्यातील झाडा येथील सुपुत्र व भारतीय सैन्य दलातील कोब्रा कमांडो दिनेश गणेशराव राऊत हे झारखंड राज्यातील चाईबासा जंगल परिसरात नक्षलविरोधी सर्च ऑपरेशनदरम्यान झालेल्या भुसुरुंग स्फोटात गंभीर जखमी झाले आहेत. नक्षलवाद्यांनी पेरलेल्या भुसुरुंगाचा अचानक झालेला स्फोट इतका भीषण होता की, या घटनेत दिनेश राऊत यांचा डावा पाय छिन्नविछिन्न झाल्याने वैद्यकीय अधिकाऱ्यांना त्यांचा पाय काढावा लागला.





घटनेच्या वेळी परिस्थिती अत्यंत बिकट असतानाही, रक्ताच्या थारोळ्यात असूनसुद्धा दिनेश राऊत यांनी घटनास्थळी प्रसंगावधान दाखवून अदम्य धैर्य व साहस दाखवले. स्वत:च्या जखमेची पर्वा न करता त्यांनी प्रथम आपल्या सहकारी जवानांना सुरक्षित स्थळी हलवले. त्यांच्या या धाडसी कृतीमुळे मोठी जीवितहानी टळली असून, सहकाऱ्यांचे प्राण वाचले. स्फोटानंतर तात्काळ वरिष्ठ अधिकाऱ्यांनी परिस्थितीचा आढावा घेत प्रथम राची येथील रुग्णालयात दाखल केले.



पायात बारुद इन्फेक्शन झाल्याने त्यांना एअर-लिफ्टद्वारे दिल्ली येथे हलवले. दिल्लीतील एम्स रुग्णालयात त्यांच्यावर तातडीने शस्त्रक्रिया करण्यात आली. वैद्यकीय तज्ज्ञांच्या पथकाने मोठ्या प्रयत्नाने शस्त्रक्रिया यशस्वी केली असून, जखमी पाय कापावा लागला असला तरी सध्या त्यांची प्रकृती स्थिर व धोक्याबाहेर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. दिनेश राऊत यांच्या शौर्यपूर्ण कामगिरीची माहिती गावात समजताच झाडा व धामणगाव रेल्वे परिसरात अभिमान आणि भावना दाटून आल्या आहेत.

राऊत कुटुंबाच्या या वीर सुपुत्राने देशसेवेचे व्रत जपताना दाखवलेल्या जिद्दीला सर्वत्र सलाम केला जात आहे. ग्रामस्थ, नातेवाईक तसेच विविध सामाजिक संघटनांकडून त्यांच्या लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना केली जात असून, त्यांच्या धैर्याची आणि त्यागाची चर्चा असून त्यांचे संपूर्ण परिसरात कौतुक होत आहे.

# दोन तासांत मोबाईल चोरट्यांना अटक

## रेल्वे पोलिसांची जलद कारवाई

**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**बडनेरा,दि.२४ :** लोहमार्ग पोलीस ठाणे, बडनेरा येथे दाखल झालेला मोबाईल चोरीचा गुन्हा अवघ्या दोन तासांत उघडकीस आणत पोलिसांनी आरोपीस अटक करून मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणी फिर्यादी रितेश ओमप्रकाश विश्वकर्मा (वय २०, व्यवसाय, शिक्षण, रा. सिलिकॉन सिटी, इंदोर, मध्य प्रदेश) यांनी दिलेल्या तक्रारीवरून अपराध क्रमांक १७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.गुन्ह्याच्या तपासासाठी पोलीस शिपाई क्रमांक ९७७ शरद जुनघरे यांना स्टेशन परिसरात





तपासासाठी पाठविण्यात आले. दरम्यान, आरपीएफ अमरावती येथे सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, बुकिंग ऑफिस परिसरात एक संशयित इसम संशयास्पद हालचाली करताना आढळून आला. त्यानंतर सदर इसमास ताब्यात घेऊन अधिक चौकशीसाठी लोहमार्ग पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले.चौकशीत आरोपीने आपले नाव पवन सुरेश चुलपार (वय २८, व्यवसाय- मजुरी, रा. परसापूर, ता. अचलपूर, जि. अमरावती) असल्याचे सांगितले. अंगझडती दरम्यान त्याच्याकडून आकाशी रंगाचा विवो कंपनीचा मोबाईल, जिओ सिम क्रमांक ९१७१५८७२४९, आयएमइआय क्रमांक ८६५२२५०६४७०२१३४, अंदाजे किंमत २० हजार रुपये, असा मुद्देमाल मिळून आला.मोबाईलबाबत कोणतीही कागदपत्रे सादर न करता आल्याने अधिक विचारपूस केली असता, सदर मोबाईल अमरावती रेल्वे स्टेशनच्या वेटिंग रूममध्ये झोपलेल्या एका प्रवाशाचा चोरी केल्याची कबुली आरोपीने दिली.



**अपेक्षा** चार वर्षांपासून मिळाली नाही प्रतिनिधीत्वाची संधी

# जिल्हा परिषदेची निवडणूक होईस्तोवर डीपीसी सदस्यांची निवड वेटिंगवर !

**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**अमरावती, दि.२४ :** स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका डिसेंबर व जानेवारी महिन्यात आटोपल्या आहेत. मात्र, जिल्हा परिषद व १४ पंचायत समित्यांच्या निवडणुका चार वर्षांपासून झालेल्या नाहीत. परिणामी जिल्हा नियोजन समितीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेतून प्रतिनिधीत्व करणाऱ्या समिती सदस्याची निवडूनही जिल्हा परिषदेच्या निवडणुकीअभावी सध्या तरी वेटिंगवरच राहणार आहे.

डीपीसीत जिल्हा परिषदेच्या ५९ सदस्यांमधून जवळपास १७ सदस्य निवडले जातात, तर महापालिकेतून २, जिल्ह्यातील दहा नगर परिषदांच्या एकूण सदस्यांमधून २ आणि चार नगरपंचायतींच्या नगरसेवकांमधून १ अशा प्रकारे २२ जणांची निवड केली जाते. अशातच जिल्ह्यातील १० नगर परिषदा, दोन





नगरपंचायती आणि महानगरपालिका या तीनही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या. आणि सत्ताही स्थापन झालेली आहे. मात्र, अमरावती जिल्हा परिषदेची सार्वत्रिक निवडणूक केव्हा होणार याबाबतही अनिश्चिता आहे. परिणामी तीन स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासक राजवट संपुष्टात आली असली, तरी जिल्हा परिषदेतील प्रशासक राजवट कायम आहे. जिल्हा परिषदेची निवडणूक झालेली नसल्यामुळे सभागृह अस्तित्वात आले नाही.

परिणामी या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमधून प्रतिनिधीत्व करणाऱ्या सदस्यांची निवडणूक जिल्हा परिषदेच्या निवडणुकीअभावी बारगळली आहे. त्यामुळे जिल्हा नियोजन समितीच्या सदस्य पदासाठी झेडपी निवडणूक होईपर्यंत वेटिंगवरच राहावे लागेल. डीपीसीत जिल्हा परिषदेतून १७, महापालिका २, नगरपालिका २ आणि नगरपंचायतीमधून १ असे जवळपास २२ सदस्य प्रत्यक्ष निवडणुकीतून निवडले जातात. डीपीसीचे अध्यक्ष म्हणून पालकमंत्री, सदस्य सचिव म्हणून जिल्हाधिकारी यांना अधिकार देण्यात आले. विशेष निमंत्रित म्हणून खासदार, आमदार, तर अशासकीय सदस्य म्हणून पालकमंत्री यांनी शिफारस केलेले व नियोजन समितीचे ज्ञान असलेले असे ८ ते १० सदस्य असतात. सभागृहात या सर्व सभासदांना विविध विकासकामांवर, खर्च झालेल्या निधीवर चर्चा करता येते, सूचना करता येतात. मात्र, एखाद्या निर्णयावेळी मतदान करता येत नाही. मतदान करण्याचा अधिकार हा फक्त निवडून आलेल्या सदस्यांनाच आहे.

> **सदस्यांना चर्चेचा अधिकार**
>
> नियोजन समितीवर निवडून आलेले २२ सदस्य असतात, तर आमदार, खासदार हे निमंत्रित सदस्य असतात. सभागृहात सदस्य म्हणून प्रत्येकाला चर्चा करण्याचा अधिकार आहे. मात्र, निर्णायक वेळी वा एखाद्या कामास मंजुरी देताना मतदान करण्याची वेळ आली तर फक्त जिल्हा परिषद, महापालिका व नगरपालिका सदस्यांनाच मतदान करण्याचा अधिकार आहे. समसमान मते झाल्यास समिती अध्यक्षांचे मत जिकडे असेल, तो निर्णय मंजूर होतो.

# आज जिल्हा कचेरीवर शिक्षक व पालकांचा मोर्चा

**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**अमरावती,दि.२४ :** शिक्षण हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांच्या घरापासून १ किलोमीटरच्या आत प्राथमिक शाळा, ३ किलोमीटरच्या आत उच्च प्राथमिक शाळा व ५ किलोमीटरच्या आत माध्यमिक शाळा असणे बंधनकारक आहे. तरीसुद्धा हा कायदा मोडून आजचे सरकार २० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळा बंद करीत आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या नावाखाली गावातील शाळा बंद पाडण्यासाठी शाळा संकुल ही नवी रचना सरकार समोर आणत आहे. ज्यामध्ये विद्यार्थ्यांच्या घरापासून शाळा ३० किलोमीटर पर्यंत दूर फेकली जाईल. शाळा संकुलामुळे अवघ्या ५ वर्षात देशातील ८ लाख ५० हजार विद्यार्थ्यांचे प्राथमिक शिक्षण बंद झाले. महाराष्ट्रातील ३०,७५४ विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद झाले. ज्यामध्ये १५३५७ मुलींचा समावेश आहे. यामुळे असंख्य शिक्षक अतिरिक्त ठरत आहेत.

महाराष्ट्रात जवळपास १८,००० शाळा बंद होत आहेत. अमरावती जिल्ह्यातील १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या २२५ शाळांचा यामध्ये समावेश आहे. व या बंद होणाऱ्या सर्व शाळा ग्रामीण दुर्गम भागातील आदिवासी व बहुजन लोक राहत असलेल्या गावातील आहे. आणि अमरावती जिल्ह्यातील २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांची यादी अमरावती जिल्ह्याचे शिक्षण अधिकारी यांना मागितली असता त्यांनी पूर्णपणे ही माहिती देण्यास नकार दिलेला आहे. दुसरीकडे, खाजगी शाळांची संख्या वाढवून तिथे भरमसाठ फी आकारली जात आहे. त्यामुळे गरीब विद्यार्थ्यांचे शिक्षण यापुढे अशक्य होईल.

भारतातील प्रत्येक राज्याला स्वत:चे शिक्षण धोरण आखण्याचे, नियंत्रण व संचालन करण्याचे अधिकार संविधानाच्या २४६ कलम व सूची ७ प्रमाणे दिले आहेत.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, बुधवार, २५ फेब्रुवारी २०२६



## थोडक्यात

### गोवंशाची वाहतूक करणारे वाहन उलटले

चांदूर बाजार : कत्तलीच्या उद्देशाने गोवंशांची अवैध वाहतूक करणारे बोलेरो पिकअप वाहन (एमएच ३० -एएफ ८६५६) मोर्शी ते चांदूर बाजार मार्गावरील गोविंद प्रभू मंदिराजवळ पलटी झाले. त्यातील अकरापैकी ८ जनावरे दगावली, तर तीन बचावली. चांदूर बाजार पोलिसांनी वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### मुलाची वडिलांना मारहाण

परतवाडा : वृद्ध दाम्पत्याने मुलाला दवाखाना व घरखर्चासाठी ५ हजार रुपये मागीतले. मुलाने पैसे देण्याऐवजी वडिलांना पलंगावरून धक्का देत शिवीगाळ केली. त्यात वडील सुरेश राजेरामजी इंगळे (७७) यांच्या पायाला दुखापत झाली. त्यांच्या तक्रारीवरून परतवाडा पोलिसांनी मुलगा संजय सुरेश इंगळे (४६) याच्यावर गुन्हा नोंदवला. ही घटना परतवाडा शहरात घडली. या घटनेचा पुढील तपास परतवाडा पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहे.

### आनंदवाडी शेतशिवारातून केबल लंपास

तिवसा : आनंदवाडी शिवारात अज्ञाताने दोन शेतकऱ्यांच्या शेतातून विहिरीवरील पंपाचा अंदाजे ६०० फुट केबल चोरून नेला. त्याचीअंदाजे किंमत १८ हजार रुपये आहे. प्रशांत नरेंद्र साबळे (३८, रा. आनंदवाडी) यांनी तिवसा पोलिसात तक्रार दिली. अज्ञात केबल चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

### विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ

तिवसा : गेल्या वर्षी लग्न झालेल्या विवाहितेचा सासरच्यांकडून शारीरिक व मानसिक छळ करण्यात येतो. या प्रकरणी २० वर्षीय विवाहितेने तिवसा पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी तुषार दिलीपराव अवजारे (३२), दिलीप पंजाबराव अवजारे (५४), मंगेश अशोक अडणे (३३) व दोन महिला, सर्व रा. नेरपिंगळाई यांच्यावर गुन्हा नोंदवला.

### वाठोडा येथून लोडिंग वाहनाची चोरी

वरूड : तालुक्यातील वाठोडा येथे उभे टाटा एस लोडींग चारचाकी वाहन (एमएच ०३-एएच ९२८७) व त्यातील चार एलईडी फोकस असे एकूण २ लाख १० हजारांचे साहित्य चोरून नेले. देवांशु अशोक कुमरे (२३) याच्या तक्रारीवरून वरुड पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### बैलगाडीला दुचाकीची धडक; युवक ठार

वरुड : भरधाव दुचाकी (एमएच २७-बी ०५७०) मागून बैलबंडीला धडकली. त्यात दुचाकी चालक शुभम राजेंद्र लोखंडे (२४, रा. आलोडा) याचा मृत्यू झाला. ही घटना जरुड ते पेठमांगरूळी मार्गावर घडली. वरुड पोलिसांनी मृतकाविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### ट्रॅक्टरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

धामणगाव रेल्वे : भरधाव ट्रॅक्टरने (एमएच २७-डीयू ४९१८) दुचाकीला (एमएच २७-एएक्स ७४७१) धडक दिली. त्यात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. ही घटना सुलतानपूर ते बोरी मार्गावर घडली. तळेगाव दशासर पोलिसांनी ट्रॅक्टर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### पाण्याच्या वादातून मारहाण

अमरावती : खारतळेगाव येथील बसस्टॉप परिसरात असलेल्या हापशीवर युवक त्याला कारण नसताना मारहाण केली. राजेश अशोकराव स्वर्गे (३५, रा. खारतळेगाव) याच्या तक्रारीवरून वलगाव पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा नोंदवला.

# दर्यापूरमध्ये ४९ ग्रामपंचायतींवर विद्यमान सरपंचच प्रशासक

## ३२ वर्षानंतर दुर्मीळ निर्णय, निवडणूक पुढे, कारभार सुरूच

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दर्यापूर, दि.२४ :** तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारात एक महत्वाचा आणि दुर्मिळ निर्णय समोर आला आहे. राज्य शासनाच्या निर्देशानुसार तालुक्यातील तब्बल ४९ ग्रामपंचायतीच्या विद्यमान सरपंचांनाच ग्रामपंचायत निवडणुका होईपर्यंत प्रशासक म्हणून काम पाहण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. विशेष बाब म्हणजे, जवळपास ३२ वर्षानंतर विद्यमान पुन्हा एकदा अशीच व्यवस्था लागू होत असून, त्यामुळे ग्रामीण प्रशासनात सातत्य राहणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

ग्रामपंचायतीच्या कार्यकाळाची मुचत सहसा संपल्यानंतर शासनाकडून स्वतंत्र प्रशासकांची नियुक्ती केली जाते. मात्र यावेळी निवडणूक प्रक्रिया विविध कारणांमुळे लांबणीवर पडत असल्याने शासनाने वेगळा निर्णय घेतला आहे. ग्रामस्थांच्या दृष्टीने अत्यत महत्त्वाच्या असलेल्या



पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता,

वीज, आरोग्य व इतर मूलभूत सुविधा या कामावर कोणताही परिणाम होऊ नये, यासाठी विद्यमान सरपंचानाच प्रशासक पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. माहितीनुसार, यापूर्वी २६ सप्टेंबर १९१४ ते ७ मे १९९५ या कालावधीत दर्यापूर तालुक्यात अशाच प्रकारे सरपंचांकडे प्रशासकपदाचा कार्यभार सोपवण्यात आला होता. त्यानंतर तब्बल तीन दशकांहून अधिक काळ लोटल्यानतर आता पुन्हा एकदा तीच परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे हा निर्णय राजकीय व प्रशासकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे. ग्रामपंचायत निवडणुका लांबणीवर जाण्यामागे अनेक तांत्रिक आणि प्रशासकीय कारणे आहेत ५ मे रोजी अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध होणार असून, त्यानंतर आरक्षण निश्चिती आणि मतदार याद्याचे अद्ययावतीकरण हा मोठा कार्यक्रम राबवावा लागणार आहे. यासाठी आवश्यक असलेला कालावधी आणि त्यानंतर सुरू होणारा पावसाळा, या दोन्ही बाबी लक्षात घेता जून ते सप्टेंबर या कालावधीत प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया राबविणे अवघड ठरणार आहे.

दर्यापूर तालुक्यात ४९ ग्रामपंचायतींवर हा निर्णय लागू होत असून, जिल्ह्यातील इतर तालुक्यांच्या तुलनेत ही संख्या सर्वाधिक आहे. अंजनगाव सुर्जी, भातकुली आणि अमरावती तालुक्यांमध्येही अशाच प्रकारचे निर्णय झाले असले, तरी दर्यापूरमध्ये सर्वाधिक ग्रामपंचायतींचा समावेश असल्याने संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष या तालुक्याकडे केंद्रित झाले आहे. एकूणच ३२ वर्षांनंतर पुन्हा आलेल्या या अनोख्या निर्णयामुळे दर्यापूर तालुक्यातील ग्रामीण प्रशासनात सातत्य राखले जाणार असून, आगामी निवडणुकांपर्यंत ग्रामपंचायतींचा कारभार विद्यमान नेतृत्वाखालीच सुरू राहणार आहे. आता दिवाळीच्या सुमारास होणाऱ्या निवडणुकांकडे ग्रामस्थांसह राजकीय वर्तुळाचेही लक्ष लागले आहे.

त्यामुळे आता या ग्रामपंचायतीच्या निवडणुका थेट दिवाळीच्या आसपास होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या निर्णयामुळे विद्यमान सरपंचांना मोठा दिलासा मिळाला असून, ग्रामपंचायतींवरील प्रशासकीय नियंत्रण स्थानिक पातळीवरच राहणार आहे. बाह्य प्रशासक नेमण्यात आल्यास विकासकामांना विलंब होण्याची शक्यता असते: मात्र सरपंचच प्रशासक म्हणून काम पाहणार असल्याने सुरु असलेली विकासकामे, मंजूर योजनांची अंमलबजावणी आणि दैनंदिन प्रशासकीय निर्णय अधिक सुरळीतपणे पार पडतील, असा विश्वास स्थानिक स्तरावर व्यक्त केला जात आहे.

# शिंदे शिवसेनेकडून राहुल गांधींचा निषेध

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, दि.२४ :** आपला भारत देश आज प्रगतीच्या वाटेवर आत्मविश्वासाने वाटचाल करत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, पायाभूत सुविधा अशा विविध क्षेत्रांत आपण उल्लेखनीय प्रगती केली. संपूर्ण जग आज भारताकडे एक प्रेरणा म्हणून बघत आहे. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकासाला गती देणारे अनेक महत्त्वाकांक्षी उपक्रम आणि प्रकल्प देशभर राबवले जात आहेत.



याच पार्श्वभूमीवर काल दिल्लीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या जगातील सर्वात मोठ्या एआय समिटमध्ये तब्बल १८० देशांतील प्रतिनिधी, जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज आणि उद्योगविश्वातील मान्यवर उपस्थित होते. याठिकाणी भारताच्या तांत्रिक प्रगतीचं दर्शन घडत असताना, काँग्रेसच्या काही कार्यकर्त्यांनी शर्ट काढून भारत-अमेरिका व्यापार कराराच्या विरोधात निदर्शने केली, तसेच पंतप्रधानांच्या विरोधात घोषणाबाजी करत काही काळ तणावाचं वातावरण निर्माण केलं. देशाच्या सन्मानाला आणि अशा प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांच्या गांभीर्याला धक्का पोहोचवणारी ही कृती निश्चितच खेदजनक होती. राहुल गांधी नेहमीच देशाच्या प्रगतीविरोधात सातत्याने देशांतर्गत आणि परदेशी मंचांवर वक्तव्य करत असतात. पण अशा मोठ्या आणि प्रतिष्ठित कार्यक्रमांमध्ये व्यत्यय आणून चुकीची कृत्य करायला लावणं अजिबात योग्य ठरत नाही.

राष्ट्रहित, कार्यक्रमाचं गांभीर्य आणि जागतिक स्तरावरील भारताची प्रतिमा यांचा विचार करणं ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. म्हणून पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि देशाच्या विरोधात करण्यात आलेल्या त्या निदर्शनांचा आज आम्ही जोडे मारो आंदोलनातून ठाम निषेध केला. मतभेद असू शकतात, पण देशाच्या सन्मानापेक्षा कोणतीही भूमिका मोठी असू शकत नाही. तसेच त्याचबरोबर राहुल गांधी हायहाय, या पप्पूचे कारायचे काय ? - खाली डोके वर पाय, राहुल गांधी मुर्दाबाद अशा घोषणा देत राहुल गांधीं विरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. यावेळी शिंदे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख आशिष धर्माळे, सह संपर्कप्रमुख शाम देशमुख जिल्हाप्रमुख संतोष बद्रे, ललित झंझाड ,आशिष दारोकार , दिलीप ठाकरे, अमोल वारगडे, अजय महल्ले, सुनील राऊत, कार्तिक गजभिये, विवेक पवार सह सर्व पदाधिकारी,कार्यकर्ते, युवासैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांचे डीजिटीलायझेशन करण्यास कार्ड संस्था मदत करेल - विजय लाडोळे

## कार्ड संस्थेनी २०२५-२६ च्या कार्याचा संक्षिप्त गोषवारा सादर केला

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, दि.२४ :** कार्ड संस्था ही मूलत: कृषी शास्त्रज्ञांनी एकत्र येऊन स्थापन केली असून या संस्थेची स्थापना १९९५ साली करण्यात आली संस्थेचा मूळ उद्देश ग्रामीण व आदिवासी यांचा एकात्मिक शाश्वत विकास करणे हा आहे. या संस्थेला महाराष्ट्र शासनातर्फे कृषी भूषण २०११ व कृषीरत्न २०२१ ला पुरस्कारा प्राप्त झाले आहे. ही संस्था कार्बन क्रेडिट, सोयाबीन प्रमाणीकरण,भूजल पुनर्भरण, पिकाचे मूल्य साखळी संवर्धन, सारख्या विषयावर सध्या काम करत असून

कार्बन क्रेडिट म्हणजे कॉटन गुरू संस्थेच्या सहकार्याने पर्हाटी च्या अवशेषापासून बायोचार ची निर्मिती करणे या बायोचार च्या वापरामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील कर्बाचे प्रमाण वाढविणे पिकाची उत्पादकता वाढविणे तसेच देशाला कार्बन क्रेडिट मिळवून द्यायचे कार्य कार्ड संस्था करीत असल्याचे विजय लाडोळे अध्यक्ष कार्ड संस्था अंजनगाव सुर्जी यांनी पत्रकार परिषद मध्ये सांगून ते पुढे म्हणाले सोयाबीन प्रमाणीकरण करणे यामध्ये मराठी उद्योजकांनी निर्माण केलेल्या सोयाबीन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनी करीता सोयाबीनचे प्रमाणीकरण करणे हे प्रमाणीकरण केलेल्या सोयाबीनवर



प्रक्रिया करून त्यातून प्रोटीन मिळवून त्याचा वापर देशाला परकीय चलन मिळून देणे यामध्ये सुद्धा भरीव मदत कार्ड संस्था करीत आहे हे करीत असताना शेतकऱ्यांचे डिजिटी लायझेशन करण्यास संस्था मदत करीत असल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

भूजल पुनर्भरण करण्या करीता श्री श्री रविशंकरजी यांच्या मदतीतून संस्थेला लेमकेन नावाच्या कंपनीचे सब सॉयलर,मल्चर व पल्टीनांगर मिळालेले आहे त्याचा उपयोग करून संस्थेने शहानुर,खाई नाला, वाण व भुलेश्वरी या नदी पात्रामध्ये दोन ते अडीच फूट खोल नांगरटी केली तसेच शेतकऱ्यांच्या शेतामध्ये सुद्धा तशा प्रकारची उतारास आडवी खोल सरी पाडून पावसाच्या पाण्याच्या अवधास अडथळा निर्माण करून पाणी जमिनीत मुरविले त्यामुळे त्या शेतात बोर व विहिरीच्या पाण्याची पातळी वाढली तसेच हे काम चिखलदऱ्यातील व धारणी तालुक्यातील अवर्षणग्रस्त गावातील गाव तलावमध्ये करण्यात आले जेणेकरून तेथे पाण्याची पातळी वाढेल.

पिकाचे मूल्य साखळी संवर्धन या मध्ये संस्थेने शासनाच्या सहकाऱ्यांनी खारपान पट्टयातील हरभरा व पिंपळी या पिका करिता भौगोलिक चिन्हांकन प्राप्त करून दिले त्याकरिता अनुक्रमी वैपुल्य रेनफेड शेतकरी उत्पादक कंपनी व नागार्जुन औषध वनस्पती कंपनी यांचे सहकार्य मिळविले तसेच या पिकाची गुणवत्ता वाढवून व आवश्यक प्रक्रिया करून त्याचे मूल्य संवर्धन करण्याचे काम कार्ड संस्था करीत असल्याचे विजय लाडोळे यांनी पत्रकार परिषद मध्ये बोलताना सांगितले.

# कीर्तनातून ज्वलंत प्रश्नांवर प्रबोधन काळाची गरज

## ह.भ.प. संजय गजबे यांचे प्रतिपादन | संत लहरी बाबा पुण्यतिथी महोत्सव

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे,दि.२४ :** कीर्तनाच्या माध्यमातून समाजासमोरील ज्वलंत प्रश्नांवर थेट निर्भीडपणे प्रबोधन होणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय कीर्तनकार मांडवा ता. घांटजी येथील ह.भ.प. संजय गजबे महाराज यांनी केले.

तालुक्यातील जळगांव आर्वी येथे आयोजित संत लहरी बाबा पुण्यतिथी महोत्सवाच्या पहिल्या दिवशी रात्री कीर्तनातून मार्गदर्शन करताना ते बोलत होते. पारंपरिक कीर्तनशैली जपत दारूबंदी, शालेय शिक्षण, महिलांचे स्वातंत्र्य, वृक्षलागवड, अंधश्रद्धा, विज्ञाननिष्ठा यांसारख्या महत्त्वाच्या सामाजिक विषयांवर प्रभावी भाष्य केले. दारू



ही केवळ व्यक्तीची नव्हे तर संपूर्ण कुटुंब आणि समाजाची समस्या निर्माण झाली आहे आपल्या डोळ्या समोर अनेक कुटुंब उध्वस्त होत असल्याचे आपल्याला पाहायला मिळते त्यामुळे दारू तंबाखू गुटखा या व्यसनापासून युवकांनी दूर राहावे असे आवाहनही त्यांनी केले, एक वेळी उपाशी राहिले तरी चालेल मात्र आपल्या मुलांना चांगल्या दर्जाचे शिक्षण देणे गरजेचे आहे शिक्षणातूनच ग्रामीण भागाचा विकास शक्य आहे, असे गजबे म्हणाले.

पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षलागवड ही फक्त घोषणा न राहता ती सामाजिक चळवळ बनावी, बालविवाह रोखले जावेत असे त्यांनी स्पष्ट करत संत गाडगे महाराज यांच्या पठडीतील कीर्तन प्रबोधन केले.सात दिवसयेथील संत लहरी बाबा पुण्यतिथी महोत्सवात विविध अध्यात्मिक कार्यक्रम आयोजित केले आहे.

# शहरात चौकातील घाण व भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करा

## भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष भूषण विल्हेकर यांची मागणी

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दर्यापूर, दि.२४ :** शहरातील मध्यभागी असलेले बनोसा येथील मुख्य बाजारपेठेतील प्रसिद्ध हरी सिनेमा टॉकीज चौक तेथे शौचालय नसल्यामुळे लोक उघड्यावरच लघुसंखा करतात लागतचबाजूनेच मुख्य बाजारपेठ हॉस्पिटल आजूबाजूंनी रहिवासी बँक असल्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्यांची वर्दळ जास्त प्रमाणात आहे त्यामुळे येथे झालेली घाण घाणीमुळे येजा करणाऱ्या नागरिकांना व महिला वर्गांना मान खाली करून जावे लागते. त्रास होत आहे येथील लोकांनी तोंडी स्वरूपात नगरपरिषद ला कळविले तरीही नगरपरिषद



याकडे दुर्लक्ष करीत आहे तरी येथील घाण तात्काळ स्वच्छ करण्यात यावी विशेष म्हणजे त्याच भागातून जास्त प्रमाणातून नगरपरिषदला उत्पन्न जास्त आहे तरी या भागाकडे नगरपरिषद दुर्लक्ष करीत आहे नगरपरिषदेने हरी टॉकीज चौकयेथे तात्पुरत्या स्वरूपात शौचालय बांधून द्यावे तसेच शहरातील गांधीनगर आठवडी बाजार शिवाजीनगर या भागातील भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी भाजपा युवामोर्चाचे मा.शहराध्यक्ष भूषण विल्हेकर यांनी केली आहे.

**सुविधा** प्रशासनावर ताण कमी, कारभारात सुलभतेसह नागरिकांना होईल सुविधा

# अमरावती ग्रामीणमध्ये यंदा अप्पर तहसील होणार!

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.२४ :** राज्यात ६९ तालुक्यांच्या मुख्यालयी अपर तहसील कार्यालयांची निर्मिती करण्यात येणार आहे. याबाबतच्या हालचाली शासनस्तरावर गतिमान झाल्या आहे. यामध्ये अमरावती विभागात १० ठिकाणी हे कार्यालये स्थापित होत असले, तरी अमरावती जिल्ह्यात मात्र अमरावती (ग्रामीण) हे एकमेव कार्यालय होणार आहे.

वाढता प्रशासकीय व्याप आणि महसूल कार्यालयांमधील गर्दी लक्षात घेता, प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान करण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. यामध्ये जिल्ह्यात अमरावती शहर व ग्रामीण अशी विभागणी होऊन ग्रामीणमध्ये अपर तहसील कार्यालय होणार आहे. मात्र, यासाठी आवश्यक पदांची निर्मिती अद्याप करण्यात



आलेली नाही. याबाबतच्या हालचाली शासनस्तरावर अतिशय गतिमान झाल्या आहेत. गतिमान प्रशासन व कारभारात सुलभता व नागरिकांना सुविधेसाठी तहसील मुख्यालयाची विभागणी आवश्यक आहे. आता प्रशासकीय कामकाजाचे विकेंद्रीकरण होणार असल्याने कामाचा ताणही कमी होईल. लवकरच या नव्या कार्यालयाचा कारभार सुरू होण्याची शक्यता आहे. यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांची शहरात येण्याची मोठी पायपीट थांबेल. मात्र हे कार्यालय कोणत्या गावात सुरू होणार याबाबत प्रशासनातच अनभिज्ञता दिसून आली.

अपर तहसील कार्यालय सुरू झाल्यास शेतकरी, विद्यार्थी आणि वयोवृद्धांना दाखले व जमिनीच्या कामांसाठी लागणारा वेळ वाचणार आहे.

सध्याच्या महसूल रचनेनुसार एकाच तहसील कार्यालयावर शहरासह ग्रामीण भागातील शेकडो गावांचा मोठा भार असतो. वाढती लोकसंख्या आणि शहरीकरणाचा वेग यामुळे तहसील कार्यालयांमध्ये दररोज शेतकरी, विद्यार्थ्यांसह नागरिकांची मोठी गर्दी राहते. सातबारा उतारे, फेरफार, विविध दाखले, जातीचे प्रमाणपत्र, उत्पन्नाच्या दाखल्यांसह दैनंदिन कामांसाठी नागरिकांना ताटकळत राहावे लागते. यावर उपाय म्हणून नागरिकांना तत्पर सुविधा देण्यासाठी तहसील मुख्यालयाचे विकेंद्रीकरण होणार आहे. अमरावती तालुक्यातील अपर तहसीलचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाच्या महसूल विभागाने सुमारे वर्षभरापूर्वी शासनाला सादर केला होता. त्यानंतर आता हा विषय ऐरणीवर आला असल्याने चर्चेत आला आहे.

# खोलापूर येथे श्री संत गाडगेबाबा जयंती



अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**खोलापुर, दि.२४ :** स्थानिक दीप सार्वजनिक वाचनालय येथे स्वच्छतेचे संदेश देणारे कर्मयोगी श्री संत गाडगेबाबा यांची जयंती वाचनालयाचे माजी अध्यक्ष श्री मनोहर भटकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यावेळी उपस्थित संचालक व वाचनालयाचे कर्मचारी तसेच वाचक यांनी कर्मयोग श्री संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून सामूहिक अभिवादन केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी गाडगेबाबांच्या समाज कार्याला मनोगतातून उजाळा दिला. यावेळी वाचनालयाचे सचिव एड. दिनेश फीसके, संचालक,रघुनाथ पारडे, छोटू देशमुख , सौ स्मिता देशमुख, श्री भटकर, ग्रंथपाल दिलीप मुकवाने, कर्मचारी उमेश माकोडे, बहुसंख्येने वाचक वर्ग उपस्थित होते.

## घटना-घडामोडी



### परसोडा येथे अन्नपूर्णा बचत गटाचे झुणका भाकर केंद्र कार्यान्वित

झरी जामणी : ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने परसोडा येथे 'अन्नपूर्णा महिला बचत गटा'साठी झुणका भाकर केंद्राची सुरुवात करण्यात आली आहे. आर.सी.सी.पी.एल. मुकुटबन आणि विकासगंगा समाजसेवी संस्था, घाटंजी यांच्या संयुक्त विद्यमाने साकारलेल्या या उपक्रमामुळे महिलांच्या आत्मनिर्भरतेकडे भक्कम पाऊल पडले आहे. महिलांना स्थानिक पातळीवर रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी हा प्रकल्प राबविण्यात आला आहे. युनिट हेड जयंत कंडपाल यांच्या मार्गदर्शनाखाली आणि एच.आर. हेड जितेंद्र कुर्वे यांच्या नियोजनातून या केंद्राचे लोकार्पण करण्यात आले. या केंद्रामुळे बचत गटातील महिलांना घरबसल्या व्यवसायाची नवी दिशा मिळाली असून त्यांच्या कौटुंबिक उत्पन्नात भर पडणार आहे. कार्यक्रमाला एच.आर. हेड जितेंद्र कुर्वे, माईन हेड नरेंद्र गोला, सीएसआर मॅनेजर धर्मेंद्र पात्रा व विजय कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच विकासगंगा संस्थेचे प्रकल्प समन्वयक शेषराज कावडे व भावना वऱ्हाटे उपस्थित होते. मान्यवरांनी महिलांना उद्योजकतेचे महत्त्व पटवून दिले. आपल्या स्वप्नांना नवी दिशा मिळाल्याची भावना व्यक्त करत अन्नपूर्णा बचत गटाच्या सदस्यांनी यावेळी कंपनीचे आभार मानले. या उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.



### दिग्रस बाजार समितीमध्ये खासदार निधीतून सिमेंट रस्त्याचे भूमिपूजन

**दिग्रस :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या यार्डात खासदार निधीतून मंजूर ३० लाख रुपयांच्या सिमेंट काँक्रीट रस्त्याचे भूमिपूजन खासदार संजय देशमुख यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. या विकासकामामुळे बाजार समितीतील पायाभूत सुविधेत भर पडणार असून, शेतकऱ्यांना मालाची ने-आण करण्यासाठी मोठी सोय उपलब्ध होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा पंचशीला इंगोले होत्या. यावेळी खासदार संजय देशमुख यांनी "देश व्यापारीप्रधान झाला असून शेतकऱ्यांचा वाली कोणी राहिला नाही," असा घणाघात केला. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी 'फार्मर प्रोड्युसर कंपनी'च्या माध्यमातून प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी उबाठा सेनेचे जिल्हाप्रमुख प्रवीण शिंदे, बाजार समितीचे सभापती सतीश तायडे, उपसभापती प्रभाकर जाधव, माजी सभापती भारत देशमुख, शंकर जाधव आणि विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. बाजार समितीचे सचिव अभय गंगथडे यांनी प्रास्ताविक केले, तर सुदर्शन हसबे यांनी आभार मानले. या सोहळ्याला तालुक्यातील शेतकरी, व्यापारी आणि हमाल बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पांढरकवड्यात २९ बॅटरींची चोरी; ६७ हजारांचा मुद्देमाल लंपास

**पांढरकवडा :** बसस्थानक परिसरातील दोन दुकानांमधून अज्ञात चोरट्यांनी २९ बॅटरी चोरून नेल्याची घटना घडली. १० ते ११ फेब्रुवारीच्या दरम्यान चोरट्यांनी चंकी आडे यांच्या 'किरण बॅटरी' दुकानातून १८ आणि शेजारच्या दुकानातून ११ अशा एकूण २९ बॅटरी लंपास केल्या. या मालाची किंमत ६७ हजार ५०० रुपये असून, पांढरकवडा पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. गेल्या काही दिवसांपासून पांढरकवडा तालुक्यात चोरींच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. वाढत्या घटनांमध्ये पांढरकवडा शहरातील नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास कमी होत चालला आहे. त्यामुळे पोलिस प्रशासनाने रात्र गस्त वाढवून चोरट्यांना हुडकून काढण्याची गरज निर्माण झाली आहे.

# महागाव तालुक्याला अवकाळीचा तडाखा


## रब्बी पिके जमीनदोस्त, गहू, हरभरा आणि फळबागांचे अतोनात नुकसान; बळीराजा हतबल

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**महागाव, दि. २४ :** सोमवारी दुपारी अचानक वादळी वाऱ्यासह पाऊस झाला . महागाव तालुक्याला या पावसाने अक्षरशः झोडपून काढले. सुमारे एक तास पावसाने जोरदार धुमाकूळ घातला. गहू, हरभरा आणि फळबागांचे अतोनात नुकसान झाले. शेकडो एकरांवरील उभे पीक आता आडवे झाले . हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने अचानक हिरावून घेतला. शेतकरी पुन्हा एकदा मोठ्या आर्थिक संकटात सापडला. प्रशासनाने तातडीने पंचनामे करण्याची मागणी होत आहे.



सायंकाळी अचानक आकाशात काळे ढग दाटून आले. सोसाट्याच्या वाऱ्यासह विजांचा कडकडाट सुरू झाला. मुसळधार पावसाने शेतशिवारांना अक्षरशः झोडपून काढले. माळपठारावरील महागाव आणि आमणी परिसरात नुकसान झाले. पिंपरी, मुगाचा, वाकोडी येथेही फटका बसला. सवना आणि वाकान शिवारात पिके आडवी झाली. कोनदरी, बनोली गावांतील शेतकऱ्यांचे नुकसान झाले. गव्हाचे उभे पीक पूर्णपणे जमीनदोस्त झाले आहे. कापणीच्या टप्प्यात आलेले पीक मातीमोल झाले. शेतकऱ्यांच्या हातात आलेली सुगी वाया गेली आहे. कापणीला आलेल्या हरभऱ्यालाही मोठा फटका बसला . काही ठिकाणी हरभरा काढणी काम सुरू होते. पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. निवरंग आणि मलकापूर परिसरातही हानी झाली. आंबा व फळपिकांचा मोहोर गळून पडला. अवकाळी पावसाचा बागांवर विपरीत परिणाम झाला. वादळी वाऱ्यामुळे अनेक वृक्ष उन्मळून पडले. काही घरांवरील टिनपत्रे वाऱ्याने उडून गेली . ग्रामीण भागातील जनजीवन काही काळ विस्कळीत झाले. महसूल प्रशासनाकडून अद्याप पंचनामे झाले नाहीत. यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. यंदा बियाणे आणि खतांवर मोठा खर्च झाला. अवकाळीने शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावला आहे. शेतकरी आता कर्जबाजारी होण्याची भीती आहे. प्रशासनाने तातडीने नुकसानीचे पंचनामे पूर्ण करावेत. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर करावी. माजी जि.प. सदस्य साहेबराव पाटलांनी मागणी केली. शासनाने तातडीने मदतीचा हात पुढे करावा. शेतकरी सध्या मोठ्या मदतीच्या प्रतीक्षेत आहे.



### उमरखेडमध्ये रब्बी हंगाम उद्ध्वस्त

**उमरखेड तालुक्यालाही अवकाळी पावसाने जोरदार तडाखा दिला. पैनगंगा अभयारण्य परिसरातील पिकांचे प्रचंड नुकसान झाले. घमापूर, कुरळी आणि नारळी येथे हानी झाली. टाकळी आणि चिखली गावात पिके आडवी झाली. सुमारे पंच्याहत्तर टक्के नुकसान झाल्याचा अंदाज आहे. बेलखेड आणि मरसुळ परिसरातही पिके भिजली. गहू आणि हरभरा पिकांची गुणवत्ता आता घसरली. खरिपापाठोपाठ रब्बी हंगामही पूर्णपणे वाया गेला. प्रशासनाने तातडीने पाहणी करून मदत करावी.**

## दिपाली पिल्लेवार यांना 'आचार्य' पदवी प्रदान; आर्णीच्या कन्येचे यश

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**आर्णी, दि. २४ :** येथील सेवानिवृत्त शिक्षक दिलीप पिल्लेवार यांची कन्या दिपाली पिल्लेवार यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने 'प्राणीशास्त्र' विषयात पीएच.डी. (आचार्य पदवी) प्रदान करून सन्मानित केले आहे. दिपाली यांच्या या शैक्षणिक यशामुळे आर्णी शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

शहीद भगतसिंग विद्यालयाचे सेवानिवृत्त गणित शिक्षक दिलीप पिल्लेवार यांच्या कन्या दिपाली यांनी अत्यंत जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे.



त्यांनी अमरावती येथील विदर्भ महाविद्यालयाचे डॉ. संतोष पवार यांच्या मोलाच्या मार्गदर्शनाखाली आपला शोधप्रबंध पूर्ण केला. दिपाली यांनी आपल्या या यशाचे श्रेय स्वतःचा आत्मविश्वास, कुटुंबातील सदस्यांचे पाठबळ आणि गुरुजनांचे आशीर्वाद यांना दिले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जिद्द बाळगल्यास उच्च शिक्षणाची शिखरे पादाक्रांत करता येतात, हे दिपाली यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले आहे. त्यांच्या या गौरवपूर्ण कामगिरीमुळे पिल्लेवार कुटुंबासह आर्णी परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## रेमंड कामगारांच्या आंदोलनाला बळ

### खासदार संजय देशमुख यांचा पाठिंबा, प्रशासकीय हालचालींना वेग

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. २४ :** प्रलंबित मागण्यांसाठी आझाद मैदानात उपोषणास बसलेल्या रेमंड यूको डेनिम कंपनीच्या कामगारांच्या आंदोलनात आता लोकप्रतिनिधींनी उडी घेतली आहे. या भागाचे खासदार संजय देशमुख यांनी मंगळवारी (दि. २४) उपोषणस्थळी भेट देऊन कामगारांच्या पाठीशी उभे राहण्याची ग्वाही दिली. विशेष म्हणजे, या गंभीर विषयावर तोडगा काढण्यासाठी केंद्रीय आणि राज्य स्तरावरील कामगार मंत्र्यांशी चर्चा करण्यात आली असून, लवकरच सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे.

रेमंड यूको डेनिम प्रा. लि. च्या कामगारांनी पगारवाढ आणि इतर मागण्यांसाठी १८ फेब्रुवारीपासून बेमुदत




उपोषण सुरू केले आहे. उपोषणाच्या सातव्या दिवशी खासदारांनी कामगारांची विचारपूस केली. यावेळी बोलताना ते म्हणाले की, 'मी स्वतः दिल्लीत असताना देशाचे कामगार मंत्री मनसुख मांडविया यांची भेट घेऊन त्यांना कामगारांच्या व्यथा सांगितल्या आहेत. तसेच राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्याशीही संपर्क साधला असून, ते व्यवस्थापनाशी चर्चा करून लवकरच तोडगा काढण्याचा प्रयत्न करतील.' खासदारांनी जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षकांशी चर्चा करून उपोषणस्थळी रुग्णवाहिका आणि डॉक्टरांची तात्काळ सोय करण्याच्या सूचना दिल्या. 'कामगारांच्या मागण्या रास्त असून, आम्ही पक्षभेद विसरून या गरिबांना न्याय देण्यासाठी कटिबद्ध आहोत. जर कंपनी व्यवस्थापनाने दोन पावले मागे घेतली, तर आपणही सकारात्मक प्रतिसाद देऊ,' असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी कामगार प्रतिनिधींनी सांगितले की, गेल्या २२ महिन्यांपासून पगारवाढीचा प्रश्न प्रलंबित आहे. सध्या विकास जोमडे आणि संजय यादव या दोन कामगारांची प्रकृती खालावली असूनही ते उपचारास नकार देत आंदोलनावर ठाम आहेत. उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सर्व पदाधिकारी आणि स्थानिक नेते या आंदोलनाला पाठिंबा देत असून, पुढील एक-दोन दिवसांत यावर निर्णायक तोडगा निघण्याची चिन्हे दिसत आहेत.

## सहा वर्षीय अजफरीन फातेमाचा पहिला रोजा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**उमरखेड, दि. २४ :** पवित्र रमजान महिन्याच्या निमित्ताने उमरखेड येथील शिक्षक मोहम्मद अरिफोद्दीन यांची सहा वर्षांची कन्या अजफरीन फातेमा हिने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा अत्यंत उत्साहात आणि भक्तीभावाने पूर्ण केला आहे. एवढ्या लहान वयात दाखवलेली तिची धार्मिक ओढ आणि चिकाटी सध्या परिसरात चर्चेचा व कौतुकाचा विषय ठरली आहे.

रमजान हा मुस्लिम धर्मातील अत्यंत पवित्र महिना असून यात कडक उपवास पाळले जातात. अजफरीन फातेमाने पहाटेपासून सूर्यास्तापर्यंत अन्नाचा कणही न घेता आपला रोजा यशस्वीपणे पूर्ण केला.



उपवासासोबतच तिने कुटुंबासमवेत नमाज पठण करून धार्मिक नियमांचे पालन केले. रमजानमध्ये दानधर्म आणि इबादतला विशेष महत्त्व असते, हेच संस्कार अजफरीनने या वयात आपल्या कृतीतून जोपासले आहेत. चिमुकल्या अजफरीनच्या या धैर्याचे कौतुक करण्यासाठी नातेवाईक व मित्रपरिवाराने तिचे अभिनंदन केले आहे.

## चिखला येथील विटंबनेचा उमरखेडमध्ये तीव्र निषेध

### दोषींवर कठोर कारवाईसाठी सकल मराठा समाज आक्रमक

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**उमरखेड, दि. २४ :** बुलढाणा जिल्ह्यातील चिखला (ता. लोणार) येथे शिवजयंतीच्या दिवशी एका मराठा महिला भगिनीची भररस्त्यात झालेली विटंबना आणि मारहाणीच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या संतापजनक कृत्याचा निषेध नोंदवत, दोषींवर तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी आणि पीडित कुटुंबाला संरक्षण द्यावे, या मागणीसाठी उमरखेड येथे सकल मराठा समाजाच्या वतीने उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

चिखला गावात शिवजयंती उत्सवाच्या वादातून संजीवनी वाघ या महिलेला जमावाकडून बेदम मारहाण करण्यात आली. या हल्ल्यात



नराधमांनी महिलेचे कपडे फाडून तिची विटंबना केल्याचा घृणास्पद प्रकार घडला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात महिलेच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, या घटनेचा सर्व स्तरांतून निषेध होत आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन शासनाने विशेष तपास पथकाची (SIT) स्थापना करावी आणि वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली याचा जलद तपास करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. सकल मराठा समाजाने दिलेल्या निवेदनात प्रामुख्याने नमूद केले आहे की, ज्या नराधमांनी महिलेचे विनयभंग करून कपडे फाडले, त्यांच्यावर भारतीय न्याय संहितेच्या (BNS) कठोर कलमान्वये कारवाई व्हावी. तसेच, घटनेच्या वेळी उपस्थित असूनही बघ्याची भूमिका घेणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे तातडीने निलंबन करण्यात यावे. पीडित महिला आणि त्यांच्या कुटुंबाला उच्च दर्जाचे पोलीस संरक्षण पुरविणे काळाची गरज असल्याचेही यात म्हटले आहे. हे निवेदन उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांच्यामार्फत मुख्यमंत्री, गृहमंत्री, राज्य महिला आयोग आणि विभागीय आयुक्तांना पाठवण्यात आले. यावेळी सकल मराठा समाजाचे समन्वयक प्रमोद देशमुख, सुरेशराव कदम, वसंतराव देशमुख, अविनाश पाटील यादवकुळे, अभय पवार, अमोल पतंगराव, राहुल मोहितवार, गजानन देशमुख, गोपाल झाडे, संतोष चंद्रवंशी, ॲड. राजेश सुरोशे, बालाजी वानखेडे, रमेश चव्हाण आणि प्रकाश शिंदे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. जर प्रशासनाने यावर त्वरित ठोस पावले उचलली नाहीत, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

## रविकांत केराम ठरला 'टायगर पुसद श्री'चा मानकरी

### छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पुसदमध्ये शरीरसौष्ठव स्पर्धेचा थरार

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**पुसद, दि. २४ :** छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सवाच्या निमित्ताने टायगर ग्रुप पुसदच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय भव्य बॉडी बिल्डिंग स्पर्धा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या स्पर्धेत आपल्या उत्कृष्ट शरीरसौष्ठवाचे प्रदर्शन करत रविकांत केराम याने 'टायगर पुसद श्री' हा मानाचा किताब पटकावून क्रीडाप्रेमींची मने जिंकली आहेत.

पुसद येथे आयोजित या शरीरसौष्ठव स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे राज्यमंत्री तथा गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री ना. इंद्रनिलभाऊ नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रीय टायगर ग्रुपचे अध्यक्ष



पै. तानाजीभाऊ जाधव यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनातून युवकांना व्यायामाचे महत्त्व सांगत निरोगी शरीरयष्टी हीच खरी संपत्ती असल्याचे प्रतिपादन केले. या सोहळ्याला टायगर ग्रुपचे पदाधिकारी पै. उमेशभाऊ पोखरकर, सोनुभाऊ वाटमारे, यशभाऊ खराटे, नयनभाऊ लुंगे, बाळूभाऊ जाधव, ईश्वर साने आणि दीपक लामतुरे यांची उपस्थिती होती. तसेच पुसद नगर परिषदेचे पाणीपुरवठा सभापती राजूभाऊ सोळंके, बांधकाम सभापती अभिजित पानपाट्टे, शिक्षण सभापती विठ्ठल खडसे सर, सुधीरभाऊ राठोड, अमितभाऊ आडे, डॉ. रवींद्र वडते यांच्यासह विजयभाऊ जाधव, कौस्तुभभाऊ धुमाळे, नानाभाऊ बेले आणि धनंजयभाऊ सोनी यांनी मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून खेळाडूंचे मनोबल वाढवले. जिल्हाभरातून आलेल्या नामांकित शरीरसौष्ठवपटूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. रविकांत केराम याने कमालीची शिस्त आणि स्नायूंच्या सुबक प्रदर्शनामुळे परीक्षकांची पसंती मिळवत जेतेपदावर नाव कोरले. या उपक्रमातून युवा पिढीमध्ये आरोग्य, शिस्त आणि व्यायामाची आवड निर्माण होईल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला. स्पर्धेचे नेटके आणि यशस्वी आयोजन करण्यासाठी युवराज कांबळे, पै. विष्णू गुद्धटवार, बाळू ठाकूर, सागर चव्हाण, गोलू गायकवाड, विजय कोरडे, गजानन पाईकराव, सुनील पवार आणि ओंकार जोगदंड यांनी विशेष परिश्रम घेतले. परिसरातील हजारो क्रीडाप्रेमींनी या स्पर्धेचा आनंद घेत खेळाडूंना दाद दिली, ज्यामुळे संपूर्ण पुसद शहर क्रीडामय झाले होते.


## बाभुळगांव नगर पंचायत, बाभुळगांव.

जि. यवतमाळ - पिन ४४५१०१

दुरध्वनी क्रमांक:- ०७२०३ २७०२४१ ई मेल:- npbabhulgaon@gmail.com

क्रमांक./नपंबा/कर विभाग/ ६१ /२०२६ दिनांक :- २४/०२/२०२६

### जाहिरनामा

सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, खालील अर्जदारांनी बाभुळगांव नगर पंचायत क्षेत्रातील मालमत्तेचे घर/खाली जागा नोंदणी वा मालमत्ता हस्तांतरण करण्या करिता नगर पंचायत कार्यालयात खालील रकान्यात नमूद कागदपत्रासह अर्ज सादर केला आहे. तरी नगर पंचायत अभिदप्तरी नोंदणी करण्या करिता आक्षेप/हरकती सादर करावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिध्द झाल्या पासुन ७ दिवसाच्या आत आवश्यक त्या कागदपत्रासह नगर पंचायत कार्यालयामध्यें सादर करावे. विहीत मुदती नंतर आलेले आक्षेप विचारात घेतल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

| अ. क्र., | अर्जदाराचे नाव | मालमत्ता धारकाचे नाव | मालमत्तेचा तपशील | सादर केलेले दस्तऐवज |
|---|---|---|---|---|
| १. | आकाश विजय गुप्ता | अमन हनुमंत गावंडे (इतर) | क्षेत्र २१०.५८ चौ.मी. (plot no २३), | "खरेदी क्र. ९६२, दि. १८/०८/२०२२" |

**मुख्याधिकारी**
नगर पंचायत, बाभुळगांव

अजिंक्य भारत
आपलं यवतमाळ
बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६ www.ajinkyabharat.com



## महत्वाचे

### ६० हजारांची माती चोरीला

**यवतमाळ :** लोहारा येथील अतिरिक्त एमआयडीसी परिसरातील एका प्लॉटमधून ट्रॅक्टरने काळी माती चोरून नेल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ही घटना २० डिसेंबर २०२५ रोजी घडली असून, ५ फेब्रुवारी २०२६ रोजी लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादी तुकाराम थावरा जाधव (६७) यांचा प्लॉट क्र. बी-३९ या भागात आहे. आरोपी शंकर कोकाडे, किशोर धाबेकर आणि यशवंतराव शिंदे (सर्व रा. भोयर) यांनी संगनमत करून या प्लॉटमधून ट्रॅक्टरने (एमएच २९ एम ४५४३) सुमारे ६० ते ७० हजार रुपये किमतीची काळी माती चोरून नेली. याप्रकरणी पोलिसांनी तिघांविरुद्ध बीएनएस कलम ३०३(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

### महिलेला काठीने मारहाण

**वडगाव जंगल :** ग्रामपंचायत अधिकाऱ्यांमार्फत सुरू असलेल्या जागेच्या मोजणीदरम्यान महिलेला काठीने मारहाण करण्यात आली. ही घटना ४ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ४ वाजता घडली. फिर्यादी दुर्गा पांडुरंग घरत (५०) यांनी 'जाण्या-येण्यासाठी रस्ता राहणार की नाही' असे विचारले असता, आरोपी अमोल सुदाम अहिरकार व त्याच्या साथीदाराने त्यांना शिवीगाळ केली. दुर्गा यांनी 'मी अधिकाऱ्यांशी बोलत आहे' असे सांगताच आरोपीने संतापून लाकडी काठीने त्यांच्या उजव्या पायावर आणि हाताच्या कोपऱ्यावर मारून जखमी केले. वडगाव जंगल पोलिसांनी याप्रकरणी आरोपींविरुद्ध बीएनएस कलम ११८(१), ३५२, ३५१(२)(३) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

### वृद्धावर कोयत्याने हल्ला

**लाडखेड :** शेतातील कामाच्या वादातून एकाने ६० वर्षीय वृद्धाच्या मानेवर आणि चेहऱ्यावर कोयत्याने वार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. ही घटना महागाव कसबा येथे ५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९:३० वाजता घडली. फिर्यादी दीपक शेषराव लाड (४५) यांचे काका यशवंत आनंदराव लाड (६०) हे शेतात असताना आरोपी गोपाल पोपटराव गाठेकर (४१) याने कामावरून वाद घातला. रागाच्या भरात गोपालने यशवंत यांना ठार मारण्याच्या उद्देशाने कोयत्याने त्यांच्या मानेवर आणि चेहऱ्यावर वार करून गंभीर जखमी केले. लाडखेड पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध कलम १०९(१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे.

### कुटुंबाला काठीने मारहाण

**कळंब :** मोबाईलच्या कारणावरून झालेल्या वादात एका कुटुंबातील सदस्यांना काठीने बेदम मारहाण करण्यात आली. ही घटना २१ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १०:३० वाजता कळंब माथा येथे घडली. फिर्यादी सपना नितेश राठोड (२५) यांच्याशी आरोपी भुरशा काळे, संतोष चव्हाण, प्रफुल काळे आणि ईशाल काळे यांनी संगनमत करून वाद घातला. आरोपींनी सपना आणि त्यांच्या दिराच्या डोक्यावर, कानाजवळ व हातावर काठीने प्रहार करून त्यांना जखमी केले. "मोबाईल दिला नाही तर जीवे मारतो," अशी धमकीही त्यांनी दिली. याप्रकरणी कळंब पोलिसांनी चौघांविरुद्ध बीएनएस कलम ११८(१), ११५(२), ३५१(२) व ३५२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# माऊलींचे विचारच समाजाची खरी ताकद!

## पालकमंत्री संजय राठोड : धामणगाव देव येथे मुंगसाजी महाराजांना अभिवादन; पालखी सोहळ्यात घेतला उत्स्फूर्त सहभाग

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २४ :** "श्री मुंगसाजी महाराजांच्या विचारांत समाजाला एकत्र ठेवण्याची आणि आपली महान संस्कृती जपण्याची अलौकिक ताकद आहे," असे भावपूर्ण प्रतिपादन यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड यांनी केले. मंगळवारी (दि. २४) धामणगाव देव येथील श्री मुंगसाजी महाराज संस्थानला भेट देऊन पुण्यतिथीनिमित्त समाधीचे दर्शन घेतल्यानंतर ते बोलत होते. यावेळी त्यांनी पालखी सोहळ्यात प्रत्यक्ष सहभागी होऊन, टाळ-मृदंगाच्या गजरात माऊली चरणी नतमस्तक होत विनम्र अभिवादन केले.





श्री मुंगसाजी महाराजांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त संपूर्ण धामणगाव देव नगरी आज भक्तीच्या रंगात न्हाऊन निघाली होती. या पवित्र पर्वावर पालकमंत्री संजय राठोड यांनी श्री क्षेत्र धामणगाव देव येथे उपस्थित राहून भगवान श्री मुंगसाजी माऊलींच्या संजीवन समाधीचे मनोभावे दर्शन घेतले. मंदिर परिसरात मंत्रोच्चाराचा गजर आणि भक्तिमय वातावरणात त्यांनी विधिवत महाआरती केली. यावेळी उपस्थित जनसमुदायाच्या आणि भक्तांच्या डोळ्यांत माऊलींप्रती असलेली अपार श्रद्धा स्पष्ट दिसत होती. दर्शनानंतर आयोजित करण्यात आलेल्या भव्य पालखी सोहळ्यात पालकमंत्र्यांनी अत्यंत उत्साहाने सहभाग नोंदवला. पारंपरिक वेशभूषेत आणि फुलांनी सजवलेल्या पालखीचा मान स्वीकारत, त्यांनी काही अंतर पालखी खांद्यावर घेतली आणि सामान्य वारकऱ्याप्रमाणे पायी चालत आपली सेवा रुजू केली. ढोल-ताशांचा निनाद आणि 'मुंगसाजी माऊलीं'चा अखंड जयघोष यामुळे वातावरण पूर्णपणे भारावून गेले होते.

"सर्व भक्तांच्या जीवनात सुख, समृद्धी व शांती नांदो," अशी प्रार्थना ना. राठोड यांनी यावेळी माऊलींच्या चरणी केली. तत्पूर्वी, महोत्सवाचा भाग म्हणून आयोजित 'महाराष्ट्र गौरव गाथा' या सांस्कृतिक कार्यक्रमातही पालकमंत्री सहभागी झाले होते. शिवसृष्टी, लोककला आणि भक्तिगीतांच्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी पालकमंत्र्यांनी संस्थानच्या विश्वस्तांशी सविस्तर चर्चा केली. "तीर्थक्षेत्राचा विकास आणि भाविकांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनस्तरावर सर्वोतोपरी सहकार्य करण्यात येईल," अशी खंबीर ग्वाही त्यांनी यावेळी दिली. या सोहळ्याला उपविभागीय अधिकारी श्री. सूर्यवंशी, विविध विभागांचे अधिकारी, संस्थानचे अध्यक्ष, मुख्य पुजारी, जीवन पाटील, यशवंत पवार, मनोज सिंघी यांच्यासह हजारो भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संस्कृती आणि वारशाचा गौरव

**"मुंगसाजी महाराजांची शिकवण समाजासाठी दीपस्तंभाप्रमाणे आहे. अशा धार्मिक आणि सांस्कृतिक महोत्सवांमुळेच समाजात ऐक्य, श्रद्धा आणि संस्कारांची जपणूक होत असते," असे मत पालकमंत्री संजय राठोड यांनी व्यक्त केले. महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडवणाऱ्या कलाकारांचे त्यांनी विशेष कौतुक केले. भक्तिभावाने ओसंडून वाहणाऱ्या या सोहळ्यात माऊलींच्या विचारांचा जागर झाल्याचे समाधान यावेळी सर्वांच्या चेहऱ्यावर दिसत होते.**

# राहुल गांधींनी तात्काळ माफी मागावी

## काँग्रेस कार्यकर्त्यांच्या अभद्र वर्तनाबद्दल यवतमाळ भाजप महिला मोर्चाचा तीव्र निषेध

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २४ :** दिल्लीतील 'वैश्विक एआय इम्पॅक्ट समिट' परिषदेत काँग्रेस युथ कार्यकर्त्यांनी केलेल्या अर्धनग्न प्रदर्शनाचा भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा यवतमाळच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. राहुल गांधींच्या सांगण्यावरून आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची प्रतिमा मलीन करण्याचा हा प्रयत्न असल्याचे सांगत, महिला मोर्चाने या कृत्याचा निषेध नोंदविला. याप्रकरणी राहुल गांधींनी तात्काळ माफी मागावी, अशी आग्रही मागणी जिल्हाध्यक्ष शैला मिर्झापुरे यांनी आंदोलनादरम्यान केली.



भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाने माजी मंत्री मदन येरावार, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, जिल्हाध्यक्ष प्रफुल चौहान आणि प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन छेडले. दिल्लीत आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये काँग्रेस कार्यकर्त्यांनी केलेल्या वर्तनामुळे देशाच्या संस्कृतीला आणि संस्कारांना तडा गेल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. भारत देश हा संस्कृती आणि संस्कारांनी नटलेला असून, सध्या पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली देश प्रगतीचे पाऊल टाकत असताना अशा प्रकारचे अभद्र वर्तन करणे अत्यंत अशोभनीय आहे. जिल्हाध्यक्ष शैला मिर्झापुरे यांनी काँग्रेसवर टीका करताना सांगितले की, आंतरराष्ट्रीय परिषदेत जेव्हा भारत जगाला संदेश देत आहे, तेव्हा आपल्याच देशातील नेत्याने असे वर्तन करणे माणुसकीला काळीमा फासणारे आहे. काँग्रेस कार्यकर्त्यांच्या या कृत्यामुळे जागतिक स्तरावर देशाची बदनामी झाली आहे. जर राहुल गांधी आणि संबंधित कार्यकर्त्यांनी याप्रकरणी जाहीर माफी मागितली नाही, तर जिल्ह्यातील काँग्रेस नेत्यांच्या घरासमोर यापेक्षाही तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा मिर्झापुरे यांनी यावेळी दिला. या आंदोलनाप्रसंगी जिल्हा महामंत्री रेखा कोठेकर, प्रदेश सचिव माया शेरे, जिल्हा महामंत्री निर्मला विणकरे, जिल्हा महामंत्री जयमाला दरणे, जिल्हा महामंत्री माधुरी केवटे, जिल्हा महामंत्री अरुणा राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच मंगला पावडे, श्रद्धा चिंतावार, शारदा भुजाडे, निशा विघाते, रिता राठोड, वर्षा उल्हेवार, विद्या लाड आणि महिला मोर्चाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून काँग्रेसच्या धोरणांचा निषेध केला.

# जुन्या वादातून तरुणाचा खून

## कळंब तालुक्यात खळबळ, कुऱ्हाडीने सपासप वार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**कळंब, दि. २४ :** जुन्या वादातून आणि दाखल असलेली पोलीस केस मागे न घेतल्याच्या रागातून कळंब जवळील दोनोडा येथे एका ३३ वर्षीय तरुणाची कुऱ्हाडीने सपासप वार करून हत्या करण्यात आली. आशिष मारोती करलुके आणि मारोती करलुके यांनी दत्ता ऊर्फ अविनाश केशव चौधरी याचा खून केल्याने गावात प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे.




दोनोडा येथे मंगळवारी सकाळी ९:१५ वाजेच्या सुमारास ही रक्ताळलेली घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, मृतक दत्ता चौधरी आणि आरोपी आशिष करलुके यांच्यात २०२० पासून वाद सुरू होता. त्यावेळी आशिषने दत्तावर कुऱ्हाडीने हल्ला केला होता, ज्यामध्ये दत्ता गंभीर जखमी होऊन अपंग झाला होता. याप्रकरणी आशिषवर कलम ३०७ नुसार गुन्हा दाखल होता. आशिष सध्या पोलीस भरतीची तयारी करत असल्याने तो दत्तावर केस मागे घेण्यासाठी वारंवार दबाव टाकत होता. मात्र, दत्ताने त्याला नकार दिला होता. दिनांक २४ फेब्रुवारीच्या रात्री आरोपी मारोती करलुके आणि दत्ता यांच्यात पुन्हा बाचाबाची झाली. त्यानंतर मारोती यांनी मुलगा आशिषला तातडीने गावात बोलावून घेतले. सकाळी नऊच्या सुमारास आशिष गावात येताच, घराबाहेर पानठेल्यापाशी उभे असलेल्या दत्तावर बाप-लेकाने कुऱ्हाडीने भीषण हल्ला चढवला. या हल्ल्यात दत्ताचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर दोन्ही आरोपी फरार झाले असून, मृतकाचे वडील केशव चौधरी यांनी कळंब पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. ठाणेदार राजेश राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक फरार आरोपींचा शोध घेत असून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे.

# ११२ क्रमांकाचा गैरवापर करणाऱ्या तरुणावर गुन्हा दाखल

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**ढाणकी, दि. २४ :** आपत्कालीन सेवा क्रमांक ११२ वर खोटा कॉल करून पोलिसांची दिशाभूल करणाऱ्या करंजी येथील रघुनाथ दत्ता माणिकवाड या २८ वर्षीय तरुणावर बिटरगाव पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तातडीच्या मदतीसाठी असलेल्या या यंत्रणेचा जाणीवपूर्वक गैरवापर करून शासकीय साधनसामग्री आणि पोलिसांचा वेळ वाया घालवणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर पावले उचलली जातील, असा इशारा ठाणेदार पांडुरंग शिंदे यांनी दिला आहे. नागरिकांनी अशा आपत्कालीन क्रमांकाचा वापर केवळ खऱ्या संकटाच्या वेळीच करावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

बिटरगाव पोलीस स्टेशन हद्दीतील करंजी येथे २३ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ७.३२ वाजता रघुनाथ माणिकवाड याने ११२ कंट्रोल रूमला कॉल केला. आपल्याला ८ ते १० अनोळखी व्यक्तींनी मारहाण केल्याची खोटी माहिती त्याने दिली. घटनेचे गांभीर्य ओळखून ठाणेदार पांडुरंग शिंदे यांनी तात्काळ पोलीस पथक रवाना केले. यामध्ये पोलीस हवालदार रवी गिते, मोहन चाटे, अर्जुन राठोड, पोलीस कॉन्स्टेबल प्रवीण जाधव आणि शरद चव्हाण यांचा समावेश होता. पोलीस पथक घटनास्थळी पोहोचले असता, कॉलरने स्वतःचा मोबाईल बंद केला होता. गावात चौकशी केली असता मारहाणीचा कोणताही प्रकार घडला नसल्याचे निष्पन्न झाले. तपासाअंती हा कॉल केवळ पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी केल्याचे स्पष्ट झाले. या कृत्यामुळे पोलिसांचे मनुष्यबळ आणि वेळेचा अपव्यय झाल्याने प्रवीण जाधव यांच्या फिर्यादीवरून आरोपी रघुनाथ माणिकवाड विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २१७, २२१ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठाणेदार पांडुरंग शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल संतोष चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

# पुसदच्या चार ऊसतोड मजुरांचा अपघाती मृत्यू

## एकाच चितेवर अंत्यसंस्कार, पोटाची खळगी भरण्यासाठी परराज्यात गेलेल्यांवर काळाचा घाला

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**पुसद, दि. २४ :** पोटाची खळगी भरण्यासाठी कर्नाटक राज्यात ऊसतोडणीसाठी गेलेल्या पुसद तालुक्यातील गोपवाडी येथील तीन महिला मजूर आणि एका तीन वर्षीय चिमुकलीचा भीषण रस्ते अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. २२ फेब्रुवारी रोजी या चारही मृतांवर त्यांच्या मूळ गावी एकाच चितेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी संपूर्ण परिसरात उमटलेल्या गगनभेदी किंकाळ्या आणि नातेवाइकांच्या हंबरड्याने उपस्थितांची मने हेलावून गेली.



पुसद तालुक्यातील शेंबाळपिंपरी जवळील गोपवाडी या आदिवासी गावातील मजूर दुष्काळामुळे नोव्हेंबर महिन्यात रोजगारासाठी स्थलांतरित झाले होते. हे मजूर कर्नाटक राज्यातील सतीश शुगर साखर कारखाना, हुमचाळ येथे ऊसतोडणीचे काम करत होते. २० फेब्रुवारी रोजी काम आटोपून परतीच्या प्रवासाला निघाले असताना, बागलकोट जिल्ह्यातील जमखंडी नजीक ट्रॅक्टरवरील चालकाचा ताबा सुटल्याने दोन ट्रॉल्यांसह ट्रॅक्टर दरीत कोसळले. या भीषण अपघातात रेखा बोके, लक्ष्मी चिरमाडे, मनीषा पांडे आणि त्यांची तीन वर्षांची मुलगी हलकी पांडे यांचा जागीच मृत्यू झाला. पोलीस पंचनामा आणि शवविच्छेदनानंतर २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी या मृतांचे पार्थिव गोपवाडी येथे आणण्यात आले. सकाळी १० वाजता या चारही मृतांसाठी एकच मोठे सरण रचून त्यांना मुखाग्नी देण्यात आला. मनीषा पांडे आणि त्यांच्या चिमुकलीला चितेवर एकत्र ठेवताना उपस्थितांच्या अश्रूंचा बांध फुटला. या घटनेमुळे गरिबी आणि रोजगारासाठी मजुरांना करावा लागणारा जीवघेणा संघर्ष पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे. स्थानिक स्तरावर मजुरांच्या हाताला काम नसल्याने हे स्थलांतर झाले होते. पुसद तालुक्यात मोठे प्रकल्प आले असते आणि मजुरांचे स्थलांतर थांबले असते, तर ही हृदयद्रावक घटना टाळता आली असती, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. या दुर्घटनेमुळे संपूर्ण पुसद तालुक्यावर शोककळा पसरली असून, आदिवासी बांधवांच्या सुरक्षिततेचा आणि रोजगाराचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे.

# शेतमजुराचे हात राबले, स्व:मालकीच्या १७ एकरांत फुलले नंदनवन!

## चौथी पास बापाचे कष्ट फळाला; मुलगा बनला 'क्लास वन' अधिकारी; नातवाने गाजविले राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय मैदान

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ संजीव भीतकर

रिर्पोर्ताज

**यवतमाळ, दि.२४ :** रविवारची प्रसन्न सकाळ होती. यवतमाळपासून अवघ्या १० किमी अंतरावर असलेल्या धानोरा (बोदगव्हाण) शिवारात आम्ही पोहोचलो. हिरव्यागार शेताच्या बांधावर ७0 वर्षीय पंजाबराव श्यामराव झिंजे उभे होते. त्यांच्या चेहऱ्यावर कष्टाचे तेज होते. अवघ्या चौथीपर्यंत शिक्षण घेतलेल्या या माणसाने मातीतून सोनं पिकवलं आहे. शून्यातून विश्व निर्माण करत त्यांनी १७ एकर शेती कमावली. त्यांचा हा प्रवास थक्क करणारा आहे.



याबाबत त्यांच्याशी संवाद साधला. तेव्हा कष्टाने मोल काय असते याची अनुभूती आली. खरे तर पंजाबराव झिंजे यांचा प्रवास सोपा नव्हता. सुरुवातीला परिस्थिती अत्यंत गरिबीची होती. वडिलोपार्जित शेती नसल्याने उदरनिर्वाहाचा प्रश्न कठीण होता. संसाराचा गाडा हाकणे कठीण होते. त्यांनी आणि त्यांच्या पत्नीने दुसऱ्याच्या शेतात मजुरी केली. प्रसंगी रोजगार हमी योजनेच्या (रोहयो) कामावर घाम गाळला. पण नशिबाला दोष दिला नाही. कष्टाची कास सोडली नाही. १९९६ पासून त्यांच्या कष्टाला फळ येऊ लागले. एक-एक रुपया जमवून त्यांनी जमीन विकत घ्यायला सुरुवात केली. आज त्यांच्याकडे स्वतःची १७ एकर जमीन आहे. व्यसनांपासून दूर राहत त्यांनी हे वैभव कमावले, असे ते फार अभिमानाने सांगित होते. आम्ही त्यांच्या शेतात फेरफटका मारला. शेती हेच त्यांचे सर्वस्व आहे. यावर्षी त्यांनी ८ एकरांत कपाशी लावली होती. त्यातून तब्बल ९६क्विंटल कापूस झाला. ४0क्विंटल सोयाबीन आणि २0क्विंटल तुरीचे पीक झाले. केवळ पारंपरिक पिके घेऊन ते थांबले नाहीत. त्यांनी ११ एकर ओलिताच्या जमिनीत फळबाग फुलवली आहे. शेतात आंब्याची ६0 झाडे डोलत आहेत. पेरूची १५, नारळाची १२, सीताफळाची ७0 आणि रामफळाची ७0 झाडे आहेत. जांभूळ, आवळा, बोरी आणि करवंदाची झाडेही फळांनी लगडली आहेत. विशेष म्हणजे त्यांनी मसाल्याच्या पिकांचाही प्रयोग केला. लवंग, दालचिनी, वेलदोडा, काळी मिरी यांची प्रायोगिक लागवड यशस्वी झाली आहे. सफरचंद, डाळिंब आणि अंजीरही त्यांच्या शेतात बहरले आहेत. भाजीपाल्यात भेंडी, चवळी, टोमॅटोचेही उत्पादन ते घेतात. हे शेत नसून जणू 'नंदनवन'च आहे, असे शेतातून फेरफटका मारल्यावाचून राहत नाही.

### शेतातच सामाजिक बांधीलकी

**पंजाबरावांनी आपल्या शेतातच हनुमानाचे सुंदर मंदिर उभारले आहे. तिथे जनावरांसाठी गोठाही आहे. दरवर्षी हनुमान जयंतीला ते शेतात महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करतात. या पंगतीला मोठे अधिकारी आणि सामान्य शेतकरी एकत्र बसतात. मातीशी नाळ जोडलेला हा परिवार आज यवतमाळ जिल्ह्यासाठी प्रेरणास्त्रोत ठरला आहे. कष्टाला पर्याय नाही, कष्टानेच फळ मिळते हेच पंजाबरावांनी सिद्ध केले आहे.**

### मुलगा अधिकारी, नातू खेळाडू

**बापाने शेतात घाम गाळला. मुलाने त्याचे मोल जाणले. त्यांचा मुलगा संतोष याने शिक्षणात मोठी भरारी घेतली. गावात शाळा नसल्याने ५-१0 किमी पायपीट केली. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करताना दूध विकले. गरिबीचे चटके सोसले. लिपिक पदापासून सुरू झालेला त्याचा प्रवास आज 'क्लास वन' अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचला आहे. त्यांनी आतापर्यंत किमान १0 सरकारी नोकऱ्या मिळवल्या. संतोष झिंजे यांची पत्नीही महसूल अधिकारी आहे. अधिकारी असूनही ते सुट्टीच्या दिवशी शेतात राबतात. पंजाबरावांचा नातू 'युग'हा महाराष्ट्र फुटबॉल टीमचा कॅप्टन आहे. सध्या तो पुणे येथील बालेवाडीत शिक्षण आणि खेळाचे धडे गिरवित आहे. नुकतेच त्याने जर्मनीत प्रशिक्षण घेतले असून, सध्या तो पुण्यात 'नीट'ची तयारी करत आहे.**